मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://www.vruttamanas.in/

# वृत्तमानस

मुंबई/ पालघर | रविवार, १० ऑगस्ट २०२५ | वर्ष- ३० | अंक - ५० | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

Email : vrittamanas1@gmail. com



ठाकरे आणि शिंदे यांचा कौटुंबिक दिल्ली दौरा

पान 8

## वरळी राड्यानंतर राजकीय नाट्य, सिद्धेश शिंदेंवर गुन्हा



**मुंबई -** वरळीतील कार्यक्रमावेळी झालेल्या गोंधळानंतर आता आदित्य ठाकरेंचे निकटवर्तीय आणि युवासेनेचे सदस्य असलेल्या सिद्धेश शिंदे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिंदे सेनेच्या महिला पदाधिकाऱ्याच्या तक्रारीनंतर सिद्धेश शिंदेविरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला. सिद्धेश शिंदे यांनी नारळी पौर्णिमेवेळी झालेल्या गर्दीत या महिला पदाधिकारीला धक्का मारल्याचा आरोप आहे. सबंधित तक्रारदार महिला सध्या केईएम रुग्णालयात उपचार घेत आहे.

### विधानसभा निवडणुकीपूर्वी

# दोन माणसांनी 160 जागा निवडून आणण्याची गॅरंटी दिली होती...

### शरद पवारांचा गौप्यस्फोट



■ नागपूर

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज नागपूरमध्ये मोठे विधान केले आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी आपल्याला दोनजण भेटले होते. विधानसभेच्या 288 जागांपैकी 160 जागांची गॅरंटी त्यांनी दिली होती, असे विधान शरद पवार यांनी केले आहे.

शरद पवार यांच्या विधानानंतर ते दोनजण कोण होते? आणि कशाच्या आधारावर त्यांनी 160 जागा निवडून येण्याची गॅरंटी दिली होती? असे प्रश्न आता उपस्थित केले जात आहेत. तसेच शरद पवार यांचा रोख हा ईव्हीएम मशिनवर असल्याचे दिसून आले. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर ईव्हीएम मशिन आणि निवडणूक आयोगाच्या एकूणच भूमिकेवर विरोधी पक्षांकडून शंका आणि संशय व्यक्त केला जात आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते खासदार संजय राऊत यांनी सर्वप्रथम म्हणजेच विधानसभा निवडणुकीच्या निकालापासूनच ईव्हीएम छेडछाडीचा मुद्दा उचलून धरला आहे. तसेच लोकसभा विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही गेल्या काही दिवसांपूर्वी मतचोरीचा मुद्दा उचलून धरला आहे. अशातच शरद पवार यांच्या विधानाने देशभरात मोठा संशयकल्लोळ उडाला आहे.

नागपूरमध्ये माध्यमांशी संवाद साधताना शरद पवार यांनी मोठे विधान केले. विधानसभा निवडणुकीपूर्वी दिल्लीमध्ये दोन लोकांनी आपली भेट घेतली होती. विधानसभेच्या 160 जागा निवडून येण्याची गॅरंटी त्यांनी दिली होती. निवडणूक आयोगाबाबत शंका नसल्याने त्याकडे दुर्लक्ष केलं. यानंतर त्या दोन लोकांची भेट राहुल गांधी यांच्यासोबत घालून दिली होती. आम्ही दोघांनी जनतेत जाऊन जो कौल मिळेल तो स्वीकारण्याचं ठरवलं आणि त्या माणसांकडे दुर्लक्ष करण्याचा निर्णय घेतला, असे शरद पवार म्हणाले.

### निवडणूक आयोगाची सर्वात मोठी कारवाई

# 334 राजकीय पक्षांना दाखवला घरचा रस्ता

प्रतिनिधी
■ नवी दिल्ली




केंद्रीय निवडणूक आयोगाने ३३४ राजकीय पक्षांना देशातील नोंदणीकृत पक्षांच्या यादीतून काढून टाकण्याची मोठी कारवाई शनिवारी केली. आयोगाच्या या निर्णयानंतर आता फक्त ६ राष्ट्रीय आणि ६७ प्रादेशिक आणि २,५२० नोंदणीकृत मान्यता असलेले राजकीय पक्ष देशात आहेत. तथापि आयोगाने यादीतून वगळलेल्या राजकीय पक्षांना अपील करण्यासाठी ३० दिवसांची मुदत दिली आहे. राष्ट्रीय ६ पक्षांमध्ये भाजप आणि काँग्रेस व्यतिरिक्त आम आदमी पक्ष, बसप, माकप आणि एनपीपी यांचा समावेश आहे. आयोगाच्या यादीनुसार देशात समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दल यांसारखे ६७ पक्ष प्रादेशिक पक्ष म्हणून नोंदणीकृत आहेत.

आयोगाने म्हटले आहे की, यादीतून वगळलेले राजकीय पक्ष लोकप्रतिनिधी कायदा-१९५१ च्या कलम २९ ब आणि कलम २९ क च्या तरतुदींसह आयकर कायदा-१९६१ आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण आणि वाटप) आदेश-१९६८ च्या संबंधित तरतुदींनुसार राजकीय पक्षांना मिळणारे कोणतेही लाभ मिळविण्यास पात्र राहणार नाहीत.

यावर्षी जूनमध्ये निवडणूक आयोगाने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना ३४५ मान्यताप्राप्त नसलेल्या राजकीय पक्षांची पडताळणी प्रक्रिया पान 5 वर

# बचत गटांच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्यासाठी 10 जिल्ह्यांमध्ये 'बचत गट मॉल्स'

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही



***लाडकी बहीण योजना पुढील पाच वर्षापर्यंत सुरू राहणार***

*महाराष्ट्रात लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांना दरमहा दीड हजार रुपये दिले जातात. महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी पुढील पाच वर्षे ही योजना अखंडपणे सुरू ठेवणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.*

प्रतिनिधी
■ मुंबई

महिला सक्षमीकरण हा कोणत्याही राष्ट्राच्या विकासाचा कणा असतो. ज्यावेळी समाजातील महिला मुख्य प्रवाहात येतील तेव्हाच त्या राष्ट्रांच्या विकासाला गती येते. महिलांना अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग बनवल्याने देशाची अर्थव्यवस्था अधिक मजबूत होते. महिलांच्या ५० टक्के सहभागाशिवाय राष्ट्राचा सर्वांगीण विकास शक्य नाही, असे सांगून बचत गटांच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्यासाठी १० जिल्ह्यांमध्ये 'बचत गट मॉल्स' तयार करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुलुंड येथील महाकवी कालिदास नाट्यगृहात आयोजित करण्यात आलेल्या रक्षाबंधन उत्सवात मुख्यमंत्री सहभागी झाले होते. या कार्यक्रमाला सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, आमदार मिहीर कोटेचा यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी व विविध मान्यवर उपस्थित होते.

हिंदू परंपरेतील रक्षाबंधन सणाचे महत्त्व स्पष्ट करताना, मुख्यमंत्र्यांनी हा केवळ राखीचा धागा नाही, तर प्रेमाचा धागा आहे. बहीण भावावरचे प्रेम यातून व्यक्त होते. या धाग्यातून भाऊ बहिणीच्या रक्षणाची शपथ घेतो असे सांगितले. मात्र, आता भावांनी, मी माझ्या बहिणीला इतके सक्षम बनवेन की ती स्वतःचेच नव्हे, तर कुटुंबाचेही रक्षण करू शकेल, असा संकल्प करण्याची वेळ आली असल्याचे सांगून महिलांच्या सामाजिक-आर्थिक सक्षमीकरणासाठी केंद्र व राज्य सरकार विविध योजनांच्या माध्यमातून प्रयत्न करत असल्याची माहिती त्यांनी दिली.

महिला सक्षमीकरणावर भर

महिला सक्षमीकरणासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' सारख्या अनेक योजना सुरू केल्या. 'मुद्रा योजने'च्या लाभार्थ्यांमध्ये ६० टक्के महिला आहेत. यामुळे लाखो महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यास मदत झाली आहे. 'लखपती दीदी' योजनेअंतर्गत महाराष्ट्रात गेल्या वर्षी २५ लाख महिलांना 'लखपती दीदी' बनवण्याचे उद्दिष्ट साध्य झाले आणि यावर्षीही २५ लाख महिलांना तर राज्यात एकूण एक कोटी महिलांना 'लखपती दीदी' तयार करण्याचे उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. तसेच महिलांना दिलेल्या कर्जाची परतफेड शंभर टक्के होते, असा अनुभव त्यांनी यावेळी सांगितला.

### बाबा सिद्दीकी हत्या प्रकरण

## नेपाळमधून सर्वात मोठ्या शस्त्र पुरवठादाराला अटक

**नवी दिल्ली :** माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाबा सिद्दीकी यांची 12 ऑक्टोबर रोजी वांद्रे येथे गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि बाबा सिद्दीकी यांचा मुलगा झिशान सिद्दीकी यांच्या कार्यालयाबाहेर हा हल्ला करण्यात आला होता. बाबा सिद्दीकी यांच्या हत्येची जबाबदारी गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईच्या टोळीने घेतली होती. याप्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत अनेकांना अटक केली आहे. मात्र आता पोलिसांनी या प्रकरणातील संशयित आरोपी सलीम शेख उर्फ सलीम पिस्टल याला नेपाळमधून अटक केली आहे. जो भारतातील सर्वात मोठा बेकायदेशीर शस्त्र पुरवठादार आहे. बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात सलीम पिस्टल याचे नाव समोर आले होते. सलीम हा दिल्लीच्या सीलमपूर भागातील रहिवासी आहे. महत्त्वाचे म्हणजे सलीम पिस्टल याला 2018 मध्ये दिल्ली पोलिसांनी अटक केली होती, परंतु नंतर तो परदेशात पळून गेला होता. अलीकडेच दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाला सलीम नेपाळमध्ये लपल्याची माहिती मिळाली होती. या माहितीवरून दिल्ली पोलीसांच्या विशेष पथकाने आणि भारतीय सुरक्षा एजन्सीने संयुक्त कारवाई करत सलीम पिस्टल याला अटक केली आहे.

## झारखंडमध्ये दोन मालगाड्यांची समोरासमोर टक्कर

**रांची:** झारखंडमध्ये शनिवारी रेल्वे अपघाताची भीषण घटना घडली. दोन मालगाड्यांची समोरासमोर टक्कर झाली. या अपघातात मालगाडीवरील कर्मचारी किरकोळ जखमी झाले असून अनेक डब्बे रुळावरून घसरले. या अपघातामुळे चांडिल-टाटानगर आणि चांडिल-बोकारो रेल्वे मार्ग पूर्णपणे ठप्प झाला आहे. त्यामुळे या मार्गावरील रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. अपघाताची माहिती मिळताच रेल्वे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. चांडिलमध्ये दोन मालगाड्यांमध्ये झालेल्या अपघातामुळे टाटा-पाटणा वंदे भारत एक्सप्रेस, टाटा-बक्सर सुपरफास्ट एक्सप्रेस आणि टाटा-धनबाद स्वर्णरेखा एक्सप्रेस रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच पुरुषोत्तम एक्सप्रेस आणि आनंद विहार एक्सप्रेस सह काही लांब पल्ल्याच्या गाड्यांचे मार्ग बदलण्यात आले आहेत. घटनेची चौकशी करण्यासाठी रांची विभागाचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले.

## कोर्टाचा आदेश झुगारुन कबुतरांना खायला घालणाऱ्या महेंद्र सकलेचाला पोलिसांचा दणका

### कार जप्त अन् गुन्हाही केला दाखल

प्रतिनिधी
■ मुंबई



मुंबई उच्च न्यायालयाने दादरमधील कबुतरखान्याच्या परिसरात पक्ष्यांना खाणे टाकण्यास मनाई केल्यानंतर आता जैन समाजातील काही लोकांनी एक नवीन पद्धत सुरु केली आहे. या परिसरातील कबुतरं उपाशी राहू नयेत, यासाठी दादरमध्ये कारच्या टपावर धान्याचा ट्रे ठेवला जात आहे. अशा कार दादर परिसरात फिरवण्याची योजना आखण्यात आली आहे. लालबागमधील महेंद्र संकलेचा या व्यक्तीकडून कबुतरांना खाद्य पुरवण्यासाठी या 'फिडिंग कार' चालवल्या जात आहेत. एवढेच नाही तर आणखी 12 गाड्या येणार आहेत, असेही संकलेचा यांनी सांगितले. यावरुन आता शिंदे गटाच्या नेत्या मनीषा कायंदे आक्रमक झाल्या आहेत. मनीषा कायंदे यांनी या सगळ्यावर सडकून टीका केली आहे.

या प्रकाराला मुजोरी नाही तर काय म्हणायचे. कोर्ट हे सर्वोच्च स्थान आहे, त्याला तुम्ही जुमानत नाही. लालबागचा माणूस इकडे गाडी घेऊन फिरत आहे. गाडीच्या वर ट्रे बांधायला तुम्ही आरटीओची परमिशन घेतली आहे का? तुमचा अट्टाहास की पान 5 वर

### रक्षाबंधनाला तिहेरी हत्याकांड

## पतीने पत्नीसह दोन चिमुकल्या लेकींना संपवलं

**नवी दिल्ली:** देशभरात रक्षाबंधनाचा सण साजरा केला जात असताना एक धक्कादायक घटना घडली आहे. दिल्लीच्या करावल नगरमध्ये एका व्यक्तीनं त्याच्या पत्नी आणि दोन मुलांचा गळा दाबून खून केला. हत्या झालेली दोन्ही मुलं अल्पवयीन आहेत. तिहेरी हत्याकांडानंतर फरार झालेल्या आरोपीला उत्तर प्रदेशच्या सीमेवरुन अटक करण्यात आली. प्रदीप असं आरोपीचं नाव आहे. प्रदीपला ५ आणि ७ वर्षांच्या दोन मुली होत्या. प्रदीप त्याच्या कुटुंबासह भगत सिंह वसाहतीत वास्तव्यास होता. कर्ज आणि आर्थिक विवंचनेला कंटाळून त्यानं पत्नी आणि मुलींची हत्या केली असावी असा संशय पोलिसांना आहे. जयश्री (२८), अंशिका (७) आणि नीतू (५) अशी मृतांची नावं आहेत. जयश्रीचा पती प्रदीप आझादपूर बाजारात भाजी विकायचा. पान 5 वर

## शत्रूचे मोठे नुकसान



### 5 पाकिस्तानी विमाने पाडली, नष्ट झालेल्या दहशतवादी अड्ड्यांचे फोटो सर्वांसमोर

प्रतिनिधी
■ बंगळुरू

भारतीय हवाई दलाचे प्रमुख एपी सिंह यांनी शनिवारी सांगितले की, ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानचे मोठे नुकसान झाले. आम्ही त्यांची पाच लढाऊ विमाने पाडली. एपी सिंह यांनी बंगळुरू येथे एका कार्यक्रमात याची पुष्टी केली.

एअर चीफ मार्शल एपी सिंह म्हणाले, आमच्या हवाई संरक्षण यंत्रणेने उत्तम काम केले आहे. आम्ही अलीकडेच खरेदी केलेली एस-४०० प्रणाली गेम-चेंजर ठरली आहे. पाकिस्तानकडे लांब पल्ल्याचे ग्लाइड बॉम्ब होते पण ते त्यापैकी एकही वापरू शकले नाहीत कारण ते हवाई संरक्षणात भेदक होऊ शकत नव्हते.

एपी सिंह पुढे म्हणाले की, पाकिस्तानातील बहावलपूर येथे झालेल्या हल्ल्यापूर्वीचे आणि नंतरचे फोटो सर्वांसमोर आहेत. तिथे काहीही शिल्लक राहिले नव्हते. हे फोटो केवळ उपग्रहावरून घेतले गेले नाहीत. तर स्थानिक माध्यमांनी उद्ध्वस्त इमारतीचे आतील फोटो देखील दाखवले.

एपी सिंह बंगळुरूमधील एचएएल मॅनेजमेंट अकादमी सभागृहात एअर चीफ मार्शल एलएम कात्रे मेमोरियल लेक्चरच्या १६ व्या हंगामात बोलत होते.

यशाचे एक प्रमुख कारण राजकीय इच्छाशक्ती होती. आम्हाला अगदी स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या. आम्हाला पूर्ण स्वातंत्र्य होते. जर काही अडचणी असतील तर त्या आमच्या स्वतःच्या होत्या. आम्ही किती दूर जायचे हे ठरवत होतो. आम्हाला योजना आखण्याचे आणि अंमलबजावणी करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य होते. तिन्ही दलांमध्ये समन्वय होता. सीडीएसच्या पदामुळे खरोखरच फरक पडला. ते आम्हाला एकत्र आणण्यासाठी होते. सर्व एजन्सींना एकत्र आणण्यात एनएसएनेही मोठी भूमिका बजावली.

९० तासांच्या युद्धानंतर पाकिस्तानने माघार घेतली: हे एक उच्च तंत्रज्ञानाचे युद्ध होते. ८० ते ९० तासांच्या युद्धात, आम्ही इतके नुकसान करू पान 5 वर

## जीर्ण पाईप फुटून आण्विक कचरा समुद्रात पडला

■ लंडन

**नौदलाच्या चुकीमुळे ब्रिटनमध्ये हाहाकार**

आण्विक पदार्थ हे किरणोत्सारी असल्याने त्यापासून निर्माण होणारा आण्विक कचरा हा मानव आणि निसर्गासाठी धोकादायक असतो. त्यामुळे त्यांची हाताळणी अगदी जपून करावी लागते. दरम्यान, अशा आण्विक कचऱ्याची विल्हेवाट लावता हलगर्जीपणा झाल्याची धक्कादायक घटना ही ब्रिटनमध्ये घडली आहे. ब्रिटनमधील सर्वात गोपनीय आणि सुरक्षित लष्करी तळांपैकी एक असलेल्या स्कॉटलंडमधील लॉच लाँग किनाऱ्यावर असलेल्या कूलपोर्ट आर्मामेंट डेपोमधील किरणोत्सारी पाण्याची समुद्रात गळती झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या ठिकाणीच ब्रिटनचं रॉयल नौदल आपल्या पाणबुड्यांसाठीच्या अण्वस्त्रांचा साठा ठेवते. पान 5 वर

## उपराष्ट्रपती आहेत कुठे? त्यांचं गायब असणं गंभीर...

■ नवी दिल्ली



उपराष्ट्रपती पदाचा तडकाफडकी राजीनामा दिल्यानंतर माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड हे सार्वजनिक कार्यक्रमात दिसून आले नाहीत. राजीनामा दिल्यानंतर त्यांनी कोणतंही वक्तव्य केलं नाही. ते कोठे आहेत? असा प्रश्न काँग्रेसचे राज्यसभे खासदार कपिल सिब्ल यांनी सरकारला विचारला आहे.

राज्यसभेचे खासदार कपिल सिब्बल यांनी एक्स मीडियावर पोस्ट करत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्याबाबत प्रश्न विचारले आहेत. त्यांनी पोस्टमध्ये म्हटले, "जगदीप धनखड कुठे आहेत, हे आम्हाला कळू शकेल का? ते सुरक्षित आहेत का? आमचा त्यांच्याशी कशामुळे संपर्क होऊ शकत नाही?"

जगदीप धनखड यांच्याशी संपर्क होत नसल्यानं त्यांनी चिंता व्यक्त करत म्हटलं, " ते आमचे उपराष्ट्रपती होते, हे अमित शाह यांना माहित असायला हवे. देशाला चिंता वाटण्याची गरज आहे. मी 'लापता लेडीज'बाबत ऐकलं आहे. मात्र, 'लापता उपराष्ट्रपतीबाबत पहिल्यांदाच ऐकत आहे. विरोधी पक्षांनी त्यांना वाचवावे, असे वाटत आहे. मी त्यांना (जगदीप धनखड) फोन केला होता. मात्र, त्यांनी फोन उचलला नाही. त्यांच्या पीएनं फोन उचलून ते आराम करत असल्याच सांगितलं. त्यानंतरकुणीही त्यांचा फोन उचलला नाही. काही नेत्यांनीदेखील ते फोन उचलत नसल्याच सांगितलं.

# अजिबात तडजोड स्विकारणार नाही!

### डोनाल्ड ट्रम्प-पुतीन भेटीआधीच युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्कींचा इशारा

■ कीव्ह



रशिया आणि युक्रेनमध्ये मागील तीन वर्षांपासून युद्ध सुरू आहे. अनेक देशांनी हस्तक्षेप करूनही हा संघर्ष थांबलेला नाही. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांना युद्ध थांबवण्यासाठी आवाहने केली गेली. पण, उपयोग झाला नाही. हे युद्ध थांबवण्यासाठी आता अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. हे युद्ध थांबवण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प आणि व्लादिमीर पुतीन हे प्रत्यक्ष भेटणार आहेत. त्यापूर्वी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्लोदोमीर झेलेन्स्की यांनी तडजोड न करण्याची रोखठोक भूमिका घेतली आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन हे पुढील आठवड्यात भेटणार आहेत. १५ ऑगस्ट रोजी दोन्ही नेते अमेरिकेतली अलास्का राज्यात भेटणार आहेत. या भेटीचा उद्देश युद्ध कसे थांबवता येईल, हा असणार आहे. ट्रम्प यांनी शुक्रवारीच (८ ऑगस्ट) यांची सोशल मीडियावरून माहिती दिली. रशियाचे अध्यक्ष झेलेन्स्की या भेटीबद्दल बोलताना म्हणाले की, "युक्रेनच्या संविधानाचे उल्लंघन केले जाणार नाही. कब्जा करण्यात आलेली जमीन युक्रेन कधीही भेट म्हणून देणार नाही. त्याबाबत तडजोड स्विकारली जाणार नाही."

"युक्रेनच्या सहमतीशिवाय घेण्यात आलेल्या कोणताही निर्णय हा शांतता प्रस्थापित करण्याच्या विरोधात असेल. यातून शांतता प्रस्थापित होणार नाही. शस्त्रसंधी परिणामकारक ठरणार नाही. आम्हाला खरी शांतता हवी आहे. तात्पुरती शांतता नको आहे", असेही झेलेन्स्की म्हणाले.

रशियाने २०१४ मध्ये युक्रेनच्या चार भूप्रदेशावर कब्जा केला होता. हे भूप्रदेश पुतीन रशियाचा भाग मानतात. लुहान्स्क, दोनेत्स्क, झापोरिज्जिया, खरसान हे भूप्रदेश आहेत. दरम्यान, ट्रम्प दुसऱ्यांदा अमेरिकेचे अध्यक्ष बनले तेव्हापासून हे युद्ध थांबवण्याचे प्रयत्न करत आहेत. पुतीन यांच्यावर दबाव आणवा, यासाठी त्यांनी चीन,भारत आणि ब्राझीलवरही दबाव टाकला होता.

## 'मला पंतप्रधान व्हायचंय'

### चिमुकलीने मागितली पंतप्रधान मोदींकडे ओवाळणी

■ नवी दिल्ली



देशभरात शनिवारी रक्षाबंधनाचा सण साजरा करण्यात आला. दिल्लीतील शाळकरी विद्यार्थीनींनी पंतप्रधान निवासस्थानी जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदींना राखी बांधली. चिमुकल्या विद्यार्थीनींनी पंतप्रधान मोदींसाठी विशेष राख्या आणल्या होत्या.

या विशेष रक्षाबंधन कार्यक्रमाचा एक व्हिडीओ पंतप्रधान मोदींनी त्यांच्या सोशल मीडियावर शेअर केला. व्हिडीओमध्ये चिमुकल्यांसोबत पंतप्रधान मोदी संवाद साधताना दिसत आहेत. त्यांनी सर्व विद्यार्थिनींना रक्षाबंधनच्या शुभेच्छा दिल्या.

एक चिमुकली मला पंतप्रधान व्हायचे आहे, असे पंतप्रधान मोदींना सांगताना दिसत आहे. 'स्वच्छ भारत', 'मन की बात', 'उज्ज्वला गॅस', 'अटल पेन्शन', 'डिजीटल इंडिया', अशा केंद्र सरकारच्या सर्व योजनांचा आणि 'ऑपरेशन सिंदूर'चा उल्लेख यावेळी दोन विद्यार्थिनीनी पंतप्रधान मोदींसमोर केला. या सर्व योजना विद्यार्थीनींनी लक्षात ठेवल्याने पंतप्रधानांनी त्यांचे कौतुक केले. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एक्स'वर पोस्ट करुन देशवासियांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा देखील दिल्या.

२ वृत्तमानस
पालघर, मुंबई
मुंबई, रविवार, १० ऑगस्ट २०२५

## मुंबईतील प्रख्यात दंतवैद्यक सुचिता कारंडे यांना डॉक्टरेट आणि सुवर्णपदक प्रदान

**मुंबई :** मुंबईच्या कायरोप्रॅक्टिक आणि सुप्रसिद्ध दंतवैद्यकांच्या व्यावसायिक प्रशिक्षक सुचिता करांडे यांना अल्टरनेटिव्ह मेडिसिन क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी बद्दल दक्षिण पश्चिम अमेरिका विद्यापीठाचे असोसिएट डायरेक्टर आणि सेंट्रल कौन्सिल ऑफ अल्टरनेटिव्ह मेडिसिन अँड रिसर्च इंडियाचे डायरेक्टर डॉ. प्रवीण भाटिया पुरेचा यांच्या हस्ते पीएचडी (डॉक्टरेट) आणि सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. अल्टरनेटिव्ह मेडिसिन संदर्भात कार्य करणाऱ्या मुंबई आणि साउथ वेस्टर्न अमेरिका युनिव्हर्सिटी तर्फे महाराष्ट्राच्या मुख्यालयात ही डॉक्टरेट तसेच सुवर्णपदक प्रदान करण्यात आले.



## थोडक्यात

### लहान मुलांसाठी शिवनेरी रोड रेस 2025 चे आयोजन

**मुंबई:** दादर ,पुर्व येथील शिवनेरी सेवा मंडळाच्या वतीने येत्या १५ऑगस्ट रोजी लहान वयो गटातील मुला,मुलींसाठी शिवनेरी रोड रेस. ..२०२५ चे आयोजन मुंबई शहर जिल्हा हौशी एथलेटिक्स संघटनेच्या सहकार्याने करण्यात येणार आहे. १०,१२,१४,१६ वर्षाखालील या गटात शर्यती होतील..शर्यतीला सकाळी सहा वाजता भवानी माता मैदान, शिंदे वाडी,दादर,पुर्व येथुन सुरवात होईल. मुंबई शहर आणि मुंबई उपनगरातील धावपटू या रेसमध्ये भाग घेऊ शकतील.आधिक माहितीसाठी मो. क्र.९७६९५९१४१३ अथवा ९८२१३९४७१२ यावर संर्पक साधावा.

### लालबाग येथे दहीहंडी सराव शिबिर

**मुंबई:** शिवसेना- शिवडी विधानसभा क्षेत्र यांच्या वतीने रविवार, दि. १० ऑगस्ट, २०२५ सायं. ६ ते रात्रौ, १० वा. पर्यंत स्थळ : सद्गुरू भालचंद्र महाराज क्रीडांगण (लाल मैदान), दत्ताराम लाड मार्ग, लालबाग, मुंबई- ४०० ०१२ दहीहंडी सराव शिबिराचे
आयोजन करण्यात आलेले आहे. हा फक्त दहीहंडी उत्सव नसून "मराठमोळ्या संस्कृतीचा जागतिक किर्तीमान" आहे. आपली संस्कृती आपणास जोपासली पाहिजे या हेतूने आम्ही या दही आणि सराव शिबिराचे आयोजन केले. या शिबिरात सर्व गोविंदा पथकांना आकर्षक सन्मानचिन्ह आणि रोख रक्कम देण्यात येणार आहे. तरी या सोहळयास आपण उपस्थित राहून, आम्हां सर्व मराठी जनांचा आणि सर्व गोविंदा पथकांचा आनंद, उत्साह द्विगुणित करण्यासाठी उपस्थित रहावे असे आवाहन शिवडी विधानसभा प्रमुख शशिकांत निकम आणि संयोजक गणेश आडिवरेकर यांनी केले आहे.

### प्रिया बापट प्रथमच पोलिसाच्या भूमिकेत

**मुंबई:** मराठीसह हिंदी चित्रपटसृष्टीत आपली वेगळी ओळख निर्माण करणारी, अभिनयाच्या विविध छटांमध्ये रसिकांची मनं जिंकणारी अभिनेत्री प्रिया बापट आता एका नव्या आणि थरारक अविष्कारात दिसणार आहे. ॲमेझॉन प्राईमवर लवकरच प्रदर्शित होणाऱ्या 'अंधेरा' या भयप्रद वेबमालिकेत ती एका महत्त्वपूर्ण भूमिकेत झळकणार आहे. नुकताच या वेबमालिकेचा ट्रेलर समाजमाध्यमांवर प्रदर्शित झाला असून त्याने प्रेक्षकांमध्ये एकाच वेळी भीती आणि उत्सूकता निर्माण केली आहे. या मालिकेच्या निमित्ताने प्रियाने पहिल्यांदाच भयपट शैलीत काम केले असून यात तिने पहिल्यांदाच पोलिसाची भूमिका साकारली आहे. अंधेरा'चं ट्रेलर पाहून प्रेक्षकांमध्ये अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. कथानक काय आहे? हे रहस्य नेमकं कुठं घेऊन जाणार आहे? या सगळ्या प्रश्नांची उत्तरं प्रेक्षकांना लवकरच प्रेक्षकांना मिळणार आहेत.


**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.


# पालघर जिल्ह्यात 'जागतिक आदिवासी दिन' उत्साहात साजरा

## 'वीरांगना राणी दुर्गावती महिला सबलीकरण व सक्षमीकरण योजने'चा लोकार्पण सोहळा

**प्रतिनिधी**
■ **पालघर**

जागतिक आदिवासी दिन जिल्ह्याभरात विविध ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित रॅली आणि शोभायात्रेत आदिवासी बांधव, विशेषतः तरुण आणि महिला, हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते. आदिवासी दिनाच्या निमित्ताने आज सकाळपासूनच जिल्ह्याच्या ग्रामीण भागासह विविध ठिकाणी आदिवासी बांधवांनी रॅलीचे आयोजन केले होते. पारंपरिक पोशाखात आणि काही ठिकाणी वेगवेगळ्या पुरस्कर्त्यांनी दिलेल्या टी-शर्टमध्ये आदिवासी तरुण-तरुणी या सोहळ्यात सहभागी झाल्याचे दिसून आले.

या रॅलींमध्ये पारंपारिक तारपा वाद्य वाजवून तारपा नृत्य तसेच इतर आदिवासी नृत्ये सादर करण्यात आली. अनेक तरुणांनी विविध वेशभूषा आणि रंगरंगोटी करून कार्यक्रमात उत्साह वाढवला. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि आदिवासी समाजातील अनेक ज्येष्ठ मान्यवर या रॅलीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पालघर शहरात भूमीसेना आणि आदिवासी एकता परिषदेने रॅलीचे आयोजन केले होते.




याव्यतिरिक्त, गाव आणि तालुका पातळीवरही रॅली काढून आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करून आदिवासी बांधवांनी या दिनाचा आनंद साजरा केला.

महाराष्ट्रातील महिला सबलीकरणाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलत 'वीरांगना राणी दुर्गावती महिला सबलीकरण व सक्षमीकरण योजनेचा शुभारंभ पालघर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आला. यावेळी जागतिक आदिवासी दिनानिमित्त भगवान बिरसा मुंडा, राणी दुर्गावती, राघोजी भांगरे, तंट्या भिल, नाग्या कातकरी, ख्वाजा नाईक, वीर बाबुराव शेडमाके, तिलका मांझी यांच्या प्रतिमांचे पूजन करून आदिवासी दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात जव्हार आणि डहाणू प्रकल्पातील बचत गटांतील महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या योजनेमुळे ग्रामीण आणि आदिवासी भागातील महिलांना आर्थिक स्वावलंबनाची नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी मधुकर जागले (डहाणू), दीपक टिके (जव्हार), बन्सीलाल पाटील (डहाणू), कार्यालय अधीक्षक योगेश भोये (जव्हार), सुचिन संखे (डहाणू), संशोधन सहाय्यक जगदीश पाटील (डहाणू) तसेच डहाणू व जव्हार प्रकल्प आदिवासी विकास निरीक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमात महिलांना योजनेविषयी सविस्तर माहिती देण्यात आली आणि त्यांना स्वावलंबनाकडे वाटचाल करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले. या योजनेच्या माध्यमातून महिलांना स्व-उद्योग, बचत गट बळकटीकरण, कौशल्य विकास आणि उत्पन्नवाढीसाठी आवश्यक साधने व प्रशिक्षण उपलब्ध होणार आहे, ज्यामुळे सामाजिक व आर्थिक क्षेत्रात महिलांची भूमिका अधिक सक्षम होईल, असा विश्वास उपस्थित महिलांनी व्यक्त केला.

# आदिवासी युवकांसाठी 'स्वप्नांची रिक्षा' रोजगाराच्या प्रवासाला सुरुवात



**प्रतिनिधी**
■ **पालघर**

प्रधानमंत्री जनजाती न्याय महायाभियान आणि धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान अंतर्गत आदिवासी विकास विभागाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे लाभ वितरण व लाभार्थी संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या माध्यमातून, NSTFDC व राज्य शासन पुरस्कृत कर्ज योजनेंतर्गत, आदिवासी युवकांना नव्या CNG रिक्षांचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाद्वारे ९ आदिवासी युवकांना रोजगाराच्या दिशेने पहिलं पाऊल टाकण्याची संधी मिळाली.

ही योजना आदिवासी तरुणांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणारी असून, त्यांच्या आत्मनिर्भर भविष्यासाठी एक भक्कम पायरी ठरत आहे.

> माझ्याकडे जुनी रिक्षा होती, त्यामुळे उत्पन्न फारसे नव्हते. आता नवीन CNG रिक्षामुळे उत्पन्न वाढण्यास मदत होईल. ही रिक्षा माझ्या आर्थिक प्रगतीची सुरुवात ठरेल.
>
> **- कमलेश म्हसकर, लाभार्थी**

> ही केवळ एक रिक्षा नाही, तर ही स्वप्नांची गाडी आहे. ही गाडी रोजगार, आत्मनिर्भरता आणि सन्मान मिळवून देईल. यामुळे युवकांचा आर्थिक विकास होईल आणि त्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडेल.
>
> **- प्रा. डॉ. अशोक वुईके, आदिवासी विकास मंत्री**

**कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर:**
या कार्यक्रमाला आदिवासी विकास मंत्री मा.ना.प्रा. डॉ. अशोक वुईके, आमदार मा. हरिश्चंद्र भोये (विक्रमगड), आमदार मा. राजेंद्र गावित (पालघर), श्री. योगेश पाटील (प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ) आणि श्री. राजेश पवार (व्यवस्थापक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ – कोकण विभाग) आदी मान्यवर उपस्थित होते.



**मुंबई:भोईवाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन कदम यांची मुंबई पोलीस दलामध्ये सहाय्यक पोलीस आयुक्त पदावर नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करताना उद्योजक व शिवसेना वडाळा विधानसभा प्रमुख सुरेश भाई कदम, मुकुंद पड्याळ, विलास राणे, नितीन पेडणेकर, प्रशांत घाडीगावकर, समीर दळवी, महेश सुर्वे शैलेश कदम**

## माहीममधील पालिकेच्या शाळेसाठी मराठीप्रेमींचा लढा

# मराठी अभ्यास केंद्रातर्फे 15 ऑगस्टला नोंदवणार निषेध

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

माहीम येथील मुंबई महानगरपालिकेची न्यू माहीम शाळा इमारत धोकादायक असल्याचे कारण पुढे करून पालिका प्रशासनाने शाळा बंद केली असून लवकरच शाळेचे पाडकाम करण्यात येणार आहे. मात्र, शाळा संरचनात्मकदृष्ट्या मजबूत असल्याचा दावा पालक व सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे. शाळा वाचवण्यासाठी विविध संस्था पुढे येऊ लागल्या आहेत. विविध प्रयत्न करूनही प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याने येत्या १५ ऑगस्ट रोजी न्यू माहीम मनपा शाळेसमोर निषेध नोंदविण्यात येणार आहे.

न्यू माहीम शाळेचे सुमारे सात – आठ वर्षांपूर्वी नूतनीकरण करण्यात आले होते. त्यामुळे अल्पावधीतच शाळा धोकादायक असल्याचे घोषित केल्यामुळे पालक संतप्त झाले आहेत. तसेच, यासंदर्भात शाळेबाहेर कोणतीही नोटीस लावण्यात आलेली नाही. या शाळेत शिकणाऱ्या मराठी, हिंदी, कन्नड आदी माध्यमांतील शेकडो विद्यार्थ्यांचे दूरच्या अन्य शाळांमध्ये स्थलांतर करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रचंड पायपीट करावी लागत आहे. याच परिसरातील पालिकेच्या मोरी रोड माहीम शाळेची इमारत पुनर्बांधणीच्या नावाखाली तीन वर्षांपूर्वी पाडण्यात आली. मात्र, अद्याप तिचे बांधकाम झालेले नाही. त्यामुळे न्यू माहीम शाळाही कोणाच्या तरी आर्थिक हितासाठी पाडण्यात येत असल्याचा आरोप केला जात आहे.शाळा इमारत पाडू नये याबाबत आम आदमी पक्षाच्या प्रणाली राऊत यांनी शेकडो पालकांच्या सह्यांचे निवेदन महापालिका आयुक्तांकडे दिले आहे. मात्र, पालिकेकडून अद्याप सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही. त्यांनतर, शालेय शिक्षण अभ्यास व कृती समितीचे प्रमुख डॉ. दीपक पवार आणि अभिनेत्री व मराठी शाळांच्या सदिच्छादूत चिन्मयी सुमित यांनीही शाळेला भेट देऊन पाहणी केली. तसेच, शाळा न पाडण्याची मागणी केली. संबंधित प्रकरण चर्चेत आल्यांनतर शिवसेनेचे (ठाकरे) आमदार महेश सावंत यांनी देखील शाळेची पाहणी केली. तसेच, शाळा इमारत भक्कम दिसत असतानाही धोकादायक श्रेणीत टाकल्याबाबत त्यांनी आश्चर्य व्यक्त केले होते. तसेच, संबंधित शाळा पाडू नये, अशी मागणी पालिका आयुक्तांकडे केली होती.

# मोखाडामध्ये बेवारस दुचाकी वाहनांचा होणार लिलाव

**प्रतिनिधी**
■ **मोखाडा**

या व्दारे जनतेला जाहिर आवाहन करण्यात येते की,मोखाडा पोलीस स्टेशन गुन्हयातील जप्त व हद्दीत मिळून आलेल्या बेवारस दुचाकी मोटार सायकली मुळ मालकास परत करण्यासाठी वाहानाचे चेसीस, इंजिन, आर.टी.ओ रजिस्टेशन वरुन पडताळणी केली असता प्राप्त रेकॉर्ड वरुन मुळ मालकाचा शोध घेतला असता ते मिळुन आले नाही.

तरी मोखाडा पोलीस ठाण्यात जमा असलेली वाहन कोणाचे असल्यास चोरी गेले असल्यास अगर अपघात ग्रस्त नादुरुस्त झाले असल्यास व ती वाहने घेवुन जावयाचे असल्यास त्याबाबत मोखाडा पोलीस ठाणे व सहापोलीस निरीक्षक सोो, मोखाडा पो.स्टे. यांचेशी समक्ष संपर्क साधावा तसेच वाहनाचे कागदपत्र दाखवुन खात्री करुन ती घेऊन जावी असे आवाहान पोलीस प्रशासना कडुन करण्यात आलेले आहे. तसेच पुढे लिलावाची प्रक्रिया करण्यात येईल याची नोंद घ्यावी.



# धानिवरी येथे जागतिक आदिवासी दिनानिमित्त सांस्कृतिक जल्लोष

**प्रतिनिधी**
■ **धानिवरी**

जागतिक आदिवासी दिनानिमित्त धानिवरी गावात भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्याचे उद्घाटन कासा पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक अविनाश मांदळे यांच्या हस्ते झाले. यावेळी धानिवरी गावचे सरपंच शैलेश कोरडा, उपसरपंच सुरेखा तांबडा, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष गणेश पडवळे तसेच ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य मान्यवर म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाला गावातील तसेच परिसरातील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली आणि उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.



या प्रसंगी सरपंच शैलेश कोरडा, गणेश पडवळे, राजाराम तांबडा आणि कान्हा तांबडा यांनी आदिवासी समाजाच्या चालीरीती, रूढी, परंपरा आणि सांस्कृतिक वारशाविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी पारंपरिक संस्कृती जपण्याचे महत्त्व अधोरेखित करत, ती पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले. त्यांच्या भाषणात आदिवासी समाजाच्या ऐतिहासिक संघर्षांचा, निसर्गाशी असलेल्या घट्ट नात्याचा आणि एकजुटीच्या भावनेचा विशेष उल्लेख होता.

कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण म्हणजे आदिवासी समाजातील पारंपरिक नृत्यप्रकारांचे रंगतदार सादरीकरण. यात तुरणाच कांबळे नाच, तारपा नाच, ढोल नाच यांसह इतरही अनेक पारंपरिक नृत्यप्रकार सादर करण्यात आले. कलाकारांच्या पोशाखातील रंगीबेरंगी परंपरागत वेशभूषा, वाद्यांचे गोड सूर आणि नृत्याचे लयबद्ध ठेका यामुळे संपूर्ण परिसर सांस्कृतिक जल्लोषात न्हावून निघाला. प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात कलाकारांचे स्वागत करत कार्यक्रमाला आणखी रंगत आणली.

ग्रामस्थांच्या एकजुटीमुळे आणि सर्वांच्या सक्रिय सहभागामुळे हा कार्यक्रम केवळ मनोरंजनापुरता न राहता, आदिवासी संस्कृती आणि परंपरेचे दर्शन घडवणारा, प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला. धानिवरी गावाने जागतिक आदिवासी दिन साजरा करताना सांस्कृतिक वारशाचा ठसा उमटवला आणि एकतेचा संदेश दिला.

# मध्य रेल्वेची फुकट्या प्रवाशांवर कडक कारवाई

■ **मुंबई**

एप्रिल ते जुलै २०२५ या कालावधीत तिकीट तपासणी पथकांनी विनातिकीट/वैध तिकीट नसलेल्या १४.४३ लाख फुकट्या प्रवाशांना पकडले आणि त्यांच्या कडून एकूण.८६.७३ रुपये कोटींचा दंड वसूल केला. जुलै २०२५ आणि जुलै २०२४ च्या तुलनेत मध्य रेल्वेने अनियमित प्रवासाच्या प्रकरणांमध्ये ६२ % वाढ नोंदवली असून दंड वसुलीत १००% वाढ झाली आहे.प्रवाशांना सुरक्षित, सुकर व आरामदायक प्रवास सुविधा देण्याच्या आपल्या प्रयत्नांचा भाग म्हणून, मध्य रेल्वे नियमितपणे मेल-एक्सप्रेस, पॅसेंजर, विशेष ट्रेनमध्ये तसेच मुंबई व पुणे विभागातील उपनगरी ट्रेनमधील सर्व विभागांमध्ये व्यापक तिकीट तपासणी मोहीम राबवते, जेणेकरून विनातिकीट प्रवासावर नियंत्रण ठेवले जाते.

अनधिकृत प्रवासावर नियंत्रण ठेवण्यासाठी, मुख्यालय तसेच सर्व विभागांमध्ये नियमितपणे विविध प्रकारच्या तपासण्या केल्या जातात. यामध्ये स्थानक तपासणी , अचानक धाड तपासणी (ॲम्बुश तपासणी), किल्लाबंदी तपासणी (फोर्ट्रेस चेक), व्यापक तपासणी (Intensive checks) आणि मेगा तिकीट तपासणी मोहिमा यांचा समावेश आहे.

आर्थिक वर्ष 2025-26 मधील (एप्रिल ते जुलै 2025) कालावधीत, मध्य रेल्वेच्या तिकीट तपासणी पथकांनी वैध तिकीट अथवा प्रवास परवाना नसलेल्या १४.४३ लाख प्रवाशांना पकडले असून, त्यांच्या कडून एकूण रु.८६.७३ कोटींचा दंड वसूल करण्यात आला आहे. रेल्वे बोर्डाने या कालावधीसाठी निश्चित केलेल्या रु ८१.४८ कोटींच्या उद्दिष्टाच्या तुलनेत हे उत्पन्न ६.४४% ने अधिक असून, तिकीट तपासणीमधून मिळालेल्या महसूलामध्ये लक्षणीय वाढ नोंदवण्यात आली आहे.

जुलै २०२५ मध्ये मध्य रेल्वेच्या तिकीट तपासणी पथकांनी वैध तिकिटाशिवाय प्रवास करणाऱ्या ३.०८ लाख प्रवाशांना पकडले आहे, तर जुलै २०२४ मधील १.९१ लाख प्रवाशांच्या तुलनेत हे प्रमाण ६२% वाढले आहे. जुलै २०२५ मध्ये विनातिकीट वैध तिकीटाशिवाय प्रवास करणाऱ्यांकडून दंड म्हणून १६.०० कोटी रुपये वसूल करण्यात आले आहेत, जे जुलै २०२४ मधील रू. ७.९७ कोटी रुपयांच्या तुलनेत १००% पेक्षा जास्त वाढ आहे. यांनी जारी केले आहे.

# दादर कबुतरखाना परिसरात दंगल नियंत्रण पथक तैनात; दाणा-पाणी खाऊ घालणाऱ्यांवर ठेवणार नजर

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

दादर येथील बंदिस्त कबुतरखान्यावर बुधवारी जैन समुदायाने हल्लाबोल करून तो उघडा करण्याचा प्रयत्न केला. यामुळे कायदा सुव्यवस्था धोक्यात आल्याने आता कबुतरखाना परिसरात सरकारने दंगल नियंत्रण पथकाची एक टिम तैनात केली आहे. यामुळे आता कबुतरांना दाणा - पाणी खाऊ घालणाऱ्यांवर त्याची नजर असणार आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने कबुतरांना दाणा - पाणी खाऊ घालण्यास बंदी केलेली असतांनासुध्दा न्यायालयाचा अवमान करून दाणे टाकली जात असल्याचे समोर आले. या सर्व बाबीची गंभीर दखल घेत सरकारने दगंल पथक तैनात करण्याचा निर्णय घेतला आहे.



दादर कबुतरखाना परिसरात न्यायालयाच्या ७ ऑगस्टच्या निकालानंतर दगंल पथक तैनात करण्यात आले आहे. परिसरात जैन समुदायाकडून पुन्हा कबुतरखान्यावर हल्ला होवू नये, तसेच कबुतरांना दाणा - पाणी टाकण्यात येवू नये याची या पथकाकडून खबरदारी घेतली जात आहे. या पथकाच्या सोबत शिवाजी पार्क पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारीसुध्दा तैनात करण्यात आले आहेत. कबुतरखाना परिसरात जर कुणी दाणा - पाणी टाकतांना आढळले तर अशा लोकांवर शिवाजी पार्क पोलीसांकडून कारवाई केली जात आहे. आतापर्यंत ५० नागरिकांवर कारवाई केल्याचे पोलीसांनी सांगितले.

कबुतरखान्यामधील कबुतरांच्या विष्टेमुळे श्वसनाचे आजार होत असल्याने न्यायालयाने दादर कबुतरखाना बंद करण्याचे निर्देश दिले होते, त्यानुसार पालिका जी उत्तर विभागाने शनिवार, २ ऑगस्ट रोजी कबुतरखाना बांबु आणि ताडपत्रीने बंदिस्त केला होता. या कारवाईला जैन समाजाने रस्त्यावर उतरून विरोध दर्शविला होता, परंतु न्यायालयाच्या आदेशानुसार पालिकेने कबुतरखाना बंदिस्त केला होता. याविरोधात जैन समाजाने कुलाबा ते गेट वे ऑफ इंडियापर्यंत शांतीदूत यात्रा काढून निषेध नोंदविला होता.

दरम्यान, लगेल्या आठवड्यांपासून दादर कबुतरखान्यातील कबुतरांना दाणा - पाणी टाकणे बंद असल्याने स्थानिक रहिवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. दाणा - पाणी टाकणे बंद असल्यामुळे याठिकाणी येणाऱ्या कबुतरांची संख्याही कमी झालेली आहे. अशाप्रकारे किमान महिनाभर कबुतरांना दाणा - पाणी खाऊ घालणे बंद केले तर कबुतरांचा येथील अधिवास नष्ट होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# मेघाश्रय संस्थेने शालेय मुलांसह रक्षाबंधन सण केला साजरा



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

रक्षाबंधनाच्या शुभ मुहूर्तावर, मेघाश्रय संस्थेने वांद्रे पश्चिम अलमेडा पार्कमध्ये शेकडो शाळेय मुला-मुलींसह रक्षाबंधनाचा पवित्र सण मोठ्या आनंदात साजरा केला. या दरम्यान, संस्थेच्या राष्ट्रीय अध्यक्षा सीमा सिंह आणि श्रेय सिंह यांनी मुलांना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा केला. यावेळी सीमा सिंग म्हणाल्या की, आज इतक्या मुलांमध्ये स्वतःला पाहून मला खूप आनंद होत आहे. रक्षाबंधन हा सण भावा-बहिणीचा पवित्र सण मानला जातो. आज आपण या मुला-मुलींसोबत हा सण साजरा करून हे नाते अधिक मजबूत करण्याचा संकल्प केला आहे. यानिमित्ताने शेकडो मुलींनी सीमा सिंह आणि श्रेय सिंह यांच्या मनगटावर राखी बांधून रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या, तर सीमा सिंहनेही अनेक मुलांची मने जिंकली. कार्यक्रमादरम्यान, काही मुलांनी कोरोना काळात संस्थेने केलेल्या मदतीबद्दल एक नाट्य सादर केले. मुलांनी सादर केलेल्या या नाटकाचे सीमा सिंह यांनी कौतुक केले. शेवटी कार्यक्रमादरम्यान सर्व मुला-मुलींना भेटवस्तू वाटण्यात आल्या.


My wife Smt Anuja Sandeep Khedekar was the owner of vehicle no MH02CW5346 - XUV 500. She died on 17 - 06 - 2019. Now I her HUSBAND Sandeep P Khedekar wants to transfer the vehicle in my name. If any one has any objection please contact with in 15 days on 9987215591.



Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Thirty**
**Issu - 50**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- तीसावे**
**अंक - ५०**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

मुंबई : सुभाष डामरे मित्र मंडळ व शिवराज प्रतिष्ठान (परळ) चे सहसंचालक ,लालबाग परळमधील गिरणी कामगार सुपुत्र , मराठी तरुण उद्योजक व निष्ठावंत शिवसैनिक सुशिल शरद राऊत यांना टाइम्स ऑफ इंडिया आयोजित (ईट एफ अँड बी लीडर्स अँड कॉन्क्लेव्ह) अवॉर्ड्स देऊन सन्मानित केल्याबद्दल लालबाग येथील शिवसेना शाखेत मंडळाचे संचालक व शिवसेना सचिव सुधीर (भाऊ) साळवी यांच्या हस्ते, लालबाग राजाची प्रतिमा ,शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार व अभिनंदन करण्यात आले. या वेळी संचालिका उर्मिलाताई पांचाळ (मा.नगरसेविका) व मंडळाचे संस्थापक आनंद गांवकर , नाना फाटक, संतोष कांबळी,प्रभाकर मोरजकर, रविंद्र ओटवकर, सुशील डिचोलकर, छोटू वेंगुर्लेकर, श्री.रविंद्र कांदळकर, प्रफुल्ल गांवकर, प्रणव डामरे, कु.सुवर्णा गुराम, नीलम मिरगळ ,मेघना सुर्वे उपस्थित होते.



# भैय्या मेरे राखीके बंधन को निभाना...
# सामान्यांच्या कुतूहलाचा विषय ठरले 'राजकीय रक्षाबंधन'

## नेत्यांच्या रक्षाबंधनाची छायाचित्रे झाली व्हायरल



प्रतिनिधी
■ मुंबई

राज्यासह देशभरात भाऊ-बहिणींच्या नात्याचा उत्सव असलेला रक्षाबंधन हा सण मोठ्या उत्साहात साजरा होताना दिसतोय. अशातच राजकीय वर्तुळातील नेत्यांचा रक्षाबंधन हा सण देखील चर्चेत आहे.सर्वसामान्य नागरिकांसाठी त्यांच्या नेत्यांचे 'राजकीय रक्षाबंधन' हा विषय नेहमीच कुतूहलाचा ठरला आहे.

यंदाही महाराष्ट्रातील काही नेत्यांनी आपल्या लाडक्या बहिणीकडून तर काहींनी आपल्या मानस भगिनींकडून राखी बांधून घेतली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भाजपच्या महिला कार्यकर्त्यांनी मुबईतील एका कार्यक्रमात राखी बांधली. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'लाडक्या बहिणीं'कडून राखी बांधून घेतली.

दरवर्षीप्रमाणे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ या निवासस्थानी त्यांच्या मोठ्या बहीण जयवंती देशपांडे रक्षाबंधन या सणानिमित्त आल्या आणि त्यांनी आपला रक्षाबंधन हा सण साजरा केला. यावेळी नयन शहा यांच्या पत्नी हेतल नयन शहा यांनीही औक्षण करून राज ठाकरेंना राखी बांधली. या कौटुंबिक सोहळ्याचे काही खास क्षण आणि व्हिडिओ सोशल मीडियावरही व्हायरल होत आहेत.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मातोश्रीवर पक्षाच्या प्रवक्त्या सुषमा अंधारे यांच्याकडून राखी बांधून घेतली.राज्यातील मराठीजनांचे प्रतिनिधित्व करणारे उद्धव ठाकरे रक्षाबंधनाच्या या क्षणाला भावुक झाले होते.काँग्रेस नेते विजय वड्डेटीवार यांची आपल्या निवासस्थानी आपल्या बहिणीकडून राखी बांधून घेत औक्षणही करून घेतले.मुंडे भाऊ-बहिण यांनी दरवर्षीप्रमाणे यंदाही एकत्रित रक्षाबंधन साजरे केले. राष्ट्रवादी कांग्रेसचे आमदार आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांना मंत्री पंकजा मुंडे आणि डॉ.प्रीतम मुंडे या दोन बहिणीनी राखी बांधली.

# मध्य वैतरणा जलाशयावर 100 मेगावॅट क्षमतेचा संकरित वीजनिर्मिती प्रकल्प

## ४.९० हेक्टर राखीव वनजमिनीच्या पुनर्वळतीकरणास शासनाची परवानगी



प्रतिनिधी
■ मुंबई

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे मध्य वैतरणा जलाशयावर २० मेगावॅट क्षमतेचा जलविद्युत तर ८० मेगावॅट क्षमतेचा तरंगता सौरऊर्जा असा एकूण १०० मेगावॅट क्षमतेचा संकरित वीजनिर्मिती प्रकल्प विकसित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ४.९० हेक्टर राखीव वनजमीन पुनर्वळतीकरणास परवानगी दिली आहे. यामुळे आता संकरित वीजनिर्मिती प्रकल्पाच्या प्रत्यक्ष बांधकामास सुरूवात केली जाणार आहे.

संकरित ऊर्जानिर्मिती क्षेत्रात पाऊल टाकणारी बृहन्मुंबई महानगरपालिका ही देशातील पहिलीच महानगरपालिका ठरली आहे. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा करून महानगरपालिका प्रशासनाने ही परवानगी प्राप्त केली आहे.

या प्रकल्पातून दरवर्षी सुमारे २०८ दशलक्ष युनिट ऊर्जानिर्मिती होणार आहे. हा प्रकल्प केवळ मुंबईसाठी नव्हे तर संपूर्ण देशासाठी हरित ऊर्जेच्या दिशेने एक प्रेरणादायी पाऊल आहे. या प्रकल्पाबरोबरच भविष्यात महानगरपालिकेच्या अन्य जलाशयांवर सौरऊर्जा प्रकल्प विकसित करणे शक्य होईल. त्या दिशेने प्रयत्न सुरू आहेत.

पालिकेने पालघर जिल्ह्यात मोखाडा तालुक्यातील कोचाळे गावात १०२.४ मीटर उंचीचे आणि ५६५ मीटर लांबीचे मध्य वैतरणा धरण बांधून सन २०१४ मध्ये पूर्ण केले. या धरणाचे 'हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे मध्य वैतरणा जलाशय' असे नामकरण करण्यात आले आहे.

या धरणाच्या निर्मितीवेळीच जलविद्युत प्रकल्प उभारण्याच्या दृष्टीने पाणीपुरवठा तसेच जलविद्युत निर्मितीसाठी संयुक्तिक बहिर्गामी जलवाहिनीही अंथरण्यात आली होती. राज्य शासनाच्या जलसंपदा विभागाने या जलाशयातून जलविद्युत निर्मिती करण्यासाठी १२ डिसेंबर २०१९ रोजी महानगरपालिकेस परवानगी दिली. त्यानंतर महानगरपालिकेने सल्लागारांची नियुक्ती केली. मोठ्या स्वरूपाची विजेची मागणी पाहता संरचना, बांधा, वित्तपुरवठा, वापरा आणि हस्तांतरित करा (DBFOT) या तत्त्वावर जलविद्युत निर्मितीच्या बरोबरीने सौरऊर्जा निर्मिती करणे अधिक फायदेशीर ठरेल, असे सल्लागारांनी सुचविले.

ही शिफारस स्वीकारून महानगरपालिकेने 'कॅप्टिव्ह पॉवर प्रोड्युसर मॉडेल' नुसार या प्रकल्पाची उभारणी करण्यासाठी निविदा मागवल्या. यामध्ये, सर्वात कमी दर देकार असलेले मेसर्स शापूरजी पालनजी ॲन्ड कंपनी प्रायव्हेट लिमिटेड आणि मेसर्स महालक्ष्मी कोनल ऊर्जा प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त भागीदारीतील (JV) कंपनीला दिनांक १६ फेब्रुवारी २०२१ रोजी संमतीपत्र (LOA) देण्यात आले. त्यांनी मेसर्स वैतरणा सोलर हायड्रो पॉवरजेनको प्रायव्हेट लिमिटेड (VSHPPL) या विशेष उद्देश वहन कंपनीची (SPV) स्थापना केली आहे.

या प्रकल्पाचा कालावधी हा ३१ महिने एवढा आहे. त्यातील वित्तीय परिनिश्चिती कालावधी ७ महिने आहे. प्रत्यक्ष बांधकाम कालावधी हा पावसाळा वगळून २४ महिने आहे. त्यानुसार दिनांक १ जून २०२२ पासून वित्तीय परिनिश्चितीचा कालावधी सुरु झाला आहे.

या प्रकल्पाचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे प्रकल्पासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कोणतीही भांडवली गुंतवणूक केली जाणार नाही. बृहन्मुंबई महानगरपालिका २५ वर्षांच्या कालावधीसाठी मात्र ४.७५ रुपये प्रति युनिट (Rs/kWh) या स्थिर समतुल्य दराने वापरलेल्या युनिटसाठी पैसे देणार आहे.

### वनजमीन पुनर्वळतीकरणास परवानगी

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने दिनांक २१ जुलै २०२५ रोजी वन (संरक्षण व संवर्धन) अधिनियम,१९८० च्या कलम २ अंतर्गत ४.९० हेक्टर राखीव वनजमिनीच्या पुनर्वळतीकरणास परवानगी दिली आहे. हा या प्रकल्पाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. या परवानगीमुळे पालघर जिल्ह्यातील हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे मध्य वैतरणा जलाशयावर संकरीत ऊर्जा प्रकल्पाच्या प्रत्यक्ष बांधकामास सुरूवात होऊ शकणार आहे. पालिकेने ही परवानगी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाशी (MoEF&CC) सातत्याने समन्वय साधून मिळवलेली आहे. या अंतर्गत केंद्रीय मंत्रालयाने यापूर्वी ९ ऑक्टोबर २०२४ रोजी 'प्राथमिक' (Stage-1) मंजुरी व त्यानंतर दिनांक ०७ एप्रिल २०२५ रोजी 'अंतिम' मंजुरीही प्रदान केली होती.

# भारत निवडणूक आयोगाकडून 334 पक्षांची नोंदणी रद्द

प्रतिनिधी
■ मुंबई

भारत निवडणूक आयोगाने (ECI) निवडणूक व्यवस्था पारदर्शक करण्याच्या मोहिमेअंतर्गत कारवाई करत ३३४ नोंदणीकृत परंतु मान्यता नसलेल्या राजकीय पक्षांची (RUPPs) नोंदणी रद्द केली आहे.

सध्या देशात ६ राष्ट्रीय पक्ष, ६७ प्रादेशिक पक्ष आणि २८५४ नोंदणीकृत पण मान्यता नसलेले राजकीय पक्ष (RUPPs) आहेत. लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१ च्या कलम २९अ अंतर्गत नोंदणी करताना पक्षांनी नाव, पत्ता, पदाधिकारी यांची माहिती द्यावी लागते, तसेच सहा वर्षे सलग निवडणूक न लढवल्यास नोंदणी रद्द करण्याचा अधिकार आयोगाकडे आहे.

जून २०२५ मध्ये आयोगाने राज्य व केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना ३४५ RUPPsची पडताळणी करण्याचे निर्देश दिले होते. तपासणीदरम्यान संबंधित पक्षांना नोटिसा देऊन प्रत्यक्ष सुनावणीची संधी देण्यात आली.

मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या अहवालानुसार, ३३४ पक्षांनी आवश्यक अटींचे पालन केले नाही. उर्वरित प्रकरणे पुनर्पडताळणीसाठी परत पाठवण्यात आली आहेत. परिणामी, आता देशातील RUPPsची संख्या २८५४ वरून २५२० वर आली आहे.

या पक्षांना आता लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१ मधील कलम २९ब आणि २९क तसेच आयकर कायदा, १९६१ व निवडणूक चिन्ह आदेश, १९६८ अंतर्गत कोणताही लाभ मिळणार नाही. तसेच आयोगाच्या आदेशाविरोधात ३० दिवसांच्या आत अपील करता येईल.

तपशीलवार यादीसाठी https://www.eci.gov.in/list-of-political-parties या आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आयोगाने कळविले आहे.

# गोरेगावमधील वीर सावरकर पुल पाडण्यास मनसेने केला विरोध : केले आंदोलन



प्रतिनिधी
■ मुंबई

गोरेगावातील वीर सावरकर (एम.टी.एन.एल.) उड्डाणपूल तोडण्याच्या तयारीत महानगरपालिका असल्याच समजताच गोरेगाव मनसेचे विभाग अध्यक्ष विरेंद्र जाधव यांच्या नेतृत्वाखाली गोरेगाव मनसे पदाधिकारी तसेच स्थानिक नागरिकांसह मनसे कार्यकर्त्यांनी एकत्र येत जोरदार आंदोलन केलं.

सदर आंदोलनात विभाग अध्यक्ष विरेंद्र जाधव, धनश्री नाईक उपविभाग अध्यक्ष श्री अवधूत साळवी, सचिन सावंत, कांचन भुर्के, मोहिनी सालियान उपविभाग सचिव नितीन खांबे, पाशु पठाण,शाखा अध्यक्ष शैलेंद्र मोरे, भूषण फडतरे, संजय खानोलकर, सुरेंद्र गावडे, मंगेश पवार, अरुण गवळी, हरेश साळवी, महिला शाखा अध्यक्षा सर्व सौ.उर्वशी पटेल,मीना असावा,अश्विनी एटांबे, मनसे मध्यवर्ती कार्यालय प्रमुख प्रविण सुर्वे,वाहतूक सेना विभाग संघटक संतोष देशमुख,वाहतूक सेना चिटणीस अजित यादव, कांबळे साहेब,विद्यार्थी सेना विभाग अध्यक्ष सचिन कांबळे,शाखा अध्यक्ष अक्षय भोगटे,रस्ते,आस्थापना विभाग संघटक गोरेगाव अशोक इंगोले,त्याचप्रमाणे प्रत्येक शाखेतील उपशाखा अध्यक्ष,व सर्व महिला पुरुष कार्यकर्ते उपस्थित होते.

हा पूल साधारण ८ वर्षांपूर्वी नागरिकांच्या कराच्या पैशातून (२७ कोटी रुपये खर्च करून) बांधण्यात आला होता. मात्र, सागरी सेतू फेज २ च्या कामासाठी हा पूल पाडण्याचा निर्णय महानगर पालिकेने घेतला आहे. हा जनतेच्या पैशांचा अपमान असून विकासाच्या नावाखाली केलेला अन्याय आहे.

ही जनतेच्या पैशांचा अपव्यय थांबवा, पर्याय द्या, आणि पूल पाडण्याचा निर्णय मागे घ्या! अन्यथा आम्ही मोठं आंदोलन पुकारू. असा इशारा मनसे गोरेगांव विभाग अध्यक्षविरेंद्र जाधव यांनी सांगितले.

# मरीन ड्राइव्हचे सौंदर्य अधिक खुलविण्यावर भर द्या!

## पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या सूचना



प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईसाठी देणगी असलेला मरीन ड्राइव्ह परिसर नैसर्गिक अंगाने नितांत सुंदर आहे. मुंबईकरांची पहाट आरोग्यदायी आणि सायंकाळ आल्हाददायक करण्यात भर घालणारा हा परिसर आपण अधिक सुंदर ठेवायला हवा. नरिमन पॉईंटपासून स्वराज्यभूमी (गिरगाव चौपाटी) पर्यंत आणि त्यापुढील परिसराचे सौंदर्य अधिक खुलविण्यात सातत्य ठेवा, अशा सूचना बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी केल्या.

नरिमन पॉईंट ते स्वराज्यभूमी (गिरगांव चौपाटी) पर्यंत संपूर्ण मरीन ड्राइव्ह परिसराची पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी ६ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी पायी फिरून पाहणी केली. या पाहणीप्रसंगी त्यांनी महानगरपालिका अधिकारी, पोलिस अधिकारी यांना विविध सूचना केल्या.

महानगरपालिकेच्या उप आयुक्त (परिमंडळ १) श्रीमती चंदा जाधव, पोलिस उप आयुक्त प्रशांत परदेशी, विशेष कार्य अधिकारी (महानगरपालिका आयुक्त कार्यालय) चंद्रशेखर चोरे, महानगरपालिकेचे संबंधित सहायक आयुक्त, अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते.

नरिमन पॉईंट परिसरातील नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टस् (एनसीपीए) परिसरात अनावश्यक असलेले रस्तारोधक (बॅरिकेड्स) काढून टाकण्याबाबत गगराणी यांनी सूचना केली. या परिसराला मुंबईकरांसह देश-विदेशातील पर्यटक भेट देतात. त्यामुळे मरीन ड्राइव्ह परिसर अधिक सुटसुटीत आणि स्वच्छ ठेवण्यावर भर द्यावा. अनावश्यक असलेले सूचनाफलक काढून टाकावेत. मरीन ड्राइव्ह परिसरात पायी चालण्याची जागा, नागरिकांसाठी आसन व्यवस्थेकरिता बाकडे सुस्थितीत ठेवा, जेणेकरून पायी चालून दमलेले नागरिक येथे काही वेळासाठी विसावा घेवू शकतील. परिसरातील विजेच्या खांबांवर वाहिन्या लोंबकळणार नाहीत, याची काळजी घ्या. या खांबांची वेळोवेळी रंगरंगोटी करा. दिव्यांग नागरिकांच्या व्हिलचेअरसाठी असलेली जागा अधिक सुटसुटीत ठेवा, आदी बाबींकडेही श्री. गगराणी यांनी अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले.



मुंबई: मच्छिमार नगर बधवार पार्क कफपरेड कुलाबा येथे नारळी पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. काशीनाथ तांडेल, कल्पना तांडेल, भाविक तांडेल, ललिता तांडेल, सागर कटकरे, सुचित्रा कटकरे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक आयपीएस अधिकारी डॉ. अभिनव देशमुख, श्री व सौ. राजेश चव्हाण यांनी नारळाचे पूजन करून समुद्रात तो अर्पण केला.

# बोरीवलीत 'श्रावणोत्सव-2025' संपन्न



प्रतिनिधी
■ मुंबई

"श्रावणोत्सव-२०२५" कार्यक्रमाचा भव्य कार्यक्रम बोरिवलीच्या प्रबोधनकार नाट्यगृह मोठ्या उत्साहात, श्रद्धेने आणि सांस्कृतिक वैभवाने. स्त्री शक्तीच्या अभिमानाला समर्पित "मिशन सिंदूर, पत्नीचा आदर, तिच्या अस्तित्वाचा अभिमान" या विषयावर आधारित सादरीकरणाने उपस्थित असलेल्या सर्व प्रेक्षकांच्या हृदयाला स्पर्श केला. विशेषतः, पहलगामवर आधारित भावनिक दृश्य पाहिल्यानंतर लोकांच्या डोळ्यांत अश्रू आले. त्याच क्रमाने, छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्याच्या कथेवर सादर केलेल्या नृत्य सादरीकरणाने इतिहास जिवंत केला, तर भारताची समृद्ध सांस्कृतिक परंपरा विविध राज्यांच्या लोकनृत्य आणि सादरीकरणातून येथे दिसून आली. हा कार्यक्रम भक्ती, नृत्य, नाटक आणि संस्कृतीचा एक अनोखा संगम ठरला. उत्तर मुंबईचे माजी खासदार या कार्यक्रमात उपस्थित होते. त्यांनी नागरिकांना संबोधित केले.

दहिसरच्या आमदार मनीषा ताई चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संकल्पनेतून वृषाली बागवे यांनी आयोजित केलेल्या या उत्कृष्ट आणि संस्मरणीय कार्यक्रमाला गोपाळ शेट्टी यांच्यासह आमदार मनीषा ताई चौधरी, मिस इंडिया-२०२५ अदिती परब, मुंबई राज्य महिला मोर्चा अध्यक्षा शीतल गंभीर, माजी नगरसेवक जितेंद्र पटेल, हरीश छेडा, जगदीश ओझा, विधानसभा संयोजक अरविंद यादव, महिला मोर्चा उत्तर मुंबई अध्यक्षा योगिता पाटील, शशिकांत कदम, पूनम पांडे आणि अमित सिंग यांच्यासह मंडळ आणि विविध वॉर्डातील इतर अधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# देशात इंग्रज राजवटीपेक्षा भयंकर परिस्थिती, लोकशाही व संविधान गिळंकृत करु पाहणाऱ्या प्रवृत्तींनो 'चले जाव' - हर्षवर्धन सपकाळ

## ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त काँग्रेस पक्ष व सामाजिक संघटनांची पदयात्रा व हुतात्म्यांना आदरांजली



प्रतिनिधी
■ मुंबई

आजच्या दिवशी १९४२ साली राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी 'करो या मरो'चा मंत्र देत जुलुमी इंग्रजांना 'चले जाव'चा नारा दिला. आज देशात तीच परिस्थिती आहे, हुकूमशाही प्रवृत्ती फोफावली असून ती लोकशाही व संविधान गिळंकृत करु पहात आहे. आज या प्रवृत्तीच्या विरोधात आवाज उठवण्याची गरज असून देशाला घातक असलेल्या या प्रवृत्तीला 'चलो जाव'चा इशारा देत आहोत, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले.

ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त गिरगाव चौपाटीवरील लोकमान्य टिळक पुतळयापासून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांच्या नेतृत्वाखाली ऑगस्ट क्रांती मैदाना पर्यंत पदयात्रा काढण्यात आली. गवालिया टँक येथे स्वातंत्र्य चळवळ व 'अंग्रेजो चले जाव' 'भारत छोडो', आंदोलनातील हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. यावेळी मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खा. वर्षा ताई गायकवाड, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष राजन भोसले, वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे, चरणसिंग सप्रा, सरचिटणीस संदेश कोंडविलकर श्रीरंग बर्गे, श्रीकृष्ण सांगळे, ॲड. अमित कारंडे, मधू चव्हाण, भावना जैन, मोनिका जगताप, धनंजय शिंदे यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी व सामाजिक संस्थांचे प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, आज महात्मा गांधींचा संदेश व देशाला स्वातंत्र कसे मिळाले याची आठवण सर्वांना झाली पाहिजे. स्वातंत्र्यासाठी मोठा लढा द्यावा लागला आणि मोठ्या संघर्षानंतर आपल्याला स्वातंत्र्य मिळालेले आहे पण आज देशातील परिस्थिती पाहता पुन्हा एकदा 'चले जाव'चा नारा देण्याची गरज असून देशात आज एका नव्या क्रांतीची गरज आहे. नागपूरची चिप थैमान घालत असून ती सर्व व्यवस्था करप्ट करत आहे, ती चिप लोकांच्या डोक्यात घसुवण्याचा प्रयत्न सुरु आहे. महात्मा गांधी यांचा खून करणारी प्रवृत्ती, स्त्री-पुरुष समानता नाकारणारी प्रवृत्ती व स्पृश-अस्पृशता मानणाऱ्या प्रवृत्तीला गाडण्याची गरज आहे, असे आवाहन करत आज ही प्रवृत्ती ठेचली नाही तर पुढची पिढी आपल्याला माफ करणार नाही, असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.


मध्य रेल्वे
मुंबई विभाग
ई-निविदा सूचना क्र. निमासू/०१/२५/३४
दिनांकित ०७-ऑगस्ट-२५

भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि त्यांच्या वतीने प्रमुख मुख्य साहित्य व्यवस्थापक, मध्य रेल्वे खालील बाबींच्या पुरवठ्याकरीता ई-निविदा मागवित आहेत:

| निविदा क्र. | वर्णन | परिमाण | देय दिनांक |
|---|---|---|---|
| ३६२५५०१२ | फीडर वायरकरीता १५० चौ. मिमी हार्ड ड्रॉन स्टँडर्ड कॉपर कंडक्टर | ७.१७ किमी | २५-ऑगस्ट-२५ |
| ४१२५१६७९ | ग्लास बंडिंग टेप साईझ:- ०.३३ X २० मिमी | २२४०२९ नग | २६-ऑगस्ट-२५ |
| ४१२५५०४५ | कम्प्युटर हार्डवेअरची खरेदी: युटीएस थर्मल प्रिंटर | ११०० नग | २८-ऑगस्ट-२५ |
| ५०२५५०६७ बी | पीव्हीसी इंस्युलेटेड आर्मर्ड अनस्क्रीन्ड कॉपर कंडक्टर अंडरग्राउंड रेल्वे सिग्नलिंग केबल आकार: ६ कोअर X १.५ चौ. मी. | ९०.३ किमी | २८-ऑगस्ट-२५ |
| ८०२५०००४ | २०८ लिटर्सचे मे. कॅस्ट्रोल इन कंटेनरचा गियर ऑईल ऑप्टीगियर आरएमओ | ५६१६ लिटर्स | २९-ऑगस्ट-२५ |
| ६२२५३९६१ | स्पष्टीकरण अनुसार एकूण एचआयपी रिप्लेसमेंट इम्प्लांट | ७२ नग | ०२-सप्टे-२५ |
| ७१२५५००२ ए | डबल गर्डर, डबल ट्रॉली ईओटी क्रेन ६५/१० टन [३२.५ टन/५ टन] आणि [३२.५ टन/५ टन] परी. ०२ नग श्रौदेद प्रकरच्या डीएसएल सह | ०१ संच | ०२-सप्टे-२५ |
| ४१२५१११६ | थीन वॉल्ड इलेक्ट्रोन बीम | १३६८६ मी. | ०८-सप्टे-२५ |
| ३८२५१८५९ ए | नॉन ॲस्बेस्टॉस आधारीत ऑर्गनिक ब्रेक पॅड अंडर रिव ०१ | ३८३३२ संच | ०१-सप्टे-२५ |
| ३८२५१८५९ बी | नॉन ॲस्बेस्टॉस आधारीत ऑर्गनिक ब्रेक पॅड अंडर रिव ०१ | १०४०० नग | २९-ऑगस्ट-२५ |

टिप: उपरोक्त नमूद सर्व निविदा ई-निविदा आहेत आणि सर्व निविदाकारांना त्यांच्या बोली आयआरईपीएस संकेतस्थळ https://www.ireps.gov.in द्वारे ऑन लाईन सादर कराव्यात. उपरोक्त नमूद निविदा आणि अन्य पूर्तता निविदांच्या संदर्भात कृपया आयआरईपीएस संकेतस्थळाला भेट द्या.

AK-354
प्रमुख मुख्य साहित्य व्यवस्थापक ह्यांच्या करीता
Download UTS App for Tickets

**'मोह' संपल्यावर एखादी गोष्ट गमावण्याची भितीही नष्ट होते. मग ती संपत्ती असो, एखादी वस्तु असो, नाती असोत वा मानवी जीवन!**



-भगवान गौतम बुद्ध

वृत्तमानस

मुंबई, रविवार, १० ऑगस्ट २०२५

**१०-०८-२०२५ते१६-०८-२०२५ (रविवार ते शनिवार)**




मेष - आहे त्यात समाधान मानावे.
ग्रहबळ पहाता सप्ताहाचा पूर्वार्ध लाभदायक जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना लाभात वाढ होऊ शकेल.या दिवसांत जे काही बदल होणार आहे ते अनपेक्षित बरे असु शकतील.त्यामुळे बदल स्वीकारून पुढे जा.म्हणजे नुकसान होणार नाही.इतरांकडे बघण्याचा दृष्टिकोन समंसपनाचा असु शकेल.असे हे सर्व दिवस असेचआहेत. हा तात्पुरत्या वलयाचा असु शकेल.हे तुम्हाला माहीत झालेले आहे.तरीसुद्धा गैरसमज करून घेणे बरे नसेल.१६चा सिंहेतुन होनारा रविबदल पोषक राहु शकेल. व्यवसायात प्रगती होऊ शकेल.नोकरदार वर्गाला कामामध्ये समाधानी वृत्ती राहु शकेल.मनमानी टाळलेली बरी.
**महिला -** आर्थिकदृष्ट्या व्यवहार जपून करावेत.घरगुती वातावरण चांगले राहील.मित्र-मैत्रिणींशी मात्र जेवढ्यास तेवढे राहाने पोषक असेल.दुरावा येणार नाही.
**विद्यार्थी -** योग साधनेला महत्त्व द्या
**शुभदिनांक१०-११-१२.**

**वृषभ - उत्तम सप्ताह जाईल.**
ग्रहबळ पहाता संपूरण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल.नियजितकामे करतांना भरभरुन यश मिळेल.या सर्व दिवसांचा कालावधी उत्तम राहु शकेल.हे दिवस तुमच्यासाठी प्रसिद्धीचे आहेत.असे समजायला हरकत नाही.आतापर्यंत तुम्ही ज्या गोष्टींसाठी प्रयत्न करत होता तोप्रयत्न यशस्वी होतनव्हता.विलंब लागत होता.सध्या तो लागणार नाही.सहज मार्गी कामे होत राहतील.कौटुंबिकस्तरावर वावरतांना आनंदात चांगली वाढ होऊ शकेल.रविबदल सर्वस्तरावर चांगली प्रतिष्ठा वाढवु शकेल.सुरु असलेल्या व्यवसायात भरभराट होऊ शकेल. नोकरदार वर्गाला नवीन कामाची जबाबदारी मिळेल.
**महिला -** आर्थिक बाबतीत समाधानी राहाल.राजकीय क्षेत्रात ऊत्तमयश मिळेल.मित्रमैत्रिणींचे नाते अतूट होईल.धार्मिक कार्यासाठी खर्च कराल. सहकार्य मिळेल.
**विद्यार्थी -** आरोग्य ठणठणीत राहील.
**शुभदिनांक-११-१२-१३.**

**मिथुन - घाई टाळावी लागेल.**
ग्रहबळ पहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल. नियोजितकामे करतांना सकारात्मक स्थिती असु शकेल. या सर्व दिवसांत स्वत:ला झेपेल अशाच गोष्टी कराव्या लागतील.ज्या गोष्टी तुम्हाला जमणार नाहीत अशा गोष्टींची जबाबदारी घेऊच नका.अन्यथा नुकसान होऊ शकते. त्यामुळे कदाचित तुमची चिडचिड होऊन इतरांबरोबर वाद-विवादही होऊ शकतात.प्रत्येक गोष्टीत आपलेच खरे करणे सध्यातरी योग्य राहणार नाही.सध्या इतरांचे मत ऐकून घ्यावेच लागणार.रविबदल लाभात वाढ करु शकेल. व्यवसायात मागील काही दिवसांपेक्षा सध्याचे दिवस चांगले आहेत. नोकरदार वर्गाला संवादाची गरज भासेल.
**महिला -** आर्थिक बाबतीत बचत करणे योग्य राहु शकेल. समाजसेवेची आवड राहील.कुटुंबाची जबाबदारी पार पाडावी लागेल.आध्यात्मिक गोष्टीत मन रमवावे लागेल.
**विद्यार्थी -** आरोग्य बरे असेल.
**शुभदिनांक-१३-१४-१५.**

**कर्क - संयम वाढवावा लागेल**.
ग्रहबळ पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना दगदग करुन चालनार नाही.ज्यावेळी सप्ताहात असे भ्रमण असते.त्यावेळी एक गोष्ट लक्षात ठेवावे लागते.ते असे आपण सावधानतेने पाऊल टाकणे गरजेचे राहील.तुमची बाजू सत्य असली तरी ती समोरच्याला पटणार नाही.तेव्हा कोणाला सांगायला किंवा सल्ला द्यायला जाऊ नका."आपले काम भले नि आपण भले" कोणतेही महत्त्वाचे निर्णय सध्या तरी घेऊ नका. सर्व दिवस जपून पाऊल टाका.रविबदल बरा राहील. व्यवसायात जे चालले आहे. ते योग्य असे समजून पुढे चला.
नोकरदार वर्गाने कामात वेळिच लक्ष द्यावे लागेल.
**महिला -** आर्थिक बाजू भक्कम करण्याचा प्रयत्न वेळिच करावा लागेल. जोडीदाराच्या सल्ल्याने सर्व निर्णय घ्यावेलागतील.मानसिकदृष्ट्या शांतता राखावी लागेल.
**विद्यार्थी -** प्रकृतीची काळजी घ्यावी.
**शुभदिनांक-१४-१५-१६.**

**सिंह - मनमानीने निर्णय नकोत.**
ग्रहसंकेत पहाता पूर्वार्ध सप्ताहाचा चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना विचार करुन करत चला.कारण या दिवसांत जे काही निर्णय घेणार त्या निर्णयांना तित केसे यश मिळणार नाही.असे असतानासुद्धा तुम्ही निर्णय घेतले तर ते कदाचित चुकीचे ठरू शकतात.तेव्हा थोडेसे शांत राहून विचार करून मगच निर्णय घ्यावेत.ज्यावेळी दिवस चांगले असतात त्या दिवसांत निर्णय घेणे म्हणजे यशाच्या पायरीपर्यंत पोहोचण्यासारखे असते.कोणतीही घाई करू नका.रविबदल गुंतवनुकीस चांगला.व्यवसायात नवीन गुंतवणूक अविचाराने करू नका. नोकरदार वर्गाने कामाव्यतिरिक्त इतर गोष्टीत लक्ष घालू नका.
**महिला -** आर्थिक नियोजन पक्के करावे लागेल.कुटुंबाशी जुने असलेले वादविवाद टाळावे लागतील.समाजसेवा करतांना विनाकारण चिडचिड करु नका.
**विद्यार्थी -** प्रकृतीत निष्काळजीपणा टाळा.
**शुभदिनांक-१०-११-१२.**

**कन्या - यशस्वी सप्ताह जाणार.**
ग्रहसंकेतपहाता संपूर्ण सप्ताह लाभदाक जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना संवाद साधत चला.चांगले यशमिळवु शकाल.या सर्व दिवसांत कोणतीही देवाण-घेवाण करताना व्यावहारिकपणे करणे अधिक पोषक राहील.भावनिकपणे कोणतेही केलेले व्यवहार कदाचित नुकसानीचे ठरू शकतात.इतरांच्या सांगण्या बोलण्यावर लक्ष देऊ नका.उगाच चांगली वेळ वाया जाऊ शकेल.जेडोळ्यांनी प्रत्यक्षात दिसते त्यावर विश्वास ठेवा. दिवस चांगले असतील.होणारा रविबदल लाभात उत्तम वाढ करु शकेल. व्यवसायात फायद्याचे प्रमाण उत्तम राहु शकेल.नोकरदार वर्गाला वरिष्ठांचे सदैव सहकार्य मिळु शकेल.
**महिला -** समाधानकारक लाभ होऊ शकतील.वायफळ खर्च कमी करावे लागतील.समाजसेवेतून आनंद मिळेल. मैत्रीचे नाते दृढ होईल.घरगुती वातावरण चांगले राहील.
**विद्यार्थी -** साधनेला महत्त्व द्या.
**शुभदिनांक-११-१२-१३.**

**तूळ - समंजसपणा उपयोगी पडेल.**
ग्रहसंकेतपहाता उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल.नियोजितकामे करतांना सफलता मिळवु शकाल.या सर्व दिवसांचा कालावधी अधिक चांगला कसा जाईल ते पाहिलेले बरे राहील.कारण या दिवसांत कदाचित नको त्या गोष्टी मागे लागू शकतात.अशावेळी घाईगडबडीने कोणतीही गोष्ट करणे कदाचित त्रासाचे राहील.या दिवसांत कोणत्याही अफवांना बळी जाऊ नका.अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका.स्वत:चे व्यवहार इतरांच्या हातात देऊ नका.स्वत:च निर्णय घ्यावे लागतील.रविबदल चांगला राहील. व्यवसायात परिळ्माने चांगली परिपक्वता येऊ शकेल. नोकरदार कामात जबाबदारी पडत होती ती कमी होईल.
**महिला -** आर्थिकदृष्ट्या चांगली सफलता मिळु शकेल.राजकीय क्षेत्रात वरिष्ठांचे सहकार्य मिळु शकेल.घरगुती कार्यक्रमाचे नियोजन यशस्वी होऊ शकेल.धावपळ होईल.
**विद्यार्थी -** आरोग्य काळजी घ्या.
**शुभदिनांक-१३-४-१५.**

**वृश्चिक - आदळआपट नुकसान देईल.**
ग्रहसंकेतपहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना संयम वाढवावा लागेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना उगाचच पोकळ आठवणी जागवतील.त्यातुन वेळिच बाहेर पडने बरे राहील.संवाद वाढवावे लागतील.सप्ताहात सर्वच दिवस प्रतिकूल आहेत."हमकरे सो कायदा"याचा धोका वेळिचओळखने बरे राहील.असेच म्हणायला हरकत नाही.कारण असा कोणताच दिवस नाही की त्यात मनस्ताप संताप चिडचिड होनार नाही.रविबदल बरा असेल.नियोजित उपासना सोडु नका. व्यावसायिकदृष्ट्या गुंतवणूक विचारपूर्वक वाढवावी. नोकरदार वर्ग कामात पूर्णपणे व्यस्त राहावे लागेल.
**महिला -** आर्थिक ताणतणाव कमी होईल असे दिसत नाही.हाती घेतलेले आहे त्या कामाला विलंब होईल. जे आहे त्यातच समाधान मानत मानने बरे.राग नको.
**विद्यार्थी -** मित्र दूर होतील.
**शुभदिनांक-१४-१५-१६.**

**धनू - उत्साह वाढु शकेल.**
ग्रहप्रभावपहाता सप्ताहाचा पूर्वार्ध चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना प्रतिसाद मिळु शकेल.सध्या या आठवड्यात असा कोणताच दिवस नाही की जो विशेष काळजी वाढवणारा आहे.मग अशी परिस्थिती असेल त्यावेळी मात्र तुम्ही शांतपणे दिवस पुढे ढकलता. महत्त्वाचे कोणतेही काम करत नाही.तेव्हा सध्या दिवस बर्यापैकी बरे आहेत हे विसरू नका.नियोजित कामाला कदाचित गती येईल.तयारी करून कामाला लागावे लागेल.इतरांची मदतही मिळेल.रवि चांगले यश सुचवतो आहे.व्यवसायात फायद्याचे प्रमाण बर्यापैकी बरे राहु शकेल. नोकरदार वर्ग कामात संदर्भात वरिष्ठांशी चर्चा करावी.
**महिला -** आर्थिक लाभ बरे होऊ शकल.समाजसेवा करण्याची आवड नसली तरी तुम्हाला ती करावी लागेल. धार्मिक कार्यात सहभाग नसला तरी सहकार्य कराल.
**विद्यार्थी -** आरोग्य बरे राहील.
**शुभदिनांक-१०-११-१२.**

**मकर - सफल आठवडा जाईल.**
ग्रहप्रभावपहाता संपूर्ण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना उत्तम यश मिळवु शकाल.सर्व दिवसांचा कालावधी अत्यंत चांगला राहु शकेल.सध्या तुम्ही जे ध्येय ठरवलेले आहे ते ध्येय सहज पूर्ण होणारे आहे.त्यासाठी कोणाची मदत घ्यावी लागणार नाही. स्वत:चे काम स्वत:कराल.तुम्ही घेतलेले निर्णय योग्य असु शकतील. धावपळीचा मार्ग कमी होऊ शकेल.उत्साह वाढेल.अनपेक्षित असे प्रस्ताव तुमच्यापुढे येतील.ते तुमच्यासाठी खूप चांगले असतील. रविबदल लाभ वाढवील. व्यावसायिकदृष्ट्या उत्तमआघाडी मिळवु शकाल.नोकरदार वरिष्ठांचे मत घेऊनच नियमावली तयार करावी.
**महिला -** आर्थिकआवक वाढेल.सध्या सार्वजनिक ठिकाणी वेळ देणे शक्य होणार नाही.जोडीदाराचे सहकार्य उत्तम मिळु शकेल. आध्यात्मिक गोष्टींची आवड राहील.
**विद्यार्थी -** प्रकृतीत चांगली सुधारणा.
**शुभदिनांक-११-१२-१३.**

**कुंभ - सावधानता बरी राहील.**
ग्रहप्रभावपहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊशकेल.नियोजित कामे करतांना यश मिळवु शकाल.कौटुंबिकस्तरावर वावरतांनाहे दिवस एक घाव दोन तुकडे असे करून चालणार नाही.त्यामुळे कदाचित नुकसान होऊ शकते.त्यापेक्षा शांततेच्या मार्गाने गोष्टी चांगल्या होतील. स्वत:वर नियंत्रण ठेवने अधिक पोषक राहु शकेल.वाद विवाद या गोष्टींपासून लांब राहा.आपले मत इतरांवर लादण्याचा प्रयत्न करू नका.समोरच्याला काही गोष्टी नाही पटल्या तर सोडूनद्या.रवि बदल लाभ वाढवील.व्यवसायात भागीदारी व्यवसाय करताना व्यवहाराला महत्त्व द्यावे.नोकरदार वर्गाला सामूहिकरीत्या काम करावे.
**महिला -** वेळेचे महत्व वेळिच ओळखुन वेळेवर कामे करा.लाभ होतील.आर्थिक बाबतीत बचत करावी लागेल कुटुंबात स्वस्थ राहा. आहाराचे पथ्य पाणी सांभाळा.
**विद्यार्थी -** यश मिळवाल.
**शुभदिनांक-१३-१४-१५**.

**मीन - राग नियंत्रीत ठेवावा लागेल.**
ग्रहप्रभाव पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना उगाचच चिडचिड करुन नुकसानओढवुन घेऊ नये.या दिवसांत आळस बाजूला सारून काम करावे लागेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना जबाबदारिने बोलने बरे राहील.समाजात कामे करतांना कोणावर अवलंबून राहून काम करायचे ठरवल्यास ते होणार नाही.तेव्हा कोणाची अपेक्षा ठेवू नका.कोनत्याही गोष्टीचा शुभारंभ या दोन दिवसात करू नका.येणारे प्रस्ताव स्वीकारू नका.नियमबाह्य गोष्टी टाळा. रविबदल वाद नको सुचवतोय. व्यवसायदृष्ट्या पावले जपुन टाकावे लागतील.नोकरदार वर्गाला सध्या आहे त्यात समाधान मानावे लागेल.
**महिला -** वायफळ खर्चाची बाजू कमी करावी लागेल ते सांभाळा. मित्र-मैत्रिणींशी उगाचच सलोखा वाढवु नका. घरगुती वातावरण साधारण बरेराहील.शांत रहाणे बरे.
**विद्यार्थी -** उगाचच चिडचिड नको.
**शुभदिनांक-१४-१५-१६.**

# ... हा जनादेश नाही!

**संसदेत नसलेले,** कॅन्टीनमध्ये बसलेले, संसदीय समितीच्या मिटिंगमध्ये बसलेले असे मिळून दीडशे खासदार एका फटक्यात निलंबित करून घाईघाईने मंजूर केलेली विधेयके आठवतात का ?
त्यातलं सगळ्यात महत्वाचं विधेयक कोणतं होतं?
निवडणूक आयोगाच्या मुख्य आयुक्तांच्या नेमणुकीच्या समितीतून सरन्यायाधीश हटवून केंद्रीय मंत्र्यांचा समावेश करणे.
तीन सदस्य...
पंतप्रधान
विरोधी पक्षनेते
केंद्रीय मंत्री
**बहुमत कुणाचं?**
बरं हा कायदा लोकसभेत मंजूर झाल्यावर स्वतःहून आपल्या अधिकारांमध्ये कपात झाली म्हणून विरोध करायचा लांब, त्याच्या विरोधात लोक कोर्टात गेल्यावर तत्कालीन सरन्यायाधीश गप्प बसले.
मतदारांची संख्या, याद्या, नाव यात घोळ घालायला पुरेसा वेळ मिळावा, प्रचारफेऱ्या होऊ द्याव्यात आणि मग निवडणुका जाहीर कराव्यात यासाठी सरकारच्या हातातली कळसूत्री बाहुली आयुक्त असावी म्हणून दीडशे खासदार निलंबित करून कायदे मंजूर करून घेतले.
संघाने यंव केलं,
त्यंव केल,
समर्पित सतरंजी उचले,
रात्रंदिवस मेहनत,
चोवीस तास इलेक्शन मोड
या सगळ्या माध्यमांनी रचलेल्या कहाण्या आहेत, ज्या यांची चोरी झाकायला माध्यमात पेरल्या गेलेल्या आहेत.
यांची औकात नगरसेवकपदावर निवडून येण्याची नाही असले गुळाचे गणपती संसदेत बसवून हात वर करायला नेमलेत.
या चोरीत सगळे सामील आहेत.
निवडणूक आयोग, माध्यमांचे मालक आणि दलाल, मसुरीचे पेढे खाऊन फुगलेले सरकारी अधिकारी, सगळे सत्तेचे लाभार्थी या चोरीत सहभागी होऊन लोकशाहीचा मुडदा पाडून देशाला लुटायला बोडक्यावर बसलेले आहेत.
यांची सत्ता चोरीची आहे.
हा जनादेश नाही!

**-आनंद शितोळे**

## पत्र मानस

### पाण्याची समस्या सोडवा

पाणी हेच जीवन आहे.त्याशिवाय तरणोपाय नाही. उपलब्ध असलेले पाण्याचे साठे डिसेंबर अखेरीस आटण्यास सुरुवात होते.नद्या, विहीरी,तलाव पावसाळ्यात भरून वाहत असतात. मात्र, हिवाळा संपताच पाण्याचे नैसर्गिक स्रोत कमी कमी होत जातात. महाराष्ट्र सरकार, केंद्र सरकार यांनी पाण्याचे नवीन स्रोत निर्माण करावयास हवेत. ब्रिटिशांनी मुंबईत १५० मैल दुरून मुंबईत पाणी आणले.मुंबई महानगरपालिकेला पाणी पुरवठा करणारे सहा तलाव ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात आहेत. मुंबईतील नागरिकांना ४५०० दशलक्ष लिटर दररोज पाणी लागते.स्वातंत्र्यानंतर मध्य वैतरणा तलावाची भर पडली.मुंबई महानगरपालिकेची लोकसंख्या एक कोटी तीस लाखाहून अधिक आहे.सर्व नागरिकांना पाणी पुरवण्यात प्रशासन कटिबद्ध आहे.अशीच पाणी वितरणाची व्यवस्था अन्य महानगरपालिकांनी विचारात घेऊन काम केले पाहिजे.स्वतःचे पाण्याचे स्रोत निर्माण केले पाहिजेत. महाराष्ट्रातील कोकण विभागात सर्वाधिक पर्जन्यवृष्टी होते.पावसाळ्यात ओढे,नद्या, तलाव भरून पाणी वाहून जाते ते समुद्राला जाऊन मिळते.वाया जाणारे पाणी वाचवण्याचा प्रयत्न सरकार करताना दिसत नाही. सरकारनेच पुढील पन्नास वर्षाच्या साठ्याचा विचार केला तरच पुढील येणारी पिढी वाचेल.कोकणातील ग्रामपंचायती कडून नागरिकांना दररोज अर्धा तास पाणी पुरवठा केला जातो.घरातील कामा करिता लागणारे पाणी,गुरे वासरे यांना पाणी,झाडामाडांना लागणारे पाणी अपूरे पडते.घरात आठ दहा माणसांचे कुटुंब असलेल्यांना अर्धा तासात येणारे पाणी पुरत नाही.नळाला येणारे पाणी लांबून येत असल्याने पाण्याचा दाब कमी असतो. गावातील पाणी समस्या गंभीर आहे.किमान अर्धा दिवस पाणी पुरवठा करता येईल एवढी क्षमता हवी.स्वातंत्र्यानंतर अनेक आमदार, खासदार लोकप्रतिनिधींना मतदारांनी निवडणुकीत निवडून दिले त्यांनी पाणी विषय गांभीर्याने घेतला नाही त्याचाच परिणाम भविष्यात निर्माण होणार आहे.आता तरी विद्यमान आमदार, खासदार यांनी पाणी विषयावर अभ्यास करून सरकार पुढे मांडला तर आणि तरच पाणी समस्येतून भविष्यात सुटका होईल. असे मला वाटते.

**- महादेव गोळवसकर, कुर्ला**

### काँग्रेसनी प्रोटोकॉल पाळला नाही

दिल्ली येथे नुकतीच इंडिया आघाडीची बैठक संपन्न झाली. इंडिया आघाडी म्हणजेच देशातील सर्व प्रमुख राजकीय विरोधी पक्षाचा एक समूह होय. देशातील निवडणूका इंडिया आघाडी यांच्यावतीने पण काँग्रेस खा.राहुल गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली लढवल्या गेल्या होत्या पण दुर्दैवाने त्यांच्या हाती अपयश आले. विशेष म्हणजे खा.राहुल गांधीना संसदेत विरोधी पक्ष नेते करण्यासाठी जी संख्याबळ लागते त्यासाठी शिवसेना उबाठा गटानी काँग्रेसला राज्यात प्रचंड बळ देण्याचे काम केले होते. वेळप्रसंगी काँग्रेसला अभिप्रेत असलेली धर्मनिरपेक्षताला देखील मान्यता दिली. तरी देखील इंडिया आघाडीच्या नुकताच झालेल्या दिल्लीतील बैठकीत माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना उबाठा गटाचे पक्षप्रमुख आ.उद्धव ठाकरेना व्यासपिठ किंवा पहिल्या रांगेत बसवण्या ऐवजी शेवटच्या म्हणजेच सहाव्या रांगेत बसवल्यामुळे काँग्रेस कडून इंडिया आघाडीचा प्रोटोकॉल पूर्णपणे पाळला गेला नाही,असे वाटते.

**श्री संजय गंगाराम साळगांवकर,मुंबई**

### चैतन्याचा स्रोत मंदिरे

भारतीय संस्कृतीत मंदिरांना अत्यंत महत्वाचे स्थान आहे. पूर्वी मंदिरे चैतन्याचे स्रोत तर होतीच शिवाय स्थानिकांच्या चारितार्थाचा भारही मंदिरे उचलत होती. प्रत्येक मंदिराच्या ठिकाणी पूर्वी गोशाळा, गुरुकुल, वेदपाठ शाळा, धर्मशाळा अशी परिपूर्ण विकास रचना होती त्यातून नीती आणि नैतिक मूल्यांचे, आदर्श जीवनशैलीचे आणि धर्माचरणाचे शिक्षण दिले जात असे. पंथनिरपेक्षव्यवस्थेमुळे आज ही स्थिती राहिलेली नाही. मंदिर अधिग्रहण कायदा करून सरकारने देशातील अनेक प्राचिन मंदिरे आपल्या ताब्यात घेऊन त्यावर सरकारी समित्या नेमल्या आहेत. सश्रद्ध भाविकांकडून देवतांच्या चरणी श्रद्धेने अर्पण केलेल्या धनाचा वापर शासकीय योजनांसाठी आणि अल्पसंख्यांक समाजाच्या विकासासाठी हवा तसा वापरला जात आहे. मंदिरावर नेमलेल्या सरकारी अधिकाऱ्यांकडून अनेक ठिकाणी आर्थिक गैरव्यवहार केले गेल्याचीही प्रकरणे उजेडात आली आहेत. हिंदूंनी मंदिरात अर्पण केलेल्या धनाचा वापर खरेतर मंदिराच्या विकासासाठी, धार्मिक विधींसाठी, गोशाळा, गुरुकुल चालवण्यासाठी व्हायला हवा: मात्र असे काही घडताना दिसत नाही. देवधनाकडे सरकारी धन म्हणून पाहिले जात आहे. आश्चर्यांची गोष्ट म्हणजे हे केवळ हिंदूंच्या मंदिरांबाबतचे घडत आहे. आजमितीला देशातील अन्य पंथीयांचे कोणतेही प्रार्थनास्थळ किंवा धार्मिक ठिकाण यांवर सरकारी नियंत्रण नाही. उत्तर भारतातील अनेक मंदिरे आज विकसित करण्यात आली आहेत, त्या ठिकाणी लोकांना पाहण्यासाठी विविध प्रकारची दालने उभारण्यात आली आहेत, भक्तांच्या निवासासाठी आकर्षक इमारती उभारण्यात आल्या आहेत. याठिकाणी हिंदूंना धर्मशिक्षण देण्याची कोणतीच व्यवस्था करण्यात आलेली नाही परिणामी प्राचीन मंदिरे आता पर्यटकांची आकर्षण केंद्रे बनली आहेत. मंदिरांचा विकास करून त्यांकडे राज्याला निधी मिळवून देणारे साधन म्हणून पाहिले जात आहे. समाजाचे दिवसागणिक होत असलेले नैतिक अध:पतन, वाढती गुन्हेगारी, स्त्रियांवरील अत्याचार, गल्लीपासून दिल्लीपर्यंत बोकाळलेला भ्रष्टाचार, नात्यांमधील दुरावा या सर्वांवर उपाय म्हणून समाजात आज नैतिक मूल्ये रुजवणे अत्यंत गरजेचे आहे त्यासाठी मंदिरे भक्तांच्या ताब्यात देऊन प्रत्येक प्राचीन मंदिरांतून गुरुकुल चालवले जावेत.

**- लीना मकरंद गाडगीळ पनवेल.**

### रक्षाबंधनाचे आध्यात्मिक वैशिष्ट्य !

अध्यात्मशास्त्रानुसार जीवांमधील देवाण घेवाण हिशोब संपवून ईश्वरप्राप्ती करून घेण्यासाठी आत्म्याला मानवी जन्म लाभतो. मात्र मानवी जन्मात केलेल्या चांगल्या वाईट कर्मामुळे त्याला पाप-पुण्य लाभते आणि त्याचे फळ भोगण्यासाठी त्याला पुन्हा पुन्हा जन्म घ्यावा लागतो. मानवी जन्मात मिळणारे नातेवाईक, आप्तेष्ट, शेजारी-पाजारी, मित्र मंडळी हा सर्व गोतावळा आपल्याभोवती निर्माण होण्यामागे त्यांच्याशी गेल्या अनेक जन्मांचे आपल्याशी असलेले देवाण घेवाण हिशोब पूर्ण करणे हेच कारण असते. बहीण-भावाचे नाते निर्माण होण्यामागेही हेच कारण आहे. रक्षाबंधन आणि भाऊबीज या सणांमागे पौराणिक कथांचा आधार असला तरी या दोघांतील देवाण घेवाणीचा हिशोब पूर्ण करण्यासाठीच रक्षाबंधन, भाऊबीज या सणांची निर्मिती झाली आहे. स्थूल रूपाने रक्षाबंधन हे जरी बंधन वाटत असले, तरी सूक्ष्म रूपाने वर्षागणिक हा हिशोब पूर्ण होत असतो. त्यामुळे ही संधी बहीण आणि भावाने सोडू नये असे म्हटले जाते. हल्ली रक्षाबंधनाच्या दिवशी भाऊ आपल्याला काय भेटवस्तू देणार याकडे बहिणीचे विशेष लक्ष असते. आध्यात्मिकदृष्ट्या बहिणीने मनात अशी अपेक्षा बाळगल्यास तिला त्याचा अध्यात्मिक लाभ होत नाही. त्यामुळे रक्षाबंधन हे निरपेक्ष भावानेच साजरे व्हायला हवे.

**- नरेश घरत, चेंबूर**

■

## लैंगिक अत्याचारातील सोनारपाडा गावातील इसमाला 20 वर्षांचा तुरुंगवास

**कल्याण** – एका सोळा वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर तिच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार करणाऱ्या एका इसमाला कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयातील बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक न्यायालयाचे विशेष जिल्हा न्यायाधीश एस. एम. चंदगडे यांनी २० तुरूंगवासाची शिक्षा ठोठावली. आणि एक हजार रूपयांचा दंड ठोठावला. राहुल राजू जाधव (३३) असे या इसमाचे नाव आहे. तो डोंबिवली जवळील सोनारपाडा गावात राहतो. मानपाडा पोलीस ठाण्यात या लैंगिक अत्याचार प्रकरणी पीडित मुलीच्या आईने सप्टेंबर २०१९ मध्ये तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी या तक्रारीची चौकशी करून राहुल जाधव याला अटक केली होती. मुलीच्या आईची तक्रार आणि मुलीने दिलेला जबाब आणि इतर सोळा साक्षीदारांचे जबाब, वैद्यकीय अहवाल विचारात घेऊन न्यायालयाने आरोपीला कठोर २० वर्ष तुरूंगवासाच्या शिक्षेचा निर्णय दिला.याप्रकरणात सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी वकील ॲड. अश्विनी भामरे पाटील आणि ॲड. जे. आर. बठेजा यांनी काम पाहिले. मानपाडा पोलीस ठाण्याच्या तत्कालीन पोलीस निरीक्षक मनीषा जोशी यांनी तपास अधिकारी म्हणून काम पाहिले. पोलीस ठाणे आणि न्यायालयातील समन्वयक अधिकारी म्हणून हवालदार ए. आर. गोगरकर, साहाय्यक उपनिरीक्षक गोपाळ निकम, ए. डी. बाशिंगे, प्रवीण माने यांनी काम पाहिले.

# आमचे सरकार लोकांना न्याय देणारे - शिंदे

## चिखलोली-अंबरनाथ येथे नूतन न्यायालयीन इमारतीचे उद्घाटन



प्रतिनिधी

■ अंबरनाथ

चिखलोली-अंबरनाथ येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालयाच्या तसेच नूतन न्यायालयीन इमारतीचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गिरीष कुलकर्णी यांच्या हस्ते तर उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज संपन्न झाले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आज उद्घाटन झालेल्या या न्यायालयाची इमारत अतिशय सुंदर व प्रशस्त झाली आहे. अंबरनाथची ओळख असलेल्या पुरातन शिवमंदिराप्रमाणे हे न्यायमंदिर देखील एक ओळख होईल. या न्यायमंदिरात कायम सत्याचाच विजय होईल. राज्याला निष्पक्ष न्यायदानाची परंपरा आहे. आम्ही विविध उद्घाटने करतो मात्र न्यायालयाचे उद्घाटन करणे ही एक आनंदाची आणि समाधानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, आपले शासन लोकांना न्याय देणारे आहे. मागील अडीच वर्षात ३२ न्यायालयांची स्थापना करण्यात आली आहे.

शिंदे पुढे म्हणाले की, न्यायसंस्था सुदृढ करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. सामान्य नागरिकांना चांगल्या वातावरणात न्याय मिळेल. त्याचप्रमाणे न्यायव्यवस्थेच्या सर्व गरजा पूर्ण करण्याचे काम शासन करेल जेणेकरून नागरिकांना न्याय मिळण्यास मदत होईल.

अंबरनाथसारख्या शहरातील ही न्यायालयाची वास्तू न्याय, समता आणि लोकशाही मूल्यांचे प्रतिबिंब ठरेल, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांनी आज येथे केले. न्यायमूर्ती कुलकर्णी म्हणाले की, वाढत्या लोकसंख्येमुळे अंबरनाथसारख्या ठिकाणी हे न्यायालय झाल्यामुळे न्यायदानाचे काम जलदगतीने होणार आहे. चिखलोली-अंबरनाथ येथील ही न्यायालयीन इमारत आधुनिक असून येथे विविध आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. या आधुनिक इमारतीच्या माध्यमातून 'न्याय आपल्या दारी' ही संकल्पना साकार होण्यास मदत होणार आहे.

यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्रीराम मोडक, न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे, न्यायमूर्ती अद्वैत सेठना, ठाण्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीनिवास अग्रवाल, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाचे अध्यक्ष ॲड.विठ्ठल कोंडे-देशमुख यांच्यासह ज्येष्ठ विधिज्ञ, स्थानिक लोकप्रतिनिधी, संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने ज्येष्ठ विधीज्ञांचा सत्कार तसेच उल्हासनगर बार असोसिएशनच्यावतीने प्रकाशित स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# ना जनाची...ना मनाची ! मनसेचे नेते राजू पाटील यांनी केलेल्या एक्स पोस्टला तुफान प्रतिसाद

प्रतिनिधी

■ डोंबिवली

रक्षाबंधनाच्या दिवशी नागरिकांना ट्रॅफिकचं आंदण आहे... वर्षानुवर्षे तोच रस्ता...तेच ट्रॅफिक... तीच घुसमट आणि तीच मागणी... आता आम्हालाही त्याच त्याच मुद्द्यावरून सरकारला शालजोडीत द्यायला लाज वाटू लागली आहे. यांना ना जनाची...ना मनाची ! अशा शब्दांत माजी आमदार तथा मनसेचे नेते राजू पाटील यांनी एक्स पोस्टच्या माध्यमातून कल्याण-शिळ महामार्गासह याच मार्गावरील देसाई-निळजे-काटई (पलावा जंक्शन) उड्डाण पुलावर शनिवारी सकाळपासून झालेल्या अभूतपूर्व वाहतूक कोंडीला जबाबदार ठरलेल्या शासनावर आसूड ओढले आहेत.



यांना नागरिकांच्या जीवाचे, वेळेचे आणि जीवनाचे काहीही एक पडलेले नाही. रस्ते रुंदीकरण केले, कितीतरी ब्रिज बांधले, त्याचा मलिदा खाऊन झाला. पुन्हा रस्ते आणि पूल दुरुस्त करण्याची वेळ आली. म्हणजे पुन्हा मलिदा खाण्याची संधी उपलब्ध झाली. पण ट्रॅफिकचा प्रश्न काही केल्या या आमच्या 'बालकमंत्र्याला' सोडवता येत नाही. कारण या भ्रष्टनाथ मलिदा खाणाऱ्यांसाठी चॉपर आहेत, हवाईमार्ग आहेत, रस्त्यावरून जायची वेळ आली तर नागरिकांना थांबवून यांच्या गाड्यांसाठी रस्ता मोकळा करणारे ट्रॅफिक कंट्रोलर आहेत. पण सामान्य माणसाचं काय ? कल्याण-डोंबिवलीकरांचं अर्ध आयुष्य या ट्रॅफिकच्या गर्दीतच सुरु होणार आणि या गर्दीतच संपणार ! सत्ताधारी मात्र या टक्केवारीतून ओरबाडलेला पैसा वाटून दुसऱ्यांचे पक्ष फोडून आपली गद्दार गॅंग वाढविण्यात मग्न राहणार.

खरंतर आश्चर्य त्या लोकांचे वाटते ज्या लोकांना या वाहतुककोंडीचा त्रास होतो व तरीही ते धर्माच्या व भावनेच्या आहारी जाऊन या बकासुरांना मतदान करतात, अशा सर्वसामान्यांच्या मनातील भावना मनसेचे नेते राजू पाटील यांनी या पोस्टद्वारे व्यक्त केल्या आहेत. या पोस्टला लाईक करणाऱ्यांसह पाहणाऱ्यांची संख्या लक्षणीय वाढत चालली आहे.

## महत्त्वाचे

### केडीएमसीतर्फे पर्यावरणपूरक कार्यशाळेचे आयोजन

**कल्याण :** पर्यावरणपूरक श्री गणेशोत्सवाची अधिकाधिक जनजागृती व्हावी आणि जनमानसाने आगामी गणेशोत्सवाच्या कालावधीत शाडू मातीच्या मुर्तीची प्रतिष्ठापना करावी या हेतूने कल्याण डोंबिवली महानगरपालिका "हरित बाप्पा फलीत बाप्पा" ही संकल्पना राबवित असून महानगरपालिका व एज्युकेशन टुडे फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार 12 ऑगस्ट रोजी डोंबिवली पूर्व येथील वै.ह.भ.प संत सावळाराम महाराज क्रिडा संकुलांच्या कै. सुरेंद्र वाजपेयी सभागृहात एका भव्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.
ही कार्यशाळा दोन सत्रात होणार असून या कार्यशाळेत महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे 4 हजार विदयार्थी उपस्थित राहण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी एक समृद्ध अनुभव ठरणार आहे. या माध्यमातून विद्यार्थी शाडू माती आणि नैसर्गिक रंगाचा पर्यावरणपूरक वापर करीत पारंपारिक कला सांस्कृतिक मुल्ये आणि निसर्ग संवर्धनाची जाणीव आत्मसात करतील अशी माहिती या कार्यशाळेच्या प्रकल्प प्रमुख तथा कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे यांनी आज आयुक्तांच्या दालनात झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

### उल्हासनगरातून अंमली पदार्थ जप्त

**उल्हासनगर ।** उल्हासनगर क्राईम ब्रांचच्या पोलिसांनी १३१ ग्रॅम वजनाचा मॅफेरोन (एमडी ) हा अंमली पदार्थ विक्री करण्याकरता आलेल्या एका महिलेसह चार जणांना ताब्यात घेतले. यात एका नायजेरियन नागरिकाचा समावेश आहे. पोलीस हवालदार राजेंद्र थोरवे यांना माहिती मिळाली कि एक महिला हिललाइन पोलीस ठाणे परिसरातील नेवाळी भागात एमडी हा अंमली पदार्थ विक्री करीता घेऊन येणार आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक योगेश आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय श्रीरंग गोसावी गणेश गावडे, थोरवे, योगेश वाघ, रितेश वंजारी, मीनाक्षी खेडेकर, कुसुम शिंदे या पोलीस पथकाने नेवाळी भागात सापळा रचून २६वर्षीय नौशिन मैनुद्दीन शेख या महिलेला शिताफीने ताब्यात घेतले. तिच्याकडून ७१.०३ ग्राम वजनाचे एमडी (मेफेड्रॉन )या अंमली पदार्थ सह १४,३१,१२० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तिच्या इतर चार साथीदारांनाही ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून ६० ग्राम (मेफेड्रोन) जप्त करण्यात आले आहे. या छाप्यात एकूण २६लाख ३१हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# एकनाथ शिंदे यांचा ठाणे ते अकोलेपर्यंतचा धावता दौरा

## हेलिकॉप्टर प्रवासावरून सोशल मीडियात मात्र चर्चा

■ ठाणे

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिवसभरात ठाणे, अंबरनाथ, मुंबई, शिर्डी आणि अकोले अशा विविध ठिकाणांचा दौरा केला. न्यायालयाचे उद्घाटन, धार्मिक दर्शन, विकासकामांची उद्घाटने आणि जनसभेत सहभाग अशा अनेक कार्यक्रमांनी त्यांचा दिवस गजबजलेला होता. यासाठी त्यांनी हेलिकॉप्टर, विमानाचा वापर केला. त्यांच्या या धावत्या दौऱ्याची समाज माध्यमांवर चर्चा रंगली होती.

एकनाथ शिंदे हे त्यांच्या व्यस्त आणि दिवस रात्रीच्या दौऱ्यासाठी ओळखले जातात. एखाद्या दिवशी सकाळी सहा वाजता निघून रात्री १- २ वाजता एखाद्या कार्यकर्त्याच्या घरी गणपती दर्शनासाठी जाण्यासही शिंदे मागे पुढे पाहत नाही. त्यामुळे त्यांच्या प्रवासाची कायमच चर्चा रंगत असते. आजही शिंदे यांच्या दौऱ्याची अशीच चर्चा रंगली होती. शिंदे यांच्या दिवसाची सुरुवात ठाणे येथून झाली. तेथून त्यांनी हेलिकॉप्टरने थेट अंबरनाथ येथे प्रस्थान केले. अंबरनाथ न्यायालयाचे उद्घाटन करून त्यांनी नागरिकांशी संवाद साधला. या छोट्या अंतरासाठी हेलिकॉप्टरचा वापर केल्याने सोशल मीडियावर काहींनी टीका केली. मात्र, त्यानंतरही शिंदे यांनी पुन्हा अंबरनाथ ते जुहू असा हेलिकॉप्टर प्रवास केला.

## मनसेला मोठं खिंडार, एकनाथ शिंदेंचा राज ठाकरेंना धक्का

# माजी नगरसेवक, मनसे शहराध्यक्षांसह अनेक पदाधिकाऱ्यांचा शिवसेनेत प्रवेश

■ अंबरनाथ

येत्या काही काळामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होतील. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षामध्ये मोर्चेबांधणीला सुरुवात झाल्याचे पाहायला मिळत आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडूनही निवडणुकीची तयारी सुरु झाली आहे. मनसे निवडणुकीच्या दरम्यान ठाकरे गटासोबत युती करणार असल्याची चर्चा रंगली आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेना ठाकरे गट युतीच्या चर्चा सुरु असताना अंबरनाथमध्ये मनसेला खिंडार पडली असल्याची मोठी बातमी समोर आली आहे. अंबरनाथ येथील मनसेचे माजी नगरसेवक कुणाल भोईर यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांसह शिंदे गटात प्रवेश झाला आहे. अंबरनाथ शहरातील मनसेचे शहराध्यक्ष, जिल्हासंघटक, शहर संघटक आणि माजी नगरसेविका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेमध्ये प्रवेश केला आहे.

ठाण्याच्या आनंद आश्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत मोठा पक्षप्रवेशाचा कार्यक्रम पार पडला आहे. या कार्यक्रमादरम्यान मनसेचे शहराध्यक्ष कुणाल भोईर, जिल्हा संघटक संदीप लकडे, शहर संघटक स्वप्नील बागुल आणि माजी नगरसेविका अपर्णा भोईर शिंदेसेनेत प्रवेश करणार आहेत. यामुळे अंबरनाथमध्ये मनसेला सलग धक्के बसले आहेत.

हिंदी भाषेच्या सक्तीवरुन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने मराठीचा, मराठी भाषेचा मुद्दा लावून धरला. या निमित्ताने तब्बल वीस वर्षांनी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे बंधू एकाच व्यासपीठावर एकत्र आले. मराठीसाठी एकत्र आलेले ठाकरे बंधू युती कधी करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या दरम्यान मनसेची मोर्चेबांधणी सुरु असताना पक्षाला अंबरनाथमध्ये खिंडार पडले आहे.

पान 1 वरून

### 334 राजकीय पक्षांना दाखवला घरचा रस्ता

*सुरू करण्याचे निर्देश दिले होते. या प्रक्रियेअंतर्गत, अधिकाऱ्यांनी या पक्षांची चौकशी केली, त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आणि वैयक्तिक सुनावणीद्वारे त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली. नंतर सबंधित अधिकाऱ्यांच्या अहवालाच्या आधारे ३४५ पैकी ३३४ राजकीय पक्षांना अटींचे पालन न केल्याबद्दल आपल्या यादीतून काढून टाकले आहे. भारतीय निवडणूक आयोगाच्या लोकप्रतिनिधीत्व कायदा-१९५१ च्या कलम २९अ अंतर्गत आयोगाच्या या कारवाईनंतरही देशात मान्यताप्राप्त नसलेल्या २८५४ पक्षांपैकी २,५२० राजकीय पक्ष शिल्लक आहेत. भारतात राजकीय पक्षांच्या नोंदणीबाबतच्या नियमानुसार, एखादा पक्ष सलग ६ वर्षे निवडणूक लढवत नसेल तर त्याचे नाव नोंदणी यादीतून काढून टाकले जाते. कलम २९अ अंतर्गत नोंदणीच्या वेळी, राजकीय पक्षांना त्यांचे नाव, पत्ता, पदाधिकाऱ्यांची यादी इत्यादी माहिती द्यावी लागते आणि त्यात काही बदल झाल्यास, आयोगाला तात्काळ कळवावे लागते. आणि मान्यताप्राप्त नसलेल्या राजकीय पक्षांची नोंदणी केली जाते.*

### कोर्टाचा आदेश झुगारून कबुतरांना खायला घालणाऱ्या महेंद्र संकलेचाला पोलिांचा दणका

दादरमध्येच येणार, कितीही लोकांना त्रास झाला तरी. याकडे पोलीस आरटीओ आणि महानगरपालिका सगळ्यांनी लक्ष घातलं पाहिजे, अशी मागणी मनीषा कायंदे यांनी केली. कबुतरखान्याचा प्रश्न सामाजिक आहे की धार्मिक आहे? त्यांचा इगो हर्ट झाल्यासारखं ते वागतात. ही थोडीथोडकी लोक आहेत, त्यांना काय सिद्ध करायचे आहे? त्यांच्या समाजामधल्या नेत्यांनी समोर यावं आणि यावर तोडगा काढावा. एवढं तुमचं कबुतरांवर प्रेम आहे, तर सगळ्या प्राण्यांवरदेखील प्रेम करा. जैन मंदिरात जाळ्या का लावल्या, असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला. तर ते म्हणाले की, मंदिरातील पंख्यामध्ये अडकून कबुतरं मरतील, पण मग तुम्ही पंखे का नाही बंद करत? कबुतरांमध्ये दुसऱ्यांचे नुकसान झाले तर चालेल. कबुतरांची वाढ झपाट्याने होत आहे. यावर काहीतरी अंकुश आणला पाहिजे. जैन समाजाच्या आंदोलनावेळी काही महिला तिकडे चाकू घेऊन आल्या होत्या. त्यांना तिकडे बोलावण्यात आले होते, हे सगळं व्हिडीओत स्पष्टपणे दिसत आहे. तुमचं कबुतरांवर प्रेम आहे, तर तुम्ही तुमच्या पिंजरामध्ये दोन-चार कबुतरं ठेवा. तुम्हाला सार्वजनिक जागेत वाद का निर्माण करायचा आहे, असा सवाल मनीषा कायंदे यांनी उपस्थित केला.

### पतीने पत्नीसह दोन चिमुकल्या लेकींना संपवलं

प्रदीपला जुगाराचा नाद होता. तो जयश्रीला मारहाण करायचा, अशी माहिती जयश्रीचा भाऊ चंद्रभाननं दिली.या घटनेचा तपास करणाऱ्या पोलिसांना प्रदीपच्या घरी तिन्ही मृतदेह सापडले. शनिवारी सकाळी सव्वा सातच्या सुमारास पोलिसांना घटनेची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी लगेचच घटनास्थळ गाठलं. पोलिसांनी पुरावे गोळा करुन फॉरेन्सिक पथकाला पाचारण केलं. मृतदेह ताब्यात घेऊन ते शवविच्छेदनासाठी जीटीबी रुग्णालयात पाठवले. या प्रकरणी पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३ (१) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

### शत्रूचे मोठे नुकसान

शकलो की त्यांना स्पष्टपणे जाणवले की जर त्यांनी हे असेच चालू ठेवले तर त्यांना त्याची खूप जास्त किंमत मोजावी लागेल, म्हणून त्यांनी पुढे येऊन आमच्या डीजीएमओला संदेश पाठवला की त्यांना बोलायचे आहे. आमच्याकडून ते मान्य झाले. बालाकोटच्या भूतापासून सुटका: २०१९ मध्ये जेव्हा आम्ही बालाकोटमध्ये हवाई हल्ले केले तेव्हा आम्हाला त्याचे पुरावे जमवता आले नाहीत. आम्ही काय केले किंवा काय केले नाही याबद्दल लोकांनी प्रश्न उपस्थित केले. त्यामुळे मला खूप आनंद आहे की यावेळी आम्ही बालाकोटच्या त्या भूताचा सामना करू शकलो आणि आम्ही काय साध्य केले आहे हे जगाला सांगू शकलो.

### आण्विक कचरा समुद्रात पडला

एका वृत्तानुसार प्रदूषणावर लक्ष ठेवणारी सरकारी संस्था असलेल्या स्कॉटिश एन्व्हायरमेंटल प्रोटेक्शन एजन्सीच्या फाईल्समधून जुन्या आणि जीर्ण झालेल्या १५०० पाईपलाईन फुटल्याने ही गळती झाली आहे.

# भिवंडीत बलात्काराच्या गुन्ह्यातील आरोपी पळाला...

## न्यायालयात नेण्यासाठी नेमलेले 6 पोलीस कर्मचारी निलंबित

प्रतिनिधी

■ ठाणे

ठाणे येथील मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांना कळवा रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी नेताना गंभीर त्रुटी केल्याप्रकरणी ठाणे पोलीस दलातील नऊ पोलीस कर्मचारी निलंबित झाले. असे असतानाच आता, भिवंडीत बलात्काराच्या गुन्ह्यातील आरोपी पळून गेल्याने ६ पोलीस कर्मचारी निलंबित करण्यात आले आहेत. यामुळे गेल्या दोन दिवसात एकूण १५ पोलिसांवर निलंबनाची कारवाई झाली आहे.

ठाणे मध्यवर्ती कारागृह येथील ५ आरोपींना भिवंडी न्यायालय येथे ४ ऑगस्ट रोजी ५ आरोपी हजर करण्यासाठी ठाणे पोलिसांनी पथक नेमले होते. यातील महिला पोलीस शिपाई संगिता अशोक चोखंडे यांच्याकडे एस.एल.आर. रायफल आणि ५० जिवंत काडतुसे देण्यात आली होती तर, पोलीस शिपाई विकास प्रेमराव चाटे यांच्याकडे तीन बेडी देण्यात आल्या होत्या. हे पथकाच्या ताब्यात असलेल्या आरोपीमध्ये भिवंडी शहर पोलीस ठाण्यात बलात्काराच्या आरोपाखाली अटक असलेल्या सलामत अली अन्सारी (३२ ) याचा समावेश होता.

सलामत हा भिवंडीतील फेणेगावात राहत होता. तो मूळचा बिहार राज्यातील मधुबन जिल्ह्याचा रहिवाशी होता. त्याला पथकाने न्यायालयात हजर केले असता, तो गर्दीचा फायदा पोलिसांच्या रखवलीतून पळून गेला. याप्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले नाही आणि कायदेशीर रखवालीतून पळून गेला. यामुळे कर्तव्यावर सतर्क न राहता निष्काळजीपणा आणि हालगर्जीपणाचे कृत्य करुन महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम क्र.३ (तीन) चे उल्लंघन केले आहे, असा ठपका पथकातील ६ पोलीस कर्मचारी निलंबित करण्यात आले आहेत. पोलीस हवालदार अमोल बाळासो तरटे, पोलीस शिपाई मोतीराम दत्ता ढेबरे, पोलीस शिपाई दत्ता बबनराव सरकटे, पोलीस शिपाई दिपक शिवदास इंगळे, पोलीस शिपाई विकास प्रेमराव चाटे, महिला पोलीस शिपाई संगिता अशोक चोखंडे यांचा समावेश आहे. ठाणे पोलीस मुख्यालयाचे पोलीस उपायुक्त डॉ. पवन बनसोड यांनी ही कारवाई केली आहे.

यापूर्वी नऊ पोलीस निलंबित

ठाणे मध्यवर्ती कारागृहातील सात न्यायबंदींना ४ ऑगस्टला ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात तपासणीसाठी नेण्यात येत होते. त्यासाठी ठाणे पोलीस मुख्यालयातील नऊ कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली होती.

### एमडी विक्रीसाठी आलेल्या तरुणाला अटक

**ठाणे :** मुंब्रा शहरातील मित्तल मैदान येथे मेफोड्रॉन (एमडी) हे अमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्या मोहम्मद सैफ चष्मावाला (२५) याला मुंब्रा पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी या तस्कराकडून एक लाख ५७ हजार रुपयांचे एमडी हे अमली पदार्थ, ॲपल कंपनीचा मोबाईल, वाहन क्रमांक नसलेली दुचाकी, वजन काटा, बॅग असा एकूण दोन लाख १७ हजार रुपो किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. मुंब्रा येथील मित्तल मैदान येथे एकजण अमली पदार्थ विक्रीसाठी येणार असल्याची माहिती मुंब्रा पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे, रविवारी

# ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयात रक्षाबंधनाचा कार्यक्रम मोठ्या दिमाखात साजरा

प्रतिनिधी

■ ठाणे

सालाबादप्रमाणे याही वर्षी माजी वृक्ष प्राधिकरण समितीचे सदस्य अभिजीत कमलाकर चव्हाण यांच्यामार्फत विठाई प्रतिष्ठान ह्यांनी ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयात रक्षाबंधन सण साजरा केला.



रक्षाबंधनाचे हे 19 वे वर्ष असून सदर कार्यक्रमाला आनंद विश्व गुरुकुल चे, राष्ट्रीय सेवा योजनेचे 50 विद्यार्थी उपस्थित होते. हे लोक घरी जाऊन हे सण साजरे करू शकत नसल्यामुळे आम्ही यांच्यासाठी रक्षाबंधनाच्या कार्यक्रम गेले अनेक वर्ष या रुग्णालयात येऊन साजरा करतो व या सणाचे पावित्र्य राखतो. या कार्यक्रमाच्या माध्यमातून समाजामध्ये असणारे विविध रंग आम्हाला पाहायला मिळतात. रुग्ण सुद्धा आतुरतेने रक्षाबंधनाच्या या कार्यक्रमाची वर्षभर वाट बघत असतात अभिजीत चव्हाण यांनी मार्गदर्शन करताना सांगितले.

# पाच तासाहून अधिक काळ भाऊराया अडकले कल्याण शीळ रस्त्यावरील कोंडीत

प्रतिनिधी

■ कल्याण

दुपारी भोजनाच्या वेळेत बहिणीच्या घरी पोहचून राखी बांधून झाल्यावर पुन्हा परतीची गणित करणारे लाडके भाऊराया शनिवारी रक्षा बंधनाच्या दिवशी कल्याण शीळ रस्त्यावरील वाहतूक कोंडीत पाच तासाहून अधिक काळ अडकून पडले. भोजनाची वेळ टळून गेली तरी भाऊराया घरी न पोहचल्याने अनेक बहिणी हिरमुसल्या. मागील दोन दिवसांपासून शीळ रस्ता कोंडीने गजबजून गेला आहे. त्यामुळे प्रवासी त्रस्त आहेत.

अंबरनाथ भागात असलेला न्यायालयाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि न्यायालयातील वरिष्ठ या रस्त्यावरून जाणार असल्याने काटई बदलापूर रस्ता, कल्याण शीळ रस्ता रस्ता किमान शनिवारी तरी वाहतुकीसाठी सुटसुटीत असेल असा विचार करून अनेक नागरिक आपल्या बहिणीकडे राखी बांधण्यासाठी वाहनाने निघाले होते. अनेक बहिणी आपल्या भावाकडे राख्या बांधणीसाठी वाहनाने निघाल्या होत्या. कल्याण शीळ रस्त्यावर नेहमीप्रमाणे वाहनांच्या रांगा बघून प्रवासी अस्वस्थ झाले. सकाळपासून ही कोंडी कायम असल्याचे आणि पाच तासाहून अधिक काळ आम्ही कोंडीतून प्रवास करत असल्याचे अनेक प्रवाशांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अंबरनाथ येथील न्यायालय उद्घाटन कार्यक्रमासाठी ठाणे येथून हेलिकॉप्टरने जाणे पसंत केले. त्यामुळे ते कोंडीच्या विळख्यातून बचावले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी शीळ रस्त्यावरील कोंडी सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

काटई ते खिडकाळी भागातील सुमारे शंभरहून अधिक ग्रामस्थांनी रस्त्याची भरपाई मिळत नाही, तोपर्यंत एक इंच जमीन शीळ रस्त्यासाठी न देण्याचा निर्धार केला आहे. या भरपाईसाठी सुमारे ३०७ कोटी शासनाने मंजूर केले आहेत. ही रक्कम शेतकऱ्यांना देण्याचे उपमुख्यमंत्र्यांचे आदेश होते. लोकसभा, विधानसभा निवडणूक काळात ही रक्कम मिळण्याची शक्यता होती. निवडणुका संपल्या आणि भरपाईचा विषय नंतर राजकीय मंडळींनी गुंडाळला. त्याचा फटका आता प्रवाशांना बसत आहे.

# रक्षाबंधनानिमित्त ठाणे बाजारपेठा गजबजल्या

■ ठाणे

रक्षाबंधन सणानिमित्ताने ठाणे शहराच्या मध्यवर्ती भागातील बाजारपेठांमध्ये नागरिकांनी शनिवार सकाळपासूनच खरेदीसाठी गर्दी केली होती. यामुळे गोखले रोड, राम मारुती रोड, जांभळी नाका, ठाणे स्थानक परिसर खरेदीसाठी आलेल्या नागरिकांनी फुलून गेला. राखी खरेदी, भेटवस्तू तसेच अनेक वस्तू खरेदीसाठी बाजारपेठांमध्ये गर्दी झाली होती. शिवाय विविध प्रकारच्या मिठाई खरेदीसाठी दुकानांमध्ये ग्राहकांची झुंबड उडाली. त्यामुळे परिसरातील मार्गांवर वाहनांचा भार वाढून कोंडी झाल्याचे चित्र दिसून आले.

भावाबहिणीच्या नात्याची वीण जपणाऱ्या सणासाठी आठवड्याभरापासूनच बाजारपेठा सजल्या होत्या. राखी, भेटवस्तू आणि इतर अनेक गृहोपयोगी वस्तुंच्या खरेदीसाठी नागरिक अनेक दिवसांपासून बाजारांमध्ये येत होते. विविध प्रकारच्या राख्या खरेदी करण्यासाठी ही गर्दी पाहायला मिळत होती. बाजारात पारंपारिक राखीबरोबरच लहान मुलांसाठी विविध प्रकारच्या राख्या उपलब्ध होत्या. यासोबतच भेटवस्तूच्या बॉक्समध्ये राखीसह की-चेन, पेनड्राईव्ह, मिनी टॉर्च, चॉकलेट बॉक्स, परफ्यूम, पुरुषांचे पाकिट अशा विविध साहित्यांचा समावेश आहे. हे भेटवस्तूंचे बॉक्स ग्राहकांचे विशेष लक्ष वेधत आहेत.

## बीड जिल्हाधिकाऱ्यांना शपथपत्र दाखल करण्यासाठी 14 ऑगस्टची डेडलाईन

**बीड:** आष्टी (जि. बीड) शहरातील नगरपंचायत निवडणुकीतील बोगस मतदाराच्या अहवालावर कारवाईबाबत जिल्हाधिकारी बीड यांनी 14 ऑगस्टपर्यंत शपथपत्र दाखल करावे अन्यथा शासनाचे काहीही म्हणणे नाही, असे समजून पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती श्रीमती विभा कंकणवाडी व न्यायमूर्ती संजय देशमुख यांनी दिले आहेत. आष्टी (जि. बीड) विधानसभा मतदारसंघांमध्ये 1 नोव्हेंबर 2023 च्या प्रारूप यादीमध्ये जवळपास 550 मतदारांची नावे बनावट कागदपत्राच्या आधारे नगरपंचायत हद्दीत, भागात समाविष्ट करण्यात आल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते राम सूर्यभान खाडे, नदीम शेख व इतरांनी केल्या होत्या. सदरील प्रकरणांमध्ये तत्कालीन आमदार बाळासाहेब आजबे यांनी देखील तक्रार केली होती. या प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी पाटोदा यांनी चौकशी करून जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे अहवाल सादर केला.



**म ह त्वा चे**

### रक्षाबंधनासाठी गावी आलेल्या तरुण इंजिनिअरचा मृत्यू

**गडचिरोली :** गडचिरोली जिल्ह्यातून एक दु:खद घटना समोर आली आहे. शेताच्या जवळ असलेल्या नाल्याच्या पाण्यात बुडून एका तरुण इंजिनिअरचा मृत्यू झाला आहे. हा तरुण रक्षाबंधनाच्या सुट्टीच्या निमित्ताने गावी आला होता. महावितरण विभागात असिस्टंट इंजिनिअर या पदावर तरुण कार्यरत होता अशी माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, महावितरण विभागात सहाय्यक अभियंता पदावर असलेल्या तरुणाचा गडचिरोलीमध्ये मृत्यू झाला आहे. या तरुणाचे नाव दलसु नरोटे असे आहे. ते नांदेड तालुक्याच्या मुखेड येथील महावितरण विभागात कार्यरत होते. दलसु नरोटे यांच्या नाल्याच्या पाण्यात बुडून मृत्यू झाला असून ही घटना गडचिरोलीतील एटापल्ली तालुक्यातील कारमपल्लीत घडली आहे. जागतिक आदिवासी दिवस, रक्षाबंधन आणि लगेच रविवार अशा लागोपाठ सुट्टा असल्याने दलसु नरोटे हे त्यांच्या पत्नी आणि दोन मुलांना घेऊन त्यांच्या गावी आले होते. काल शुक्रवारी (८ ऑगस्ट) दलसु हे शेतामध्ये रोवणीचे काम सुरु असल्यामुळे शेतावर गेले होते. ते शेताच्या जवळच्या नाल्यावर गेले. तेव्हा दुर्घटना घडली. शेतालगत असलेल्या नाल्यावर फिरत असताना दलसु यांनी फिट (मिर्गी) आली. यामुळे ते नाल्याच्या पाण्यात पडले. शरीराची हालचाल न करता आल्याने पाण्यात बुडून त्यांचा मृत्यू झाल्याचे म्हटले जात आहे. बऱ्याच वेळापासून दलसु घरी न परतल्याने कुटुंबीयांनी शोध घ्यायला सुरुवात केली. तेव्हा कुटुंबीयांना दलसु पाण्यात पडले असल्याचे दिसले. या घटनेमुळे संपूर्ण गावामध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

### तळंदगे येथे पुरलेले अर्भक आढळून आल्याने खळबळ

**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्ह्यातील हुपरी परिसर पुन्हा एकदा धक्कादायक घटनेमुळे हादरला आहे. तळंदगे गावातील एमआयडीसी रस्त्यालगत असणाऱ्या फडतारे यांच्या उसाच्या शेतात दोन ते तीन महिन्याचे अर्भक पुरलेल्या अवस्थेत आढळून आला. या अमानुष घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. शेतमालक धोंडिबा फडतारे हेआपल्या शेतात गेले असता, जमिनीत काहीतरी पुरल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तात्काळ पोलीस पाटील यांना याची माहिती दिली. माहिती मिळताच हुपरी पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांची घटनास्थळी धाव पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला.

### वर्षभरानंतर दुचाकी चोर पकडला

**वर्धा:** धामणगाव रेल्वे परिसरातील वाढत्या दुचाकी चोरीच्या घटनांमधील चोरांच्या शोधात असलेल्या गुन्हे शाखेने वर्धा जिल्ह्यातील एका अट्टल दुचाकी चोराला अटक केली आहे. आकाश पुरुषोत्तम चव्हाण (वय ३०, रा. बोरखेडी) असे आरोपीचे नाव असून शहरातून दोन वर्षांपूर्वी चोरीला गेलेल्या दुचाकीसह त्याला गुन्हे शाखेने ताब्यात घेतले आहे.शहरात ०७ डिसेंबर २०२३ रोजी नवीन रामदासजी धोटे (वय ३० वर्ष रा. रामदेवबाबा नगर, धामणगांव रेल्वे) यांची बजाज पल्सर क्र. एमएच २७ सी.क्यु. ८२१४ घरासमोर उभी होती. अज्ञात चोरट्याने ती लंपास केली.

# निवडणूक आयोग भाजपसाठी काम करत असल्याची शंका सर्वांच्याच मनात!

**प्रतिनिधी**
■ **संगमनेर**

लोकसभेचे विरोधी पक्षनेते तथा काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याकडून निवडणुक अयोगावर आरोप सुरूच आहेत. तर दुसरीकडे आता राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी देखील मोठा गौप्यस्फोट केला आहे. शरद पवार यांच्या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधान आले आहे. ‘ महाराष्ट्र विधानसीा निवडणूकीपूर्वी 2 माणसं मला भेटायला आली होती. ही दोन माणंस मला विधानसभेच्या 288 जागांपैकी 160 जागा निवडुन आणण्याची गॅरंटी देत होते. 160 जागांवर ते मतांची फरफार



करण्याबाबत मला सांगत होते, असा दावा शरद पवार यांनी केला आहे.

अलीकडच्या काळातला निवडणुका खूप संशयास्पद होत आहेत, त्यामुळे हे नाकारता येणार नाही. अनेक शंका आजही निर्माण होत आहेत. राहुल गांधींनी जे मांडलं त्याचं उत्तर निवडणुक आयोग देऊ शकलं नाही. हरियाणा पुन्हा भाजपकडे जातं, हे कसं होऊ शकतं? शंका घेण्याचसाठी अनेक जागा आहेत, शंकांचं निरसन करणे ही निवडणुक आयोगाची जबाबदारी आहे, मात्र निवडणुक आयोग उत्तर देऊ शकत नाही, ही वस्तस्थिती आहे.

शरद पवारांनी सांगितल्याप्रमाणे असे काही एजंटच फिरत असतील, तर ईव्हिएम संदर्भातही प्रश्न निर्माण होतो. मतदानावर लोकशाही चालते, त्या मतदानावरच शंका निर्माण होत असेल तर ही निवडणुक आयोगाची जबाबदारी आहे. अत्यंत निरपेक्ष आणि पारदर्शक निवडणुका होणं, अत्यंत गरजेचं आहे. निवडणुक आयोग भाजपसाठी काम करत आहे, ही शंका सर्व जनतेच्या मनात आहे. अत्यंत निरपेक्ष आणि पारदर्शक निवडणुका होणं, अत्यंत गरजेचं आहे. निवडणुक आयोग भाजपसाठी काम करत आहे, ही शंका सर्व जनतेच्या मनात आहे, असं यावेळी बोलताना बाळासाहेब थोरात यांनी म्हटलं आहे.

दरम्यान दुसरीकडे शरद पवार यांच्या या वक्तव्याचा भाजपकडून देखील जोरदार समाचार घेण्यात आला आहे. शरद पवारांनी जो काही आरोप केला तो बिनबुडाचा आहे. तथ्यहीन आहे, या राज्यातील जनतेचा अपमान करणारे हे आरोप आहेत, त्यांच्या आरोपांमध्ये काहीही तथ्य नाही, असं भाजप नेते रावसाहेब दानवे यांनी म्हटलं आहे.

# ज्यांना मी दूध पाजलं तेच उलटले

## खडसेंकडून पुन्हा एकदा महाजनांवर निशाणा

**प्रतिनिधी**
■ **जळगाव**

राष्ट्रवादी काँग्रेस शदरचंद्र पवार पक्षाचे नेते एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकर यांना पुणे पोलिसांनी रेव्ह पार्टी करताना रंगेहात पकडले आहे. याप्रकरणी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर प्रांजल खेवलकरांविरुद्ध गंभीर आरोप करताना दिसत आहेत. रुपाली चाकणकरांच्या आरोपानंतर त्यांना प्रत्युत्तर देताना एकनाथ खडसे यांनी त्या चेकाळल्या आहेत, असा उल्लेख केला होता. यानंतर एकनाथ खडसे यांच्या विरोधात भाजपा महिला पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी (08 ऑगस्ट) जोरदार आंदोलन केले होते. याचपार्श्वभूमीवर आता एकनाथ खडसे यांनी रुपाली चाकणकर यांना उद्देशून केलेल्या वक्तव्या प्रतिक्रिया दिली आहे.

चेकाळणे या शब्दाचा अर्थ गुगलवर जाऊन एकदा तपासा,



असे आवाहन करताना एकनाथ खडसे म्हणाले की, भाजपवाल्यांना महाराष्ट्रात राहून मराठीचा अर्थ समजत नसेल तर मला त्यांच्या बुद्धीची कीव येते. कारण चेकाळणे या शब्दाचा आवेशाने, खवळणे आणि असे अनेक अर्थ होतात. त्यामुळे एकदा गुगलवर जाऊन ते पाहा. परंतु ज्यांना मी दूध पाजलं मोठं केलं, तेच माझ्या विरोधात आंदोलन करत आहेत, याचे खूप दु:ख झाल्याची खंत त्यांनी बोलून दाखवली. तसेच रूपाली चाकणकर यांचा आदराने मी तेरा वेळा ताई असा उल्लेख केला, जर ही गोष्ट माहित नसेल, एकदा माझी प्रतिक्रिया नीट पाहा. परंतु किरीट सोमय्या यांचे नागडे फोटो दाखवले तेव्हा तुम्ही आंदोलन का केले नाही? असा सवाल देखील खडसे यांनी यावेळी विचारला.

गिरीश महाजन यांचे नाव न घेता एकनाथ खडसे म्हणाले की, काहीही झालं तरी मी प्रफुल लोढाच्या संदर्भातला विषय सोडणार नाही. कारण प्रांजल खेवलकर या प्रकरणात पुण्यातील पोलीस तोंडघशी पडलेले आहेत. तसेच लोढाकडे मुलींच्या कोणत्या व्हिडीओ क्लिप आहेत त्या तपासा आणि कोणत्या मंत्र्याच्या सीडी आहेत ते देखील तपासा. नाशिकच्या हनीट्रॅपमध्ये 72 अधिकारी आणि 4 मंत्री आहेत. याची सखोल चौकशी पोलिसांनी करावी, ही मागणी मी नाही तर राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली आहे.

# रक्षाबंधनाच्या दिवशी चिमुकल्याचा मृत्यू

**प्रतिनिधी**
■ **नाशिक**

नाशिकच्या वडणेर दुमाला गावात रक्षाबंधनाच्या दिवशी हृदय पिळवटून टाकणारी घटना घडली. बिबट्याच्या हल्ल्यात एका ३ वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू झाला आहे. मात्र, या दुःखद प्रसंगात त्याची नऊ वर्षांची बहिण साश्रूनयनांनी भावाच्या थंड हातावर राखी बांधून निरोप देताना दिसली. हे हृदयद्रावक दृश्य पाहून संपूर्ण गाव शोकसागरात बुडाला.

ही घटना शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. आयुष भगत (वय वर्ष ३) असे मृत चिमुकल्याचे नाव आहे. ३ वर्षीय चिमुकला रात्रीच्या सुमारास घराबाहेर खेळत होता. अचानक दबा धरून बसलेल्या बिबट्यानं झडप घातली. नंतर त्याला उचलून नेलं. काही वेळानंतर त्याचा मृतदेह सापडला. आज रक्षाबंधन. चिमुकल्याला देखील ९ वर्षांची बहीण आहे.

बहिणीला भावाच्या मनगटावर राखी बांधून सण साजरा करायचा होता. दरम्यान, अंत्यसंस्कारापूर्वीच तिने भावाच्या थंड हातावर राखी बांधली आणि अश्रूंनी निरोप दिला. या क्षणी उपस्थित प्रत्येकाच्या डोळ्यात पाणी तर आलंच, तसेच गावभर हळहळ व्यक्त झाली. बहिणीचं हे रक्षाबंधन आयुष्यभरासाठी वेदनेचं गाठोडं बनलं आहे.

# बारामती विमानतळावर पुन्हा विमान अपघात उड्डाणानंतर चाक निखळले

## पायलटकडून इमर्जन्सी लँडिंग; दोन वर्षांत तिसरी दुर्घटना, जीवितहानी नाही

**प्रतिनिधी**
■ **पुणे**

बारामती विमानतळावर शनिवारी सकाळी रेड बर्ड या वैमानिक प्रशिक्षण देणाऱ्या कंपनीच्या शिकाऊ विमानाचा अपघात झाला. विमान उतरताना पुढील टायर निखळल्याने विमान धावपट्टी सोडून गेले. या घटनेत विमानाच्या पंख्याचे आणि चाकाजवळील काही भागांचे नुकसान झाले आहे. मात्र कोणतीही जीवितहानी झाली नाही.

बारामती विमानतळावर रेड बर्ड या वैमानिक प्रशिक्षण संस्थेचे शिकाऊ वैमानिक विवेक यादव हे विमान उतरवत असताना चाकात बिघाड झाल्याचे लक्षात आले. त्यांनी तातडीने इमर्जन्सी लँडिंगचा प्रयत्न केला. सकाळी पावणे आठच्या सुमारास अपघात



झाला. अपघातानंतर कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी विमान बाजूला घेऊन दुरुस्ती केली. सुदैवाने या प्रकारात कोणतीही मोठी जीवितहानी झाली नाही. मात्र, रेड बर्ड एव्हिएशनने अद्याप या घटनेवर कोणतेही अधिकृत निवेदन दिलेले नाही.

विशेष म्हणजे, रेड बर्ड एव्हिएशनच्या विमानांना गेल्या दोन वर्षांत हा तिसरा अपघात आहे. त्यामुळे बारामतीतील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. यापूर्वीही रेड बर्डच्या दोन शिकाऊ विमानांचे अपघात झाले होते, त्यानंतर डीजीसीएने कंपनीवर निर्बंध लादले होते. काही महिन्यांपूर्वी हे निर्बंध उठल्यानंतर प्रशिक्षण पुन्हा सुरू झाले होते.

अपघातग्रस्त विमान जर एखाद्या घरावर, शाळेवर किंवा औद्योगिक वसाहतीवर कोसळले असते, तर भीषण दुर्घटना घडली असती, अशी भीती स्थानिकांनी व्यक्त केली आहे. या संस्थेविरोधात पूर्वीपासूनच अनेक तक्रारी करण्यात आल्या असूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

दरम्यान, भाजप युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस वैभव सोलनकर यांनी या घटनेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. “उद्या एखादे विमान कोणाच्या घरावर किंवा कंपनीवर कोसळले, तर त्याची जबाबदारी कोण घेणार?” असा सवाल त्यांनी उपस्थित केला. शहराच्या नागरी वसाहतीजवळून होणारी प्रशिक्षण उड्डाणे थांबवण्यात यावीत. बारामतीतील नागरिकांच्या सुरक्षेसाठी कायमस्वरूपी उपाययोजना राबवण्यात याव्यात. या गंभीर प्रकाराची प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी. यासंदर्भात लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री मुरलीधर मोहोळ यांची भेट घेऊन सविस्तर माहिती देण्यात येणार असल्याचे वैभव सोलनकर यांनी सांगितले. विशेष म्हणजे, सोलनकर यांनी याआधीच केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे रेड बर्डविषयी तक्रार करून चौकशीची मागणी केली होती.

# सहस्त्रकुंड प्रकल्पाविरोधात शेतकऱ्यांचा एल्गार

## सिरपल्ली येथे 40 गावांतील शेतकऱ्यांची भव्य सभा

**प्रतिनिधी**
■ **हिमायतनगर**

सहस्त्रकुंड जलविद्युत प्रकल्पाला मंजुरी देण्याची मागणी हदगाव आणि उमरखेड विधानसभा मतदारसंघाच्या आमदारांनी पावसाळी अधिवेशनात केल्यानंतर, बुडीत क्षेत्रात येणाऱ्या पैनगंगा नदीकाठच्या शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. “जान देंगे, जमीन नहीं देंगे” अशा घोषणांनी सरकार आणि लोकप्रतिनिधींविरोधात आवाज बुलंद करण्यात आला.

शनिवारी (दि.९) हिमायतनगर तालुक्यातील सिरपल्ली येथे जवळपास चाळीस गावांतील हजारो शेतकऱ्यांची संयुक्त सभा झाली. या सभेचे अध्यक्ष बाबुराव वानखेडे होते. निम्न पैनगंगा धरण विरोधी समितीचे



अध्यक्ष प्रल्हाद जगताप पाटील, संघटक सचिव मुबारक तवर, सचिव विजय पाटील, वि.ना. कदम आदींनी भाषणे केली.

नेत्यांनी सांगितले की, हा प्रकल्प प्रथम 1962-65 दरम्यान स्थगित करण्यात आला होता, कारण पैनगंगा नदीकाठची जमीन अतिशय सुपीक आहे. नंतर 2009-11 मध्ये प्रकल्प पुनर्जिवीत झाला, मात्र जनसुनावणीनंतर पुन्हा थांबवण्यात आला. आता, आमदारांच्या मागणीवरून प्रकल्पाचा सर्वे करण्यासाठी 700 कोटी रुपये मंजूर झाले असून प्रकल्प पुन्हा गतिमान झाला आहे.

शेतकऱ्यांचा ठाम आग्रह आहे की, विकासाच्या नावाखाली सुपीक जमीन बुडवू नये. त्याऐवजी नदीवर बंधारे बांधून सिंचनाचा प्रश्न सोडवावा. शेतकऱ्यांनी इशारा दिला की, जर शेकडो हेक्टर शेती प्रकल्पाखाली बुडवण्याचा प्रयत्न झाला, तर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल.या सभेला महिला-पुरुष, तरुण, ज्येष्ठ अशा मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. या वेळी पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## रक्षाबंधनासाठी बहिणीकडे जाणाऱ्या कुटुंबाचा अपघात

# 8 वर्षीय मुलाचा जागीच मृत्यू

## पती-पत्नी गंभीर जखमी

■ **सिरोंचा**

दुचाकीने कुटुंब घेऊन सिरोंचाकडे जात असताना रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीला दुचाकीची धडक बसली आहे. या अपघातात आठवर्षीय मुलगा जागीच मृत्यू, तर आईवडील गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे. ही घटना शनिवार (ता. ९) दुपारच्या सुमारास सिरोंचा तालुक्यातील अंकिसा मार्गावर घडली..शौर्य संतोष कोक्कू (वय ८) असे मृत मुलाचे नाव असून वडील संतोष रामलू कोक्कू (वय ४३) व आई सौंदर्या कोक्कू (वय ३६) अशी जखमींची नावे आहे.. असरअल्ली येथील संतोष कोक्कू हे पत्नी व मुलाला घेऊन आपल्या नातेवाइकाकडे रक्षाबंधनासाठी दुचाकीने सिरोंचाकडे जात होते. मात्र, अंकिसा गावाजवळ पोहोचताच दुचाकीचे नियंत्रण सुटल्याने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीला दुचाकीची धडक बसली.

अरुंद मार्ग, उभी केलेली ट्रॉली आणि वेळीच दिसून न आल्याने ही घटना घडली. या धडकेचा जोर इतका होता की, यात शौर्यचा जागीच मृत्यू झाला. संतोष कोक्कू यांच्या हातापायाला गंभीर दुखापत झाली असून सौंदर्या कोक्कू किरकोळ जखमी झाल्या. त्यांना सिरोंचा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारार्थ नेण्यात आले.

संतोष कोक्कू यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना तातडीने तेलंगणातील वारंगल येथील खासगी रुग्णालयात नेण्यात आले. सौंदर्या कोक्कू यांच्यावर स्थानिक पातळीवर उपचार सुरू आहेत. सिरोंचा पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून अपघाताची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे..

# तिबेटीयन महिला व समितिच्या स्वयंसेविकांसोबत सरसंघचालकांचे रक्षाबंधन



**प्रतिनिधी**
■ **नागपूर**

रक्षाबंधनाच्या निमित्ताने प्रादेशिक तिबेटीयन महिला संघ आणि भारत-तिबेट सहकार्य मंचाच्या भगिनींनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांना राखी बांधली. राष्ट्र सेविका समिती, महल परिसरातील तसेच दिशा ३० च्या भगिनींनीही राखी बांधून शुभेच्छा दिल्या. यावेळी तिबेटचे सेटलमेंट ऑफिसर तेन्झिन त्संगपा यांनी सरसंघचालकांना "व्हॉइस फॉर द व्हॉइसलेस, बाय हिज होलिनेस द १४ वे दलाई लामा" हे पुस्तक भेट म्हणून दिले. तसेच प्रादेशिक तिबेटियन महिला संघटना आणि भारत-तिब्बत सहयोग चळवळीद्वारे भगवान गौतम बुद्धांचा थांगका सादर करण्यात आला.

# बिबट्याच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू

**नाशिक :**दिंडोरी शिवारातील बदादे वस्तीवर बिबट्याच्या हल्ल्यात एका शेतकरी महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. जनाबाई जगन बदादे वय 65 मयत शेतकरी महिलेचे नाव आहे. शेतात कामे करत असताना बिबट्याने महिलेवर हल्ला करून तिला उसात ओढून नेले. दरम्यान, दिंडोरी शहरात बिबट्याच्या हल्ल्यात तिसरा बळी गेल्याने तीव्र संताप उसळला असून, मयत महिलेचे नातेवाईक ग्रामस्थांनी वन विभागाच्या कार्यालयासमोर मृतदेह आणत संताप व्यक्त केला. तसेच नाशिक कळवण रस्त्यावर मृतदेह ठेवत रास्ता रोको केला. पोलिस आणि नातेवाईक यांच्यात संघर्ष सुरु झाला. पोलिस निरीक्षक रघुनाथ शेगर यांनी नागरिकांची समजूत काढल्यानंतर रास्ता रोको मागे घेण्यात आला.

# माऊलींसाठी आली मुक्ताईच्या मायेची राखी, अलंकापुरी गहिवरली; ‘इंद्रायणी’ झाली साक्षी

## मुक्ताई संस्थानचा उपक्रम, बहीण-भावाच्या गोड नात्याची परंपरा भक्तिभावाने जपली

**प्रतिनिधी**
■ **आळंदी**

रक्षाबंधन म्हणजे भावा-बहिणीच्या पवित्र नात्याचा उत्सव. पण जेव्हा हे नातं शतकांच्या सीमा ओलांडून, साक्षात ज्ञानियांच्या राजाला आणि त्यांच्या लाडक्या बहिणीला जोडतं, तेव्हा तो सोहळा केवळ उत्सव राहत नाही, तर एक जिवंत, स्पंदनशील अनुभूती बनतो. ‘ताटी उघडा ज्ञानेश्वरा’ म्हणत मोठ्या भावाला कर्तव्याची जाणीव करून देणाऱ्या मुक्ताईची माया आज पुन्हा एकदा अलंकापुरीत अवतरली. आदिशक्ती मुक्ताई संस्थान, मुक्ताईनगरतर्फे पाठवलेली राखी संत ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधीवर अर्पण करण्यात आली आणि इंद्रायणीच्या तीरावर जणू तोच जुना, जिव्हाळ्याचा क्षण पुन्हा जिवंत झाला. पहाटेच्या मंगलमय वातावरणात, माऊलींची नित्य पूजा आणि



पवमान अभिषेक संपन्न झाल्यानंतर अवघी अलंकापुरी एका ऐतिहासिक क्षणाची वाट पाहत होती. आदिशक्ती मुक्ताई संस्थानच्या विश्वस्तांनी मोठ्या श्रद्धेने आणलेली ‘मुक्ताईची राखी’ माऊलींच्या समाधीवर अर्पण केली. बहीण-भावाच्या या गोड नात्याची परंपरा यंदाही मोठ्या भक्तिभावाने जपण्यात आली.

या सोहळ्याने अवघी अलंकापुरी भारावून गेली होती. इंद्रायणीचा शांत प्रवाह, सिद्धेश्वराच्या मंदिराचा कळस, आणि माऊलींच्या देऊळवाड्यातील प्रत्येक चिरा जणू या अद्वितीय प्रेमाचा साक्षीदार बनला होता.

शतकांनंतरही अतूट नाते
एक आपण साधू झाले ।
येर कोण वाया गेले ॥१॥
उठे विकार ब्रम्ही मुळ ।
अवघे मायेचे गाबाळ ॥धृ॥
माया समुळ नुरे जेव्हा ।
विश्व ब्रम्ह होईल तेव्हा ॥३॥
ऐसा उमज आदि अंती ।
मग सुखी व्हावे संती ॥४॥
काम क्रोध मागे सारा ।
ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥५॥

तत्कालीन सामाजिक त्रासाला कंटाळून जेव्हा ज्ञानेश्वर महाराज निराश होऊन झोपडीचे दार बंद करून बसले होते, तेव्हा त्यांची लहानगी बहीण मुक्ताईच त्यांच्या मदतीला धावून आली. तिने केवळ दार उघडायला सांगितले नाही, तर ज्ञानाचा दिवा पुन्हा प्रज्वलित करून जगाच्या कल्याणाचा मार्ग दाखवला. याच अतूट नात्याचे प्रतीक म्हणून, आदिशक्ती मुक्ताई संस्थान दरवर्षी न चुकता आपल्या लाडक्या भावासाठी, ज्ञानदेवासाठी राखी पाठवते. ही केवळ एक राखी नाही, तर बहिणीने भावाला दिलेल्या धैर्याची, प्रेमाची आणि कर्तव्याच्या जाणिवेची आठवण आहे.

या हृदयस्पर्शी क्षणी, माऊलींच्या समाधीवर राखी अर्पण करण्यासाठी श्री संत मुक्ताबाई संस्थानचे विश्वस्त संदीप पाटील, सम्राट पाटील, गजानन महाराज लाहुडकर, विशाल महाराज खोले, विचारसागर महाराज लाहुडकर, मुक्ताई पालखी सोहळा अश्व मानकरी संदीप महाराज भुसे, प्रतिभा पाटील, मीनाताई पाटील यांच्या हस्ते माऊलींच्या समाधीवर राखी अर्पण करण्यात आली. यावेळी सोहळा प्रमुख डॉ. भावार्थ देखणे, विश्वस्त पुरुषोत्तम महाराज पाटील, प्रमुख व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अजित वडगावकर, माजी उपनगराध्यक्ष सागर भोसले व इतर मान्यवर उपस्थित होते.

ज्ञानदेवांप्रमाणे निवृत्तीनाथ महाराज, सोपानकाका महाराज यांनाही राख्या पाठविण्यात आल्या.

मुंबई : शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे)वडाळा विधानसभा क्षेत्रातील युवासेना शाखा क्र.२०१ च्या युवा शाखाधिकारी रोहन सुरेश काळे यांच्या वतीने प्रतिवर्षा प्रमाणे याहीवर्षी भोईवाडा शाखेच्या प्रांगणात " निष्ठेची दहीहंडी सराव शिबिर " आयोजित केले होते. या शिबिरात २५ गोविंदा पथकांनी भाग घेतला पैकी परळच्या जय जागेवाला गोविंदा पथकाच्या गोविंदाचा सन्मान करताना महिला विभाग संघटक, माजी महापौर श्रध्दा श्रीधर जाधव, सोबत महिला उपविभाग समन्वयक धनश्री पवार,सहनिरीक्षक सुरेश गणपत काळे, महिला उपशाखासंघटक नलिनी शेलार, आयोजक युवासेना शाखाधिकारी रोहन सुरेश काळे, शाखासमन्वयक दीपक दिनेश पाटील,स्वप्नील केसरकर, प्रणित बाईत आदी.



# 19 युवा ॲथलेटिक्स स्पर्धेत ऐरोलीच्या न्यू होरायझन स्कूलचे यश



**प्रतिनिधी**
**ठाणे**

प्रज्ञावर्धिनी फाउंडेशन आणि मॅक्सज्ञान स्पोर्ट्स यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे येथील टीएमसी स्टेडियम, मुंब्रा येथे राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या १९ वर्षो खालील युवा ॲथलेटिक्स स्पर्धेत ऐरोलीच्या न्यू होरायझन स्कूलने सर्वाधिक पदके जिंकून शानदार कामगिरी केली. या स्पर्धेत ठाणे आणि नवी मुंबई जिल्ह्यातील ५० पेक्षा अधिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील ४८० पेक्षा जास्त खेळाडूंचा सहभाग होता.अथेना ग्लोबल लॉजिस्टिक्स, श्री महालक्ष्मी मंदिर ट्रस्ट, टीजेएसबी बँक हे स्पर्धेचे प्रायोजक होते.

ही स्पर्धा १४, १७, १९ वर्षांखालील मुलामुलींच्या गटात संपन्न झाली. ओंकार इंग्लिश मीडियम स्कूल, होली क्रॉस कॉन्व्हेंट हायस्कूल, सेंट जॉन बॉस्को हायस्कूल, भारतीय सैनिक विद्यालय आणि सौ. सुलोचनादेवी सिंघानिया स्कूल या शाळांच्या खेळाडूंनी देखील या स्पर्धेत चमक दाखवली.१४ वर्षांखालील मुलांच्या गटातील सर्वोत्तम धावपटू म्हणून चैतन्य सचिन साळवे आणि अर्णव विक्रांत साबळे यांची निवड झाली, तर १४ वर्षांखालील मुलींच्या गटात ॲना अँथनी एन आणि आरोही दीपक नलावडे यांनी हा मान मिळवला.

१७ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रथम शेट्टी, ध्रुव शिरोडकर आणि १७ वर्षांखालील मुलांच्या गटात मिहिका सुर्वे आणि रिद्धी संतोष माने यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.१९ वर्षांखालील मुलांच्या गटात समर्थ भिंगारदेवे, आयुष पाटील आणि १९ वर्षांखालील मुलींच्या गटात लावण्या हरिचंद्र बांगर यांनी सर्वोत्तम धावपटूंचा मान मिळवला. गोळाफेकमध्ये १४ वर्षा खालील मुलांच्या गटात राज प्रजापती, १७ वर्षांखालील मुलांच्या गटात खुशाल विजेन्द्र तिवारी, आणि १९ वर्षांखालील मुलांच्या गटात स्टॅनिस गोल्डिन क्वाड्रोस यांनी सुवर्णपदके जिंकली.१४ वर्षांखालील मुलींच्या गोळाफेक स्पर्धेत रुतुजा दिनेश वारदेकर आणि १७ वर्षांखालील गटात नव्या अनिलकुमार चकूरकर यांनी पहिला क्रमांक मिळवला.

## आंतर रुग्णालयीन क्रिकेट स्पर्धा...

**मुंबई :** गिरनार चहा पुरस्कृत आणि मुंबई क्रिकेट असोशिएशन मान्यता प्राप्त आंतर रुग्णालयीन क्रिकेट स्पर्धेत ज्या रुग्णालयीन क्रिकेट संघाना सहभागी व्हायचे असेल अश्या संघानी अनिल बैकर यांच्याशी संपर्क करावा प्रथम येणाऱ्या 16 क्रिकेट संघाना स्पर्धेत प्रवेश देण्यात येईल. गेली 31 वर्ष या स्पर्धेचे आयोजन केले जात आहे. हुमाँयू जाफरी सरचिटणीस आणि मिलिंद सावंत खजिनदार आणि त्यांचे सहकारी हे स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी अथक मेहनत घेत आहेत फॉर्म पूर्ण भरून प्रवेश फी सहित स्वीकारण्याची शेवटची तारीख 30 ऑगस्ट 2025 आहे .स्पर्धेच्या आधिक माहितीसाठी अनिल बैकर ,सहचिटणीस, मो.क्रमांक.९९८७०३४३८१ यांच्याशी संपर्क साधावा.

# बंगळुरूमध्ये होणार देशातील दुसरे सर्वात मोठे क्रिकेट स्टेडियम

## 80,000 प्रेक्षक क्षमता; RCB चेंगराचेंगरी प्रकरणानंतर निर्णय



**वृत्तसंस्था**
**बंगळुरू1**

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी बंगळुरूजवळ एक नवीन क्रिकेट स्टेडियम बांधण्याची घोषणा केली आहे. या स्टेडियममध्ये एका वेळी ८० हजार प्रेक्षक बसू शकतील. प्रेक्षक क्षमतेच्या बाबतीत, अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमनंतर हे देशातील दुसरे सर्वात मोठे क्रिकेट स्टेडियम असेल.

सिद्धरामय्या यांनी कर्नाटक गृहनिर्माण मंडळाच्या सूर्या सिटी, बोम्मासंद्रा येथे स्टेडियम बांधण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. हे स्टेडियम १६५० कोटी रुपये खर्चून बांधले जाईल.हे नवीन स्टेडियम विद्यमान एम चिन्नास्वामी स्टेडियमपासून २२ किमी अंतरावर आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या विजय सोहळ्यादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीनंतर ते बांधण्याचा निर्णय घेण्यात आला.

आरसीबीने पहिल्यांदाच आयपीएल ट्रॉफी जिंकली. या विजयाचा आनंद साजरा करण्यासाठी ४ जून रोजी चिन्नास्वामी येथे एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यात चेंगराचेंगरी झाली आणि ११ जणांना आपला जीव गमवावा लागला.

बंगळुरू चेंगराचेंगरी प्रकरणाची चौकशी करणाऱ्या न्यायमूर्ती जॉन मायकल कुन्हा आयोगाने म्हटले होते की, ३२,००० प्रेक्षकांची क्षमता असलेले आणि फक्त १७ एकर जागेत पसरलेले एम. चिन्नास्वामी स्टेडियम मोठ्या स्पर्धांसाठी योग्य नाही. आयोगाने असे सामने अधिक जागा, चांगल्या सुविधा आणि पार्किंग असलेल्या ठिकाणी आयोजित करावेत असा सल्ला दिला होता.

११ ऑगस्टपासून सुरू होणारी देशांतर्गत टी-२० लीग महाराजा ट्रॉफी म्हैसूरला हलवण्यात आली आहे. कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशन (केएससीए) ला पोलिसांकडून परवानगी न मिळाल्यामुळे महाराजा ट्रॉफी म्हैसूरमध्ये आयोजित करण्यात येत आहे. यानंतर, २०२६ मध्ये येथे महिला विश्वचषक सामने आणि आयपीएल सामने आयोजित करण्यावरही प्रश्न उपस्थित झाले आहेत.

जूनमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (RCB) च्या आयपीएल विजयाच्या उत्सवादरम्यान चिन्नास्वामी स्टेडियमभोवती झालेल्या चेंगराचेंगरीमुळे सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. या घटनेत ११ जणांचा मृत्यू झाला होता आणि ५० हून अधिक लोक जखमी झाले होते.

**हे स्टेडियम १०० एकरवर बांधले जाईल**

या १,६५० कोटी रुपयांच्या प्रकल्पाचा संपूर्ण खर्च कर्नाटक गृहनिर्माण मंडळाकडून उचलला जाईल. यात केवळ क्रिकेट मैदानच नाही, तर आठ इनडोअर आणि आठ आउटडोअर खेळांसाठी सुविधा, एक आधुनिक जिम, प्रशिक्षण केंद्र, स्विमिंग पूल, गेस्ट हाऊस, हॉस्टेल, हॉटेल आणि आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांसाठी एक कन्व्हेन्शन हॉल देखील असेल. हे स्टेडियम बंगळुरूमधील बीसीसीआयच्या नवीन राष्ट्रीय क्रिकेट अकादमी (एनसीए) सारखे असू शकते.

# डोंबिवलीच्या तरुण मुलामुलींनी गाजविली जपान मधील दोरीच्या उड्यांची जागतिक जम्प रोप स्पर्धा

**प्रतिनिधी**
**मुंबई**

जपानच्या कावासाकी शहरात जागतिक जम्प रोप ( दोरी उड्या ) चॅम्पियन स्पर्धेत डोंबिवलीच्या तरुण मुलामुलींनी पुन्हा एकदा चमकदार कामगिरी करून दाखविली आहे. 27 जुलै ते 3 ऑगस्ट 2025 या दरम्यान झालेल्या स्पर्धेत महाराष्ट्राच्या टीमने दोन सुवर्ण आठ रौप्य आणि सहा कांस्य अशी एकूण 16 पदकांची कमाई केली असून त्यात बहुतेक खेळाडू हे डोंबिवलीकर होते हे विशेष. या जागतिक चॅम्पियन स्पर्धेत 36 देशातील 2600 खेळाडूंनी भाग घेतला होता. विशेष म्हणजे याच खेळाडूंनी जुलै 2023 मध्ये अमेरिकेत झालेल्या जागतिक जम्प रोप चॅम्पियन स्पर्धेत आणि जुलै 2024 जपान मध्ये एशियन स्पर्धेत अशीच पदके मिळवली होती. कोणताही सरकारी निधी, खाजगी प्रायोजक न घेता, स्वताच्या खर्चाने या टीमने ही कौतुकास्पद कामगिरी केली आहे. त्यामुळे पुढे अशीच कामगिरी करण्यासाठी त्यांना आर्थिक मदतीची गरज आहे. लोकप्रतिनिधी, सरकारी निधी व खाजगी प्रायोजक यांच्याकडून काही निधी मिळाल्यास या खेळासाठी अनेक नामवंत खेळाडू देशासाठी तयार होतील अशी अपेक्षा प्रशिक्षक अमन वर्मा यांनी व्यक्त केली आहे.

भूमिका नेमाडे एक सुवर्ण, एशान पुथ्रन एक सुवर्ण व एक रौप्य, तन्वी नेमाडे दोन रौप्य व एक कांस्य, नमन गंगवाल (नाशिक) दोन रौप्य व एक कांस्य, अमन वर्मा एक रौप्य व एक कांस्य, मानस मुंगी एक रौप्य व एक कांस्य, रोनक साळवे एक रौप्य, पारोल झंकार एक कांस्य, पद्माक्षी मोकाशी एक कांस्य अशी एकूण 16 पदके जिंकली आहेत. वय 16-18 आणि 19 + अशा वर्गवारीत एकेरी, दुहेरी, तिहेरी, मिश्र यामध्ये उपरोक्त पदके या तरुणांनी जिंकली आहेत. या टिमचे प्रशिक्षक अमन वर्मा यांनी गेले काही वर्षे डोंबिवलीतील विद्यार्थ्यांना शाळा व कॉलेज मध्ये जावुन याचे खास प्रशिक्षण देत आहेत व यासाठी अथक परिश्रम त्यांनी घेतले आहेत.

# विनायक निम्हण स्मृती कॅरम राजेश गोहिल चौथ्या फेरीत दाखल



**पुणे**

गोविंदा गार्डन मंगल कार्यालय, पुणे येथे सुरु असलेल्या विनायक निम्हण स्मृती दुसऱ्या राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत पुरुष एकेरी गटाच्या तिसऱ्या फेरीत रायगडच्या राजेश गोहिलने पुण्याच्या फ़ैयाज शेखचा १९-१२, २५-८ असा सरळ दोन सेटमध्ये पराभव करून चौथ्या फेरीत प्रवेश केला. तर मुंबईच्या सिद्धांत वाडवलकरने पुण्याच्या वासिम शेखचा तीन सेटपर्यंत रंगलेल्या लढतीत १३-२५, २५-६, २१-९ असा पराभव करून चौथी फेरी गाठली.

# प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुलाच्या स्केटिंग खेळाडूंचा आंतरराष्ट्रीय पातळीवर दबदबा!

**प्रतिनिधी**
**मुंबई**

दक्षिण कोरियात नुकत्याच पार पडलेल्या २०व्या एशियन रोलर स्केटिंग चॅम्पियनशिप २०२५ मध्ये प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुल (PTKS), विलेपार्ले येथील स्केटिंग खेळाडूंनी अतिशय उज्वल कामगिरी करत भारत आणि महाराष्ट्राचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरवले आहे.

या उल्लेखनीय यशाबाबत संकुलाचे अध्यक्ष अरविंद रमेश प्रभू म्हणाले, "या सर्व खेळाडूंमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची गुणवत्ता आहे. त्यांच्याकडे सुवर्णपदक पटकावण्याची प्रचंड क्षमता असून, लवकरच त्यांच्या भारतीय संघात निवडीची घोषणा होईल, असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे.

या यशामागे संकुलाचे अध्यक्ष अरविंद रमेश प्रभू, सचिव डॉ. मोहन अनंत राणे, तसेच Skating Association of Maharashtra चे अध्यक्ष पुष्पेंद्र कुमार सिंह, प्रशिक्षक व आंतरराष्ट्रीय दर्जाचे पंच मती आदेश सिंग, आणि कोरियोग्राफर मोनिश कुमार कोटियन यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि योगदान लाभले आहे.



**खेळाडूंची उल्लेखनीय कामगिरी पुढीलप्रमाणे**

- नायशा निशित मेहता – वयोगट १४–१७, मुली सोलो डान्स – सुवर्ण पदक
- रिधम हर्षल ममाणिया – वयोगट ११–१४, मुली सोलो डान्स – सुवर्ण पदक
- कॅरोलिन फर्नांडिस – रोलर डर्बी – रजत पदक

# मुंबईचे किनारे होणार चकाचक समुद्रातील कचरा गोळा करणार विद्युत बोटींद्वारे

**प्रतिनिधी**
**मुंबई**

मुंबई महापालिका शहर आणि उपनगरे येथील तब्बल साडेसहा हजार मेट्रिक टन ओला आणि सुका कचरा दररोज वाहनांद्वारे उचलून डंपिंग ग्राऊंडवर विल्हेवाट लावण्यासाठी नेते. मात्र त्याचबरोबर मुंबईला लाभलेल्या अथांग समुद्रातील तरंगता कचरा काढून त्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी देखील महापालिकेच्या खांद्यावर टाकण्यात आली आहे. त्यामुळे महापालिका समुद्रातील तरंगता कचरा जमा करण्यासाठी मानवविरहित दोन विद्युत बोटींचा वापर करणार आहे.

या बोटी घेण्यासाठी आवश्यक ती मंजुरी उपायुक्त पर्यावरण विभाग, घनकचरा विभाग यांनी आणि महापालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिली आहे. या दोन्ही विद्युत बोटींच्या खरेदीसाठी महापालिकेला लाखो रुपयांचा खर्च येणार आहे. तसेच, हा खर्च राष्ट्रीय स्वच्छ वायू कार्यक्रमाच्या निधीमधून करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. मात्र त्यासाठीच्या लेखा संकेतांकमध्ये निधीची कमतरता भासल्याने आता सदर खर्च १५ व्या वित्त आयोगामार्फत उपलब्ध होणाऱ्या निधीमधून करण्यात येणार आहे.

मुंबईतील समुद्रात विशेषतः गेट वे ऑफ इंडिया आणि बधवार पार्क या ठिकाणी काही प्रमाणात तरंगता कचरा आढळून येतो. हा कचरा पर्यटकांच्या बेपर्वाईमुळे अथवा मुंबईत बोटींमधून विरह करताना नागरिक समुद्रात टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याच्या माध्यमातून निर्माण होत असल्याचे सांगण्यात येते. मात्र समुद्रातील प्रदूषण हटविणे, तरंगता कचरा हटविणे याबाबतची जबाबदारी ही महापालिकेच्या खांद्यावर टाकण्यात आलेली आहे. त्यामुळेच महापालिकेने समुद्रात सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून स्वच्छ केलेले पाणी समुद्रात सोडण्याचा निर्णय घेतला आहे.

तसेच, सांडपाणी स्वच्छ करण्यासाठी पालिकेने कुलाबा येथे सांडपाण्यावर प्रक्रिया करणारा प्रकल्प अगोदरच सुरू केला असून अद्यापही आणखीन सात ठिकाणी सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी समुद्रात सोडणे अथवा त्या पाण्यावर प्रक्रिया करून त्या पाण्याचा पुनर्वापर उद्यान, रस्ते कामे आदींसाठी करण्याचा पालिकेचा मानस आहे. त्यामुळे समुद्रातील पाण्याचे प्रदूषण कमी होण्यास आणि समुद्र स्वच्छ ठेवण्यात मदत होणार आहे.

# प्रशासकीय अधिकारी आणि पत्नींच्या संस्थेमार्फत शिलाई मशीन्सचे वितरण



**प्रतिनिधी**
**मुंबई**

प्रशासकीय अधिकारी व त्यांच्या पत्नींची संघटना आयएएसओडब्ल्यूए (IASOWA) ही अखिल भारतीय स्तरावर कार्यरत असलेली ना नफा तत्वावर सामाजिक कार्यासाठी कटिबद्ध असलेली संस्था आहे. या संस्थेच्या महाराष्ट्र शाखेमार्फत शोभा अरुण नाईक आणि यास्मिन फिरोज मोमिन या स्वयंसाहाय्य गटातील दोन विधवा महिलांना शिलाई आणि कटर मशीनचे वितरण करण्यात आले. आयडीबीआयच्या सौजन्याने सीएसआरच्या माध्यमातून या मशीन्स देण्यात आल्या आहेत.

शुक्रवारी मुंबईत आयोजित एका कार्यक्रमात या मशीन्सचे वितरण करण्यात आले. यावेळी संस्थेच्या अध्यक्ष श्रीमती अर्चना मीना, सचिव श्रीमती आर.विमला, खजिनदार झेबा नाईक, सुप्रिया छडगल यांच्यासह संस्थेच्या पदाधिकारी आणि सदस्य तसेच आयडीबीआयचे पदाधिकारी उपस्थित होते.

# उमरखाडीत कलाकारांनी सुद्धा लुटली 'चोर गोविंदा'ची मजा

**प्रतिनिधी**
**मुंबई**

नारळी पौर्णिमेनिमित्त उमरखाडीत परंपरेनुसार चोर गोविंदाचे आयोजन करण्यात आले होते. यंग उमरखाडी क्रिडा मंडळ आणि शिवसेना युवासेना मुंबादेवी विधानसभा विभाग संघटक रुपेश पाटील आणि महिला उपविभाग प्रमुख प्रिया पाटील पुरस्कृत चोर गोविंदा कार्यक्रमास टीव्ही चैनल व चित्रपट सृष्टीतील बड्या कलाकारांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावून चोर गोविंदाची मजा लुटली अभिनेत्री लिसा सिंग नृत्यांगना गौतमी पाटील , अभिनेता सुशांत शेलार अभिनेत्री प्राप्ती रेडकर, बिग बॉस फेम दादुस चौधरी, रिल्सबाज तन्मय पाटेकर, गायक परमेश माळी मंचावर थांबून चोर गोविंदाची मजा लुटत होते.

चोर गोविंदाचा कार्यक्रम पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात राजकीय मंडळींनी देखील कार्यक्रमास हजेरी लावली होती शिवसेना भाजपा राष्ट्रवादी पक्षाच्या मातब्बर मंडळींनी चोर गोविंदाला हजेरी लावली . शिवसेना उपनेत्या मीनाताई कांबळे अभिनेता सुशांत शेलार , प्रवक्त्या शायना एनसी, नगरसेविका वंदना गवळी कार्यक्रमास उपस्थित होत्या नारळी पौर्णिमेचा हा उत्सव पाहून राजकीय मंडळींसह कलाकार देखील भारावून गेले होते. कार्यक्रमाचे आयोजन अतिशय उत्तम रत्या केल्याने गोविंदा पथकांनी देखील आयोजक रुपेश पाटील यांची तारीफ केली.

गिरगावतील अखिल मुगभाट सार्वजनिक गोविंदा पथकाने आठ थर लावून उंच दहीहंडी फोडून चोर गोविंदाचा मनाचा चषक पटकावला आहे. या सराव शिबिराला ७० होऊन जास्त गोविंदा पथकांनी सहभाग घेतला होता त्याचबरोबर महिला गोविंदा. पथक देखील मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. प्रत्येक गोविंदा पथकांना आकर्षक ट्रॉफी आणि रोख रक्कम भेट देण्यात आली होती. नृत्यांगना गौतमी पाटील हिने भाषण आणि नृत्य करत उपस्थितांची मने जिंकली. अशाप्रकारे कलाकार मंडळींच्या उपस्थितीत चोर गोविंदाचा कार्यक्रम पार पडला.



# BLO नियुक्ती संदर्भात घाटकोपर येथील शिक्षकांना मिळाला न्याय

## महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटनेचे यश यश

**प्रतिनिधी**
**मुंबई**

घाटकोपर पूर्व विधानसभा मतदारसंघातील CPS मधील शिक्षकांवर करण्यात आलेल्या अन्यायकारक कारवाईविरोधात महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटनेने आवाज उठवला होता. विद्यार्थ्यांच्या अध्यापनाला प्राधान्य देत BLO नियुक्ती प्रक्रियेत पारदर्शकता आणि शिक्षकांच्या शाळेतील कामावर परिणाम होऊ नये, यासाठी महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटना अध्यक्ष तानाजी कांबळे यांच्या नेतृत्वाखाली ठाम भूमिका घेतली होती.

या संदर्भात जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयाकडे केलेल्या सातत्यपूर्ण आणि प्रभावी पाठपुराव्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून लेखी पत्र प्राप्त झाले त्यातत्यांनी BLO म्हणून शिक्षकांची नेमणूक करताना शाळेच्या मुख्याध्यापकांशी चर्चा करणे अनिवार्य आहे.,शाळेतील केवळ ४०% पेक्षा कमी शिक्षकांची BLO म्हणून नियुक्ती केली जाईल.,आणि शाळेच्या दैनंदिन शैक्षणिक कार्यावर परिणाम होणार नाही, याची दक्षता घेण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

संघटनेने केवळ घाटकोपरमधील शिक्षकांना न्याय मिळवून दिला नाही, तर संपूर्ण राज्यातील BLO नियुक्ती प्रक्रियेत आवश्यक पारदर्शकता आणि शिक्षकहिताचे धोरण राबवले जाण्यासाठी नवा मार्ग उघडल्याचे संघटनेचे अध्यक्ष तानाजी कांबळे यांनी सांगितले.

# हुतात्मा स्मारक तरुणांना प्रेरणा देणारे, मात्र त्याचे ऐतिहासिक महत्त्व टिकले पाहिजे!

## आमदार सचिन अहिर यांचे प्रतिपादन



**प्रतिनिधी**
**मुंबई**

सन १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात ज्या स्वातंत्र्यविरांनी आपल्या प्राणार्पणातून देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले.त्यांच्या स्मृती कायम राहाव्यात यासाठी गावालिया टॅन्क मैदानावर उभे करण्यात आलेले हुतात्मा स्मारक आजच्या तरुणांचे प्रेरणास्थान आहे. परंतु त्याचे महत्व कायम राहणार का, हा आज खरा मूलभूत प्रश्न आहे, असे विचार राष्ट्रीय मिल मंजूर संघाचे अध्यक्ष आमदार सचिनभाऊ आहीर यांनी येथे बोलताना काढले.आजचा क्रांतीदिन ऐतिहासिक मानला जातो. गवालिया टॅंक मैदानावरील व्यवस्थेवर लोकांनी व्यक्त केलेल्या नापसंतीवर ते म्हणाले,या वास्तूचे ऐतिहासिक महत्त्व कायम राहिले पाहिजे.

आज क्रांती दिनाच्या औचित्याने राष्ट्रीय मिल मजदूर संघ, गिरणी कामगार संयुक्त लढा समिती आणि महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय कामगार संघ,रामिम संघ सेवादल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कामगारांची रॅली आयोजित करण्यात आली होती.

गिरणी कामगारांची अभिवादन रॅली नाना चौक,अग्निशमनकेंद्र येथून गवालिया टॅंक मैदानापर्यंत आयोजित करण्यात आली होती. या रॅलीचे नेतृत्व अध्यक्ष आणि संयुक्त लढा समितीचे प्रमुख आमदार सचिनभाऊ अहिर, संघटनेचे सरचिटणीस, लढा समितीचे निमंत्रक गोविंदराव मोहिते यांनी कले .खजिनदार निवृत्ती देसाई, उपाध्यक्ष अण्णा शिरसेकर यांनीही नेतृत्वात सहभाग घेतला.उपाध्यक्ष बजरंग चव्हाण यांनी निवेदन केले.

या प्रसंगी सर्व श्रमिक संघाचे कॉ. विजय कुलकर्णी, गिरणी कामगार सेनेचे बाळ खवणेकर,संयुक्त मराठी मुंबई चळवळीचे रमाकांत बने, विवेकानंद बेलूसे,एनटीसी कामगार असोसिएशनचे बबन मोरे, गिरणी कामगार वारस संघर्ष सेवा समितीचे आनंद मोरे, मुंबई गिरणी कामगार युनियनचे ॲड.अरुण निंबाळकर,ओला उबेरचे नेते सुनिल बोरकर, जर्नालिस्ट युनियन ऑफ महाराष्ट्रचे राजेंद्र साळसकर,महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय कामगार संघाचे उत्तम गिते,माजी नगरसेवक सुनिल अहिर, शिवाजी काळे, किशोर राहटे आदी कामगार नेते उपस्थित होते. कामगार संघटना संयुक्त कृती लढा समितीच्या अन्य सर्व कामगार संघटनांनी या अभिवादन सोहळ्याला आपला पाठिंबा दिला होता.

राष्ट्रीय मिल मजूर संघ गेली ३४ वर्षे राष्ट्रीयभावनेने हा अभिवाद नाचा सोहळा आयोजित करीत आहे, असे सांगून आमदार सचिन अहिर त्या वेळी आपल्या भाषणात पुढे म्हणाले, कामगारांचा असेल किंवा सामाजिक प्रश्न असेल,सरकार निर्णय घेण्यास अकारण वेळ लावित आहे. अध्यक्ष आमदार सचिन आहिर, सरचिटणीस गोविंदराव मोहिते यांनी क्रांतीदिनाच्या औचितत्याने गवालिया टॅन्क मैदानावरील हुतात्मा स्मारकाला पुष्पचक्र वाहून स्वातंत्र्य लढ्यातील योद्धयांना अभिवादन केले.

# मुंबई मराठी साहित्य संघाची पंचवार्षिक निवडणूक पुढच्या महिन्यात : 3 पॅनेल रिंगणात

**प्रतिनिधी**
**मुंबई**

गिरगाव मधील डॉ.अ. ना. भालेराव मार्गावर असलेल्या मुंबई मराठी साहित्य संघाची पाच वार्षिक (२०२५ ते २०२७) निवडणूक पुढील महिन्यात सप्टेंबर मध्ये होत आहे. या निवडणुकीत डॉ. भालेराव विचार मंच व अन्य दोन असे तीन पॅनल निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.

कै. अ. ना. भालेराव आणि कै. डॉ. बाळ भालेराव यांच्या कार्याचा वारसा केवळ जपण्यासाठी नव्हे; तर तो समृद्ध करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. कै. डॉ. बाळ भालेराव यांनीच घडवलेले आणि विश्वास टाकलेले कार्यकर्तेच आमच्या विचार मंचाचे उमेदवार आहेत. नवी, उत्साही पिढी साहित्य संघाच्या कामात पुढे यावी, हा डॉक्टरांचा आग्रह असे. म्हणून त्यांचेच आशीर्वाद घेऊन आम्ही मतदारांना आवाहन करीत आहोत. साहित्य संघाच्या येत्या निवडणूकीत आमच्या समूहातील सर्व उमेदवारांना आपले अमूल्य मत देऊन भरघोस मताधिक्याने निवडून द्यावे अशी नम्र विनंती दिवाकर दळवी यांनी केली आहे.

सदस्यांना मिळालेल्या मतपत्रिकेवर उमेदवारांचे क्रमांक पाहून, नावासमोर पेनाने अशी खूण करून आपले मत देऊ शकता आणि बुधवार ३ सप्टेंबर २०२५ च्या सायंकाळी सहा वाजेपर्यंत मतपत्रिका साहित्य संघाच्या गिरगांव येथील कार्यालयात पेटीमध्ये जमा कराव्यात असे आवाहन करण्यात आले आहे. या निवडणुकीत प्रत्येकाला १ अध्यक्ष, ७ उपाध्यक्ष आणि ३५ नियामक मंडळाचे सभासद निवडून देणार आहेत.

# ठाकरे आणि शिंदे यांचा कौटुंबिक दिल्ली दौरा

**सुडाच्या भावनेने पेटलेल्या नेत्यांमुळे महाराष्ट्रातील राजकारणातील वैचारिकता संपुष्टात आली. नेत्यांचाच एकमेकांवर विश्वास राहिलेला नाही. निवडणूकांपुरतेच राजकारण अशी ओळख असलेल्या सुसंस्कृत महाराष्ट्रात सुडाच्या राजकारणाचे वारे प्रत्येक कार्यकर्त्याच्या डोक्यात आणि घरात घोंगावू लागले. याच सुडाच्या राजकारणाचे वारे मागील आठवड्यात राजधानी दिल्लीच्या रस्त्यावर घोंगावताना सर्वांनीच पाहिले. महाराष्ट्राचे दोन माजी मुख्यमंत्री, दोन शिवसेनेचे दोन प्रमुख नेते, उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे स्वतःच्याच राजकीय पक्षाचे आराखडे दिल्लीत रचताना दिसले. शिवसेना कोणाची याबाबत सर्वोच्च न्यायालयात होणारा निर्णय आणि महाराष्ट्र भाजपाने केलेली राजकीय कोंडी यामुळे चिंताग्रस्त असलेल्या एकनाथ शिंदे यांनी भाजपाच्या सर्वोच्च नेत्यांच्या भेटी घेतल्या. तर दुसरीकडे राहुल गांधी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यामुळे अडचणीत आलेले पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री शहा यांना खिजविण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी गांधी याच्या घरी जेवणाचा आस्वाद घेतला. यामुळे महाराष्ट्राचे राजकीय वातावरण ढवळून निघाले. चर्चांना उधाण आले. नाक्यानाक्यावर कार्यकर्त्यांनी अंदाज वर्तविण्यास सुरुवात केली. असे असले तरी ठाकरे आणि शिंदे यांच्यामध्ये एकच साम्य होते ते म्हणजे आपल्या कुटुंबालाच घेऊनच त्यांनी हा राजकीय दौराचा आनंद लुटला. कार्यकर्ते नाक्यावरच चर्चेत रमला.**

सत्तेसाठी पक्षांतर करणाऱ्या आमदारांना अपात्र ठरवण्याच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या खंडपीठाणे मागील आठवड्यात महत्वपूर्ण निकाल दिला. निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की पक्षांतर रोखले नाही तर लोकशाहीचे नुकसान होईल. वास्तविक हा निकाल तेलंगणा राज्यातील पक्षांतर करणाऱ्या दहा आमदाराबाबतचा होता. पण या निकालाचा धक्का महाराष्ट्राला अधिक बसला. कारण मागील दशकातील राजकारणातील घडामोडी पाहिल्या तर पक्षांतराची कीड सर्वाधिक महाराष्ट्राला लागलेली दिसून येईल. यामुळेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे महाराष्ट्रात राजकीय वातावरण तापू लागले आणि एकनाथ शिंदे यांच्यासह ४० आमदारांच्या गटात घुसमट वाढू लागली. कारण तेलंगणाच्या निर्णयानंतर एकनाथ शिंदे यांच्याच पक्षांतराची चर्चा आपसूकच रंगू लागली. वास्तविक अजित पवार गटानेही पक्षांतर केलेलं आहे पण अजित पवार गटाची चर्चा कोणीच करताना दिसत नाही. पण विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हेही चर्चेच्या मध्यभागी दिसू लागले. कारण आमदार अपात्रतेचा निर्णय देण्यास टाळाटाळ करण्याची सर्वात मोठी भूमिका राहुल नार्वेकर यांनी बजावली होती. मुळात शिवसेनेत फूट पडल्यावर शिवसेना कोणाची! याबाबत निवडणूक आयोगाने दिलेला निर्णयही वादात सापडला आहेच. यामुळे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे त्यावेळीच ठोठावले होते. पण त्यावर सुनावणी झालीच नाही. पण सरन्यायाधीशपदी भूषण गवई हे आल्याने आता याबाबतची सारी सुनावणी ऑगस्ट च्या अखेरीस किंवा सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीला होईल आणि निर्णयही दिला जाईल अशीच जास्त शक्यता आहे. आधीच तेलंगणा राज्यातील भारत राष्ट्र समितीच्या पक्षांतर करणाऱ्या १० आमदारांच्या बाबत सर्वोच्च न्यायालयाने निकाल देताना परखड शब्दात अधोरेखित केले की 'ऑपरेशन यशस्वी, पण रुग्ण दगावला' अशी परिस्थिती न्यायालय निर्माण होऊ देणार नाही. यामुळे केंद्रातील भाजपा सत्ताधारी पक्षाला जरी हादरा बसला. असे असले तरी केवळ सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्तींमध्येच नाही तर राज्यातील प्रत्येक न्यायालयातील न्यायमूर्तींमध्येही प्रचंड ऊर्जा निर्माण झाली. एखाद्या तुमचा कॅप्टनच जर कणखर, परखड आणि लढाऊ असेल तर संपूर्ण टीममध्येच जोश निर्माण होतो. अशाच पद्धतीने देशातील सर्वच न्यायालयात सरन्यायाधीश गवई यांच्यामुळे ऊर्जा निर्माण झाली. हे सर्व पाहता महाराष्ट्रातील राजकारणाची म्हणजेच एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची दिशा कशी फिरेल हे आजच्या दिवशी ठामपणे जरी सांगता आली नाही तरी अंदाज मात्र नक्की वर्तविता येईल. तेलंगणा राज्यातील पक्षांतराबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळेच एकनाथ यांच्या शिवसेना पक्षांबाबत राजकीय विश्लेषकांनी, कायदेतज्ञानी, जेष्ठ पत्रकारांनी हाच अंदाज वर्तविण्यास सुरुवात केली. तसे पाहिले तर ज्या दिवशी सन्माननीय भूषण गवई यांनी सरन्यायाधीश पदाची शपथ घेतली त्यांचदिवसापासून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेबाबत आणि ४० आमदारांच्या पक्षांतराबाबत चर्चा आणि अंदाज वर्तविण्यास सुरुवात झाली होती. यामागील सर्वात मोठे कारण म्हणजे सरन्यायाधीश भूषण गवई हे संविधान मानणारे आहेत. लोकशाही देशात संविधानाला मोठे महत्व आहे यावर त्यांचा ठाम विश्वास आहे. त्यामुळेच शिंदे यांच्या शिवसेनेची महाराष्ट्रात पुन्हा चर्चा सुरु झाली होतीच. त्यातच तेलंगणा राज्याच्या पक्षांतर करणाऱ्या आमदारांच्या निकालाने या चर्चेला पृष्ठी मिळाली, एकप्रकारे ताकत मिळाली. त्यामुळेच एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेबाबत जोरदार चर्चा रंगू लागली. एकनाथ शिंदे यांच्या विरोधात निर्णय येणार! धनुष्यबाण निशाणी जाणार! शिवसेना नाव जाणार! अशी उघड चर्चा संपूर्ण महाराष्ट्रात होऊ लागली. किंबहुना शिंदे यांचे मित्रपक्ष असलेल्या भाजपाने ती अत्यंत चाणाक्ष पद्धतीने हि चर्चा पसरविली. यामुळे शिंदे यांच्यावर दबाव वाढत गेला. परिणामी एकनाथ शिंदे यांना दिल्लीत जाण्याशिवाय पर्यायच उरला नव्हता.





सर्वोच्च न्यायालयाच्या तेलंगणा राज्यातील आमदाराबाबत दिलेल्या निर्णयानंतर केवळ तीनच दिवसात हि सारी प्रक्रिया घडली. यामुळे एकनाथ शिंदे यांच्या विरोधात मित्रपक्ष आणि विरोधकांनी वातावरण किती वेगाने निर्माण केले याची कल्पना येते. आधीच मागील दोन महिन्यांपासून शिंदे यांच्या शिवसेनेतील आमदार आणि मंत्राचे वेगवेगळी प्रकरणे उजेडात येत आहेत. किंबहुना हि प्रकरणे जाणीवपूर्वक आणून एकनाथ शिंदे यांची प्रचंड राजकीय कोंडी विरोधकांनी केली होतीच. हि कोंडी जरी विरोधकांनी केली असली तरी विरोधकांच्या हल्लाबोलाला



**दिसले ते लिहिले**

**सुरेंद्र मुळीक**

शिंदे यांचा मित्रपक्ष भाजपाची साथ होतीच अशीच सर्वत्र चर्चा आहे. किंबहुना शिंदे यांच्या शिवसेनेतही अशी जोरदार चर्चा आहे. नुकत्याच झालेल्या खेड येथील जाहीर सभेत उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या समोरच रामदास कदम यांनी ही खदखद बोलून दाखविली. यामुळे बेजार झालेले शिंदे थेट दिल्लीत पोहचले आणि शिवसेनेच्या सर्व खासदारांसह पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. त्यानंतर शिंदे यांनी व्यक्तीगत पातळीवर शहा यांच्याशी चर्चा केली. या चर्चेच्या वेळी जरी कोणी नव्हते त्यामुळे एकनाथ शिंदे आणि अमित शहा यांच्यात काय चर्चा झाली हे ठामपणे जरी सांगता आले नाही तरी हि चर्चा काय झाली याबाबत अंदाज वर्तविण्यास काहीच हरकत नाही. रात्रीचे जेवण काय केले! उद्धव ठाकरे यांचा फोन होता काय! अशी तर चर्चा नक्कीच झाली नसणार! त्यामुळेच महाराष्ट्राच्या राजकारणात बेजार झालेल्या किंबहुना भाजपाने बेजार केलेल्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या चेहऱ्यावरील मानसिकता ओळखूनच अनेकांनी सूत्राचा आधार देत अंदाज मांडला. या अंदाजानुसार जर न्यायालयाने शिंदे यांच्या शिवसेनेच्या विरोधात निकाल दिलाच आणि 'शिवसेना' नाव व 'धनुष्यबाण' चिन्ह हातून गेले तर काय करायचे यावर चर्चा झाली असावी. असे झाले तर आमचे अस्तित्वच संपून जाईल अशीही भीती शिंदे यांनी शहा यांच्याजवळ व्यक्त केली असावी. कारण शिवसेना आणि धनुष्यबाण याच्यावरच शिंदे आणि चाळीस आमदार यांचे भवितव्य टिकून आहे. याची जाणीव सर्वांनाच आहे. तेच जर हातातून गेले तर सारे काही संपले असेच होईल. म्हणूनच जर न्यायालयाचा निर्णय विरोधात गेलाच, तर... त्यावर उपाय म्हणून शिंदे यांनी सर्व आमदारांसह भाजपात यावे अशीही चर्चा झाली असावी. असे झाले तरच भाजपा महाराष्ट्रात मजबुत होईल अशी भाजपाची खेळी असणार. हि अट एकनाथ शिंदे यांना मान्य करावीच लागेल असेच एकंदरीत राजकीय वातावरण आहे. त्यासाठीच एकनाथ शिंदे यांची मागील चार महिन्यांपासून भाजपा राजकीय कोंडी करीत आहे. जर शिंदे यांचा गट भाजपामध्ये सामिल झालाच तर शिंदे हे मुख्यमंत्री पदासाठी आग्रह धरतीलच कारण फडणवीस हे जेव्हा पुन्हा मुख्यमंत्री झाले त्यावेळी नाराज झालेले एकनाथ शिंदे यांनी अमित शहा यांची भेट घेतली होती. त्यावेळी अमित शहा म्हणाले होते की.. आम्ही तुम्हाला मुख्यमंत्री केले होते. आता मुख्यमंत्री भाजपाचाच राहणार! तुम्ही भाजपात या आम्ही तुमचा विचार करू! यावरूनच असे म्हणता येईल की जर शिंदे भाजपात गेले तर फडणवीस यांच्या अडीच वर्षाच्या कालावधीनंतर एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपद मिळाले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. असे जरी असले तरी भाजपा हा शिस्तबद्ध पक्ष आहे हे शिंदे यांच्यासह ४० आमदारांना विसरून चालणार नाही. त्यामुळेच भाजपात शिंदे गट सामिल होताच शिंदे यांचा मंत्रिमंडळातील शिवसेनेचा कोटाही आपोआप समाप्त होईल. इतकेच नाही तर कोणाला मंत्रीपद द्यायचे कोणाला कोणते खाते द्यायचे हे सारे अधिकार भाजपाचे फडणवीस आणि अमित शहा यांच्याजवळच असणार आणि तेच ठरविणार हे निश्चितच. आजपर्यंत शिवसेनेत जेव्हा जेव्हा बंडखोरी झाली त्याचा इतिहास पहा. ज्यांच्या ज्यांच्या नेतृत्वाखाली बंडखोरी झाली तेच नेते इतर पक्षात टिकले. पण त्यांच्या सोबत गेलेल्या सर्वच आमदारांचे, पदाधिकाऱ्यांचे राजकारण संपले. मग ते छगन भुजबळ असो, गणेश नाईक असो किंवा नारायण राणे असो. यांच्या सोबत गेलेल्या सर्वांचेच राजकारण संपुष्ठात आले. विजय वडेट्टीवार सारखे विदर्भातील मजबुत नेतृत्व असल्याने ते काँग्रेसमध्ये टिकले. आता एकनाथ शिंदे यांची वेळ आली आहे. जर शिंदे भाजपात सामिल झालेच तर त्यांच्यासोबतचे भाजपात कितीजण टिकाव धरतील हि येणारी वेळच ठरवेल त्यावर आत्ताच अंदाज व्यक्त करणे चुकीचे ठरेल.





## शहा आणि मोदींना खिजविण्यासाठीच

याच काळात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हेहि दिल्लीत दाखल झाले होते. उद्धव ठाकरे यांचा दौरा तसा नियोजित होता. शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांनी उद्धव ठाकरे यांच्या दिल्ली दौऱ्याची रीतसर माहितीही पत्रकारांना मुंबईतच दिली होती. इंडिया आघाडीच्या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी उद्धव ठाकरे दिल्लीत जाणार आहेत. याकाळात ठाकरे इंडिया आघाडीच्या अनेक नेत्यांची भेट घेऊन चर्चा करणार. राहुल गांधी यांच्या घरी उद्धव ठाकरे जेवणाचा आस्वाद घेतील. राहुल यांनीच ठाकरे कुटुंबाला जेवणाचे आमंत्रण दिले आहे असेही संजय राऊत यांनी सांगितले होते. असे जरी असले तरी उद्धव ठाकरे यांना इंडिया आघाडीच्या वैठकीत तितकेसे सारस्व नाही असे म्हटल्यास ते चुकीचे ठरणार नाही. इंडिया आघाडीच्या स्थापनेपासून हे काही लपून राहिलेले नाही. किंबहुना राहुल गांधी यांच्या घरी जेवणाचे आमंत्रण मिळाले म्हणून उद्धव ठाकरे यांना भयंकर आनंद होईल असेही नाही. पण ज्यांनी बाळासाहेबांची शिवसेना फोडली आणि दुसऱ्याच्या हाती सोपविली ते पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांना जास्तीतजास्त कसे खिजविता येईल यातच उद्धव ठाकरे यांना जास्त आनंद आहे. याच संधीची उद्धव ठाकरे नेहमीच वाट पाहत असतात. म्हणूनच संसदेचे जेव्हा अधिवेशन सुरु झाले आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विविध प्रश्नांनी काँग्रेसचे राहुल गांधी आणि विरोधकांनी भडीमार केला, त्यावेळी उद्धव ठाकरे यांना खऱ्या अर्थाने आनंद झाला असावा. त्यातच लोकसभा निवडणुकीत 50 हुन अधिक जागेवर मतदार यादीत घोळ करून कशा पद्धतीने जिंकल्या असा आरोप राहुल गांधी यांनी केला आणि पुराव्यासह पत्रकारांसमोर सादरीकरण केले. एका एका घरात ८० - ८० मतदार राहतात हे सादरीकरणात पुराव्यासह राहुल गांधी यांनी दाखविल्यामुळे निवडणूक आयोगाचे धाबेच दणाणले आणि देशातील राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. त्यातच संसदेत 'ऑपरेशन सिंधुर' 'पुलवामा' 'पहेलगाम' मधील अतिरेक्यांचा हल्ला यावरून राहुल गांधी आणि विरोधकांनी गृहमंत्री अमित शहा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर बेछूट आरोप केले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनीच पाकिस्तान भारत युद्ध थांबविले याबाबत खुलासा करावा अशीही मागणी विरोधकांनी केली. यामुळे पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री पार अडचणीत सापडले. हे सारे कमी म्हणून काय संसदीय अधिवेशन सुरु असतानाच ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के टॅरिफ लावण्याची घोषणा केल्याने पंतप्रधान मोदी अजूनच अडचणीत आले. यामुळे सर्वात जास्त आनंद उद्धव ठाकरे यांना झाला असावा आणि त्याच आनंदाच्या भरात उद्धव ठाकरे यांनी जाणीवपूर्वक राहुल गांधी यांच्या घरी कुटुंबासह जेवणाचा आस्वाद घेण्याचे ठरविले असावे. यामागे गांधी प्रति आस्था आहे असे वाटण्याचे अजिबात कारण नाही. तर यामागे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांना खिजवीण्यांचाच उद्देश जास्त असावा. आणि ते साहजिकच आहे. जेव्हा राजकारणात सत्ताधारी व्यक्तीशी लढणे मूर्खपणाचे समजले जाते तेव्हाच याच नितीचा मार्ग अवलंबिला जातो. अमित शहा आणि नरेंद्र मोदी यांनी बाळासाहेबांची शिवसेना ज्या पद्धतीने फोडली आणि दुसऱ्यांच्या हाती सोपवली हि गोष्ट उद्धव ठाकरे यांच्याच नाही तर महाराष्ट्राच्या जिव्हारी प्रचंड लागली. पण सत्तेपुढे शहाणपण चालत नाही असे म्हटले जाते. असे असले तरी राजकारणात कायम तीच परिस्थिती राहतही नाही हेही तितकेच सत्य असते. संधीची वाट पाहणे हाच त्यातील मार्ग असतो. त्याच पद्धतीने उद्धव यांनी मागील तीन वर्षे संधीची वाट पाहिली. त्यातून त्यांनी स्वतःला सावरले. पण आता संधी समोर दिसत आहेच असे समजताच उद्धव ठाकरे यांनी कुटुंबासहीत दिल्ली गाठली. याचे सर्वात मोठे कारण सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदी आलेले भूषण गवई. गवई हे संविधान जपणारे आहेत, संविधानाला धरूनच निर्णय देणारे आहेत. यामुळेच अनेकांप्रमाणे उद्धव ठाकरे यांचाही आत्मविश्वास वाढला. त्यातच राज ठाकरे सोबत आल्याने उद्धव ठाकरे यांच्या आत्मविश्वास आणखीनच वाढलेला होताच. राज सोबत असल्याने मुंबई महापालिकेची चिंता नाहीच पण ठाणे, कल्याण डोंबिवली, नाशिक या महापालिकाही खेचून आणता येईल असाही आत्मविश्वास उद्धव ठाकरे यांच्यात निर्माण झालेला आहे. म्हणूनच यावेळच्या दिल्ली दौऱ्यात उद्धव ठाकरे तितकेसे चिंताग्रस्त दिसले नाहीत. त्यांच्या चेहऱ्यावर हास्य आणि मिस्किलपणा दिसत होता. राहुल गांधी यांच्या घरी जाऊन जेवणाचा आस्वाद घेण्याच्या आनंदापेक्षा या जेवणाने मोदी आणि शहा यांना कसे खिजविले याचा आनंद अधिक होता असेच म्हणावे लागेल एकंदरीत उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे महाराष्ट्रातील दोन शिवसेनेच्या या दोन नेत्यांनी आपल्या कुटुंबासह दिल्लीचा राजकीय दौऱ्याचा आनंद घेतला आणि या दौऱ्याची नाक्यावर उभे राहून कार्यकर्त्यांनी फक्त चर्चा करून एकमेकांवर आरोप केले. यालाच राजकारण म्हणतात.